भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

त्रैमासिक

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

खंड १६, वर्ष ५४, अंक १-२

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या पुरस्काराने प्रकाशित)

अनुक्रमणिका

डॉ. सुभाष अक्कोळे	मराठी जैन सारस्वत	१
डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी	दंडाराजपुरीचे इनाम	११
प्रा. ग. ह. खरे	श्रीशिवछत्रपतींच्या स्वराज्यस्थापनेची पार्श्वभूमी	१७
डॉ. सौ. शोभना गोखले	क्षत्रपराजांची रांजणगांव येथील नाणी	३०
कमल चव्हाण	परशुरामाचे एक चित्र	३६
डॉ. गणेश थिट	गाथाभिगीतम्	४१
डॉ. शां. भा. देव	भोकरदन: सातवाहनकालीन नवे कलाकेंद्र	४४
दि. के. देशपांडे	१७१४ चा अहमदाबाद येथील हिंदु-मुसलमान दंगा	५०
प्र. न. देशपांडे	पन्हाळगडचा वेढा (इ. स. १७१०)	५९
द. न. पासलकर	बाजी पासलकरांचे अटकेतून पलायन	६७
ब. र. पोतनीस	पोतनिसांची स्वराज्यसेवा	६९
ग. ल. भिडे	पहिले इंग्रज मराठे युद्ध : एक पत्र	७२
म. श्री. माटे	‘ मराठी ’ राजा कोणास म्हणावे ?	७९

संपादन समिती

डॉ. म. श्री. माटे [कार्यकारी संपादक]
प्रा. ग. ह. खरे
डॉ. चिं. ना. परचुरे
डॉ. मु. श्री. कानडे
प्रा. व. शं. जोशी

प्रकाशक : डॉ. चिं. ना. परचुरे, चिटणीस भा. इ. सं. मं. १३२१ सदाशिव पेठ, पुणे–३०

मुद्रक : **म. बा. जोशी**, बी.ए. ज्ञानविलास छापखाना
२७, बुधवार पेठ, पुणे २.

प्रकाशन : शक १८९७ आषाढ शु. १. इसवी १० जुलै १९७५.

अनुक्रमणिका (पुढे चालू)

बा. ना. मुंडी	श्रीमंत रघुनाथराव पेशवे यांनी केलेली वनयात्रा	८५
उषा रानडे	गीतापंचरत्न–एक सचित्र हस्तलिखित	९०
डॉ. प्र. ल. सासवडकर	मानाजी शिंदे फाकडे	९७
नवे ऐतिहासिक साहित्य : परिचय		१०२
English Summaries		११२

त्रैमासिकाकडे परीक्षणासाठी पाठवावयाची पुस्तके, ‘ चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३० ’ याजकडे पाठवावीत

मराठी जैन सारस्वत

—डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे

श्रमण संस्कृती

प्राचीन भारतीय संस्कृतीत साहित्याच्या अभ्यासाचे सर्वात जास्त महत्त्व आहे. साहित्य हे संस्कृतीचे हृदय असते. भारतीय संस्कृतीत वैदिक, जैन आणि बौद्ध यांच्या साहित्याच्या अभ्यासाला यामुळेच अधिकाधिक महत्त्व प्राप्त झाले. भारतीय संस्कृति समजण्यासाठी या तीनही धर्मातील ऋषीमुनींनी निर्माण केलेले साहित्य अभ्यासणे अत्यावश्यक आहे. या बाबतीत वैदिक साहित्याचे जितके महत्त्व आहे तितकेच 'श्रमणसाहित्यां'चे ही महत्त्व आहे हे या संस्कृतीच्या समीक्षकांनी मान्य केले आहे. श्रमण तपस्वींचे उल्लेख 'उत्तराध्ययन सूत्र' यासारख्या प्राचीन जैन ग्रंथात येतात. 'श्रमण' हा शब्द जैन मुनी या अर्थी प्राचीन काळी वापरला जाई. प्राचीन काळी ब्राह्मणांनी जसे वैदिक विचारांचे नेतृत्व केले तसे श्रमणांनी वैदिकेतर समाजाचे बौद्धिक नेतृत्व केले असे दिसून येते.

श्रमणसाहित्य—भारतवर्षात जैन धर्माच्या कार्याचा जेव्हा विचार होतो, तेव्हा त्या धर्माने सांगितलेल्या तत्त्वज्ञानाला जितके महत्त्व दिले जाते तितकेच महत्त्व त्या धर्मीयांनी निर्माण केलेल्या विविध भारतीय भाषातील साहित्यालाही दिले जाते. प्राकृत, संस्कृत अपभ्रंश, जुनी हिंदी, गुजराती, कन्नड, तामिळ इत्यादि सर्वच भाषात जैनांचे साहित्य विपुल प्रमाणात आहे. ह्या सर्व साहित्याची परंपरा एक आहे. त्यामागे एकच तत्त्वज्ञान आहे, एकच विशिष्ट जीवनदृष्टी आहे. या साहित्याला 'श्रमण साहित्य' असे एकच व्यापक नाव देणे अभ्यासकांच्या दृष्टीने योग्य आहे. प्राचीन मराठी भाषेतही असे जैन साहित्य आजकाल उपलब्ध झाले आहे, त्याचाही समावेश या श्रमण साहित्यात झाला पाहिजे. या श्रमण साहित्याची वैशिष्टचे विंटरनित्स याने पुढीलप्रमाणे सांगितली आहेत—"श्रमण साहित्यात चातुर्वर्ण्य संस्थेला महत्त्व नाही. या साहित्यातील कथानायक देव किंवा ऋषी नसून राजे, व्यापारी अथवा शूद्रही असतात. काव्यासाठी सामान्य लोकांच्या परंपरेतील कथानकाचा उपयोग येथे करण्यात येतो. या साहित्यात संसारातील दुःखाचे कथन करून अहिंसादी गुणांचे महत्त्व वर्णन करण्यात येते, यज्ञयागाचे खंडन करण्यात येते."

मराठीतील जैन साहित्यालाही हे वर्णन लागू पडत असल्यामुळे त्याचाही समावेश श्रमण साहित्यामध्ये करावा लागेल.

संपादन समिती

डॉ. म. श्री. माटे [कार्यकारी संपादक]
प्रा. ग. ह. खरे
डॉ. चिं. ना. परचुरे
डॉ. मु. श्री. कानडे
प्रा. व. शं. जोशी

प्रकाशक : डॉ. चिं. ना. परचुरे, चिटणीस भा. इ. सं. मं. १३२१ सदाशिव पेठ, पुणे–३०

मुद्रक : म. बा. जोशी, बी.ए. ज्ञानविलास छापखाना
२७, बुधवार पेठ, पुणे २.

प्रकाशन : शक १८९७ आषाढ शु. १. इसवी १० जुलै १९७५.

अनुक्रमणिका (पुढे चालू)

बा. ना. मुंडी	श्रीमंत रघुनाथराव पेशवे यांनी केलेली वनयात्रा	८५
उषा रानडे	गीतापंचरत्न–एक सचित्र हस्तलिखित	९०
डॉ. प्र. ल. सासवडकर	मानाजी शिंदे फाकडे	९७
नवे ऐतिहासिक साहित्य : परिचय		१०[illegible]
English Summaries		११२

त्रैमासिकाकडे परीक्षणासाठी पाठवावयाची पुस्तके, ' चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३० ' याजकडे पाठवावीत

मराठी जैन सारस्वत

–डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे

श्रमण संस्कृती

प्राचीन भारतीय संस्कृतीत साहित्याच्या अभ्यासाचे सर्वात जास्त महत्त्व आहे. साहित्य हे संस्कृतीचे हृदय असते. भारतीय संस्कृतीत वैदिक, जैन आणि बौद्ध यांच्या साहित्याच्या अभ्यासाला यामुळेच अधिकाधिक महत्त्व प्राप्त झाले. भारतीय संस्कृति समजण्यासाठी या तीनही धर्मातील ऋषीमुनींनी निर्माण केलेले साहित्य अभ्यासणे अत्यावश्यक आहे. या बाबतीत वैदिक साहित्याचे जितके महत्त्व आहे तितकेच 'श्रमणसाहित्यां'चे ही महत्त्व आहे हे या संस्कृतीच्या समीक्षकांनी मान्य केले आहे. श्रमण तपस्वींचे उल्लेख 'उत्तराध्ययन सूत्र' यासारख्या प्राचीन जैन ग्रंथात येतात. 'श्रमण' हा शब्द जैन मुनी या अर्थी प्राचीन काळी वापरला जाई. प्राचीन काळी ब्राह्मणांनी जसे वैदिक विचारांचे नेतृत्व केले तसे श्रमणांनी वैदिकेतर समाजाचे बौद्धिक नेतृत्व केले असे दिसून येते.

श्रमणसाहित्य–भारतवर्षात जैन धर्माच्या कार्याचा जेव्हा विचार होतो, तेव्हा त्या धर्माने सांगितलेल्या तत्त्वज्ञानाला जितके महत्त्व दिले जाते तितकेच महत्त्व त्या धर्मीयांनी निर्माण केलेल्या विविध भारतीय भाषातील साहित्यालाही दिले जाते. प्राकृत, संस्कृत अपभ्रंश, जुनी हिंदी, गुजराती, कन्नड, तामिळ इत्यादि सर्वच भाषात जैनांचे साहित्य विपुल प्रमाणात आहे. ह्या सर्व साहित्याची परंपरा एक आहे. त्यामागे एकच तत्त्वज्ञान आहे, एकच विशिष्ट जीवनदृष्टी आहे. या साहित्याला 'श्रमण साहित्य' असे एकच व्यापक नाव देणे अभ्यासकांच्या दृष्टीने योग्य आहे. प्राचीन मराठी भाषेतही असे जैन साहित्य आजकाल उपलब्ध झाले आहे. त्याचाही समावेश या श्रमण साहित्यात झाला पाहिजे. या श्रमण साहित्याची वैशिष्टये विंटरनित्स याने पुढीलप्रमाणे सांगितली आहेत–"श्रमण साहित्यात चातुर्वर्ण्य संस्थेला महत्त्व नाही. या साहित्यातील कथानायक देव किंवा ऋषी नसून राजे, व्यापारी अथवा शूद्रही असतात. काव्यासाठी सामान्य लोकांच्या परंपरेतील कथानकाचा उपयोग येथे करण्यात येतो. या साहित्यात संसारातील दुःखाचे कथन करून अहिंसादी गुणांचे महत्त्व वर्णन करण्यात येते, यज्ञयागाचे खंडन करण्यात येते."

मराठीतील जैन साहित्यालाही हे वर्णन लागू पडत असल्यामुळे त्याचाही समावेश श्रमण साहित्यामध्ये करावा लागेल.

महाराष्ट्र संस्कृतीत जैन समाज

महाराष्ट्रात जैन समाज हा अल्पसंख्य असला तरी त्याचे स्थान महत्त्वाचे आहे. शहरात जसा तो समाज रहातो तसाच विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र या प्रदेशात हा समाज तेथील ग्रामजीवनाशी एकरूप झाला आहे. महाराष्ट्रीय संस्कृतीला तो आपली संस्कृती मानतो. डॉ. केतकरांनी 'महाराष्ट्र–जीवन भाग : २' मध्ये याचे मार्मिक वर्णन केले आहे. ते म्हणतात–"स्थानिक देवतांच्या उपासना प्राचीन काळी चोहोकडे होत्या. बौद्ध संप्रदाय, ब्राम्हणी धर्म, जैन-धर्म या सर्वांनी या देवतांच्या उपासनेला बिलकुल विरोध केला नाही. जैन आले तर त्यांच्या देवांचा समावेश त्यात झालेलाच आहे. ब्राम्हणास प्रिय असे देव त्यात आहेत." महाराष्ट्राचा ग्रामीण धर्म हा असा सर्वसमावेशक होता. 'वालावली देवस्थानांतर्गत देवता व तत्संबोधक गाऱ्हाणे' यांचा उल्लेख केतकरांनी या संदर्भात केला आहे. नारायण, आदिनारायण, कान्होबा यांच्याबरोबरच 'जैना' व 'जैनमहालक्ष्मी' यांचाही उल्लेख तेथे येतो. कै. राजवाडे यांनी संपादित केलेल्या 'महिकावती'च्या बखरीत एके काळी महाराष्ट्रात धार्मिक संघर्षातून '**श्रावकधर्मीय यतींना** तेलाच्या कढईत टाकल्याचा उल्लेख येतो. राजवाडे यांच्या मताप्रमाणे हे लिखाण शके १३७० मधील आहे. मुकुंदराज यांना विवेकसिंधु लिहिण्यासाठी प्रेरणा देणारा जैतपाल हा प्रारंभी जैन होता हे कृ. पां. कुलकर्णी यांचे मत संशोधकांनी नोंदवून ठेवले पाहिजे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या १३ व्या अध्यायात केशलोच करणाऱ्या जैन मुनींचा निर्देश केला असून जैनांच्या पाणी गाळून पिण्याचा खास उल्लेख केला आहे. महानुभावांच्या शिशुपाल वधात जैनांच्या 'आडबिदी'चा उल्लेख येतो. राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष हा आचार्य जिनसेन यांचा भक्त होता. सातवाहन राजांची कथा जैनांच्या 'तीर्थकल्पात' येते, आणि पैठणचा उल्लेख 'महाराष्ट्रलक्ष्मीचे रत्न' असा त्यात केलेला आहे. पुण्याजवळील पाले येथील शिलालेखात, सातवाहन युगात 'नमो अरिहंताणं' हा णमोकार मंत्रातील भाग महाराष्ट्रात उत्कीर्ण झालेला दिसतो. कोल्हापूर, नाशिक, देवगिरी, अंतरिक्ष पार्श्वनाथ, फलटण, कुंडल अशी कितीतरी महाराष्ट्रातील जुनी तीर्थक्षेत्रे आहेत की, जेथे जैन संस्कृतीची पदचिन्हे उमटलेली आहेत.

ब्रिटिशांचा अंमल महाराष्ट्रात सुरू झाल्यानंतर प्रारंभीच्या काही ग्रंथात जैन समाजासंबंधी महत्त्वाचे उल्लेख आले आहेत. 'घाशीराम कोतवाल' लिहिणाऱ्या मोरोबा कान्होबा यांनी जैन जातीचा विनोदासाठी तेथे उपयोग करून घेतला आहे. 'अरुणोदय' कार बाबा पद्मनजी यांनी बेळगांव भागात जैन मुनींना आहार कसा दिला जात असे याचे वर्णन करून स्वतःसंबंधी पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहे– "बेळगांवात पुष्कळ जैन असून तेथं पारसनाथाचे देऊळही आहे, परंतु

त्याची मूर्ती दिगंबर आहे म्हणून तिचे दर्शन घेऊ नये असे, मला जो ब्राह्मण शिकवावयास ठेवला होता त्याने मला सांगितले होते." त्याचप्रमाणे गोविंद नारायण माडगांवकर यांनी 'मुंबईचे वर्णन' या ग्रंथात तेथील महालक्ष्मीचे वर्णन करताना पुढील मार्मिक वाक्य लिहिले आहे–"–कारण देवी म्हटली म्हणजे तिची तृप्ती ह्या जीवांचे प्राण घेतल्याशिवाय व्हावयाची नाही. कदाचित कलियुगातील देवीने **श्रावक लोकांची दीक्षा घेतली** असेल तर कोण जाणे." हे वाक्य त्या देवीसमोर प्राण्यांचे बळी दिले जात नसत याचे वर्णन करताना आले आहे.

वरील सर्व उल्लेख एवढ्यासाठीच ग्रथित केले आहेत की महाराष्ट्र आणि जैन समाज यांची एकरूपता व संस्कृतीचे ऐक्य संशोधकांनी लक्षात घेणे आवश्यक आहे.

मराठीचे लालन पालन

मध्ययुगीन महाराष्ट्रात मराठी साहित्य समृद्ध करण्याचे कार्य प्रामुख्याने महानुभाव ग्रंथकार आणि भागवत धर्मीय संत यांनी केले; परंतु त्यांच्याही अगोदर मराठी भाषेच्या अस्तित्वाच्या खुणा प्रामुख्याने जैन साहित्यात आढळतात असे दिसून येते. या दृष्टीने श्रवणबेळगोळ येथील शिलालेख, 'कुवलयमाला' व 'राजीमती प्रबोध' हे ग्रंथ विशेष उल्लेखनीय आहेत. मात्र ज्ञानेश्वरांच्या समकालीन असा एकही प्रमुख जैनग्रंथकार अद्यापि तरी दिसून येत नाही. डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांनी 'नेमिनाथ भवांतर' या नावाचे एक लहानसे जैनकाव्य संपादित केले आहे. त्याच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, "मराठी भाषेची उत्पत्ति ज्या माहाराष्ट्री अपभ्रंशापासून झाली ती भाषा 'जैन प्राकृत' या नावाने देखील ओळखली जाते. मराठीचे लालन पालन जैन साधूसंतांच्या मेळाव्यात झाले असावे असे वाटते. दुर्दैवाने मराठीच्या बाल्य काळातील साधनसामग्री आज उपलब्ध नाही, त्यामुळे याबाबत केवळ अनुमानावर विसंबून राहावे लागते. आज मराठी साहित्याचा इतिहास जो सापडतो तो अत्यंत प्रौढावस्थेपासूनचा. मराठी वेदांताच्या गोष्टी बोलू लागली तेव्हापासूनचा इतिहास आणि परंपरा यांचा मागोवा घेतल्यानंतर एक गोष्ट मात्र निश्चित सांगता येते की मराठीचे बालपण जैन परंपरेत जोपासले गेले असावे." आज तरी मराठी भाषेत जैन साहित्य ग्रंथरूपाने १४ व्या शतकानंतर दिसून येते. तत्पूर्वीचे ग्रंथ असतीलही परंतु अद्यापि त्यासंबंधी संशोधन झाले पाहिजे. साधारणतः इ. स. १४५० ते १८५० असा कालखंड घेतल्यास त्यात जैन ग्रंथकारांची संख्या जवळजवळ पन्नासहून जास्त आहे. ग्रंथसंख्या दीडशेहून अधिक आहे. जेथे भट्टारकांची पीठे होती तेथे त्या मठाच्या अधिपतींनी मराठी साहित्य निर्मितीला जास्त प्रोत्साहन दिले. कारंजा (विदर्भ), देवगिरी, लातूर, शिरडे शहापूर, कोल्हापूर, नांदणी, दहीगांव अशा विशिष्ट गावी

मराठी जैन साहित्याची निर्मिती अधिक प्रमाणात झाली आहे. तेथे भट्टारकरांचे वास्तव्य असे आणि जैन धर्माच्या शिक्षणाची सोयही होती.

गुजरातकडून प्रेरणा

प्रारंभीचे मराठी जैन साहित्य हे गुजरातमधील ईडर येथील काही गुजराती जैन गुरुंच्या प्रेरणेने आणि आशीर्वादाने तयार झाले आहे. ईडर आणि विदर्भातील कारंजा या दोन भट्टारक पीठांचा एकमेकांशी संबंध फार होता. ईडरचे भट्टारक भुवनकीर्ती यांचा शिष्य ब्रह्मजिनदास हा गुजराती साहित्यात श्रेष्ठ साहित्यिक म्हणून प्रसिद्ध आहे. इ. स. १४५१ च्या सुमारास त्याने अनेक 'रास-ग्रंथांची' निर्मिती केली. या ब्रह्मजिनदासानेच मराठी साहित्यनिर्मितीसाठी सुद्धा आपला शिष्यवृंद उभा केला. मराठीतील आद्य जैनकवी ब्रह्मगुणदास हा ब्रह्मजिनदासाचा शिष्य होता. ब्रह्मजिनदासाचा शांतिदास हा शिष्य होता. त्याने पंडित मेघराज, कामराज व पंडित सूरीजन यांना मराठीत ग्रंथ लिहिण्यासाठी उद्युक्त केले. आणि त्यांच्याकडून ग्रंथलेखन करवून घेतले. म्हणून प्रारंभीची ही मराठी ग्रंथ रचना प्रामुख्याने गुजराती वळणावर गेली आणि त्यात गुजराती ग्रंथांचे विशेषतः ब्रह्मजिनदासांच्या ग्रंथाचे अनुकरण करण्यात आले. ब्रह्मजिनदासाने श्रेणिकचरित्र लिहिले. मेघराजाने 'यशोधर चरित्र', कामराजाने 'सुदर्शन चरित्र' आणि सूरीजनाने 'परमहंसकथा' असे प्रमुख ग्रंथ लिहिले. ब्रह्मगुणदासाचे श्रेणिक चरित्र मराठी भाषेतील एक उत्कृष्ट काव्यकृती आहे. तीन हजार ओवीसंख्या असलेला हा चार अध्यायाचा ग्रंथ मराठी साहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने नेहमीच मोलाचा ठरेल. श्रेणिक–बिंबिसार हा शिशुनागवंशातील, भगवान महावीरांचा समकालीन मगधाचा राजा होता. त्या ऐतिहासिक पुरुषाचे हे मराठीत आलेले परंपराबद्ध चरित्र आहे. ब्रह्मगुणदास हाच पुढे गुणकीर्ती आचार्य म्हणून ओळखला जाऊ लागला आणि तो मुनि झाला. 'धर्मामृत' हा प्रश्नोत्तर स्वरूपाचा उत्कृष्ट गद्यग्रंथ गुणकीर्तीने रचला आहे. तत्कालीन महाराष्ट्रीय संस्कृतीच्या अभ्यासात धर्मामृताचे साहाय्य मोठ्या प्रमाणात होण्यासारखे आहे. गुणकीर्तीनेच 'पद्मपुराण' हा ग्रंथ लिहिला आहे. 'पद्म' म्हणजे श्री रामचंद्र. 'पद्मपुराण' म्हणजे जैनांचे रामायण. या जैन रामायणाची मराठीत निर्मिती करण्याचे थोर कार्य गुणकीर्तीनें केले. या ग्रंथाच्या ४३ अध्यायांपैकी २८ अध्यायच गुणकीर्तीच्या हातून पूर्ण झाले आहेत. गुणकीर्तीने या शिवाय 'अनुप्रेक्षा', 'रुक्मिणीहरण', 'रामचंद्र फाग', 'नेमिनाथ पाळणा', 'रत्नकरंड श्रावकाचारा'वरील मराठी टीका वगैरे कित्येक ग्रंथ लिहिले आहेत. गुणदास–गुणकीर्ती यांच्या साहित्यास 'जैन मराठी साहित्या'त आद्य स्थान द्यावे लागते. ते विपुल आहे आणि विविध आहे. गद्य आणि पद्य या दोन्हीही वाङ्मय प्रकारात सहजगतीने संचार करणारा हा कवी होता, यात शंका नाही. पुराण,

चरित्र, भाष्य, टीका अशा वाङ्मयाबरोबरच गीतरचना करणे हेही या प्रारंभीच्या ग्रंथकाराचे एक वैशिष्टच जाणवते. गुणदासाची ' क्षमागीत,' ' विंचुगीत ', ' गाऱ्हाणे ' ' रामचंद्र हळदुली ' ही गीते आणि गुणकीर्तीची ' रामचंद्र फाग ', ' धंदागीत ', ' नेमिनाथ पाळणा ' ही गीते ज्ञानदेव–नामदेवांच्या गीताप्रमाणेच वाटतात.

यशोधराची कथा–यशोधराची कथा ही जैन साहित्यातील अति प्रसिद्ध कथा आहे. जैन साहित्यिकांनी सर्वच भारतीय भाषांमध्ये ती लिहिली आहे. मराठीत मेघराज, गुणनंदी आणि नागोआया या तिघांनी हे यशोधराचे चरित्र आपापल्या पद्धतीने लिहिले आहे. या कथेत रसवत्ता आणि नाटयमयता भरपूर प्रमाणात आहेत. शृंगार आणि वैराग्य यांचे वर्णन मेघराजाने आपल्या यशोधर चरित्रात फारच सुंदर रीतीने केले आहे. मराठीतील एक श्रेष्ठ प्रतीचे आख्यानकाव्य असे या ग्रंथाचे वर्णन करता येईल. राजा यशोधर आणि त्याची राणी अमृता यांची ही रोचक कथा वाचकांचे चित्त वेधून घेते. राणी अमृता ही शीलभ्रष्ट आणि कपटी असून स्वतःच्या पतीचा आपल्या हाताने प्राण घेते या पापाचे प्रायश्चित्त तिला कसे भोगावे लागते हे या कथेत सांगितले आहे. पीठाचा कोंबडा देवीपुढे बळी दिल्याने जिवंत कोंबडा बळी दिल्याचे पातक राजा यशोधराला लागते. या हिंसाकर्माचे फळ भवाभवात त्याला भोगावे लागते हे या कथेत दिसून येते. मराठीतील जैन साहित्यात मेघराजाचे हे ' यशोधर चरित्र ' सर्वच दृष्टींनी अभ्यसनीय आहे. मेघराजानें यशोधरचरित्राशिवाय ' पार्श्वनाथ भवांतर ', ' कृष्णगीत,' ' रामायणी कथा ', ' गुजरी मऱ्हाटी गीत ', ' मोमट स्वामी गीत ' असे विविध प्रकारचे साहित्य लिहिले आहे. मेघराज हा एक प्रयोगशील, प्रतिभावंत कवी होता. अंतःकरणाचा रसिक होता, याची प्रतीति त्याच्या काव्यावरून येते. काही गुजराती काव्यरचनासुद्धा त्याने केलेली आहे.

मेघराजाचा गुरुबंधु पंडित सूरीजन याने एकच परंतु अति वैशिष्टयपूर्ण कलाकृती मराठीत निर्माण केली आहे. ' परमहंस कथा ' ही एक अध्यात्मिक रुपक-कथा असून गद्य पद्य मिश्र अशा चंपू स्वरूपाची आहे. मराठीत असे प्रयोग फार कमी आढळतात. आत्मा आणि त्याचे शत्रू म्हणजे राग, द्वेष आणि मदमोहादि विकार यांचा संघर्ष या रुपककथेत आहे. तत्कालीन राजकीय आणि अध्यात्मिक वातावरणाचे प्रतिबिंब या कथेत हुबेहूब उमटले आहे. प्रमाणबद्धता, आटोपशीरपणा, संवादात विलसणारे नाटय इत्यादी वाङ्मयीन सद्‌गुणांचा संगम या काव्यात फार छान झाला आहे. याच काळात यशोधर चरित्रावर काव्यरचना करणारे इतर दोन कवी झाले. गुणनंदीचे ' यशोधर चरित्र ' हे विस्तार आणि वर्णनशैली या दोन्ही बाबतीत मेघराजाच्या यशोधर चरित्राहून सरस आहे. वऱ्हाड-मधील मोरंबपूर येथे या काव्याची रचना झाली. नागोआया याची यशोधर कथा आकाराने लहान असूनही आकर्षक आहे.

देवनगरीचा जिनदास

हरिवंश पुराणाचा कर्ता जिनदास हा इ. स. च्या १५ व्या शतकामध्ये झालेला प्रख्यात मराठी जैन कवी होय. जिनदास हा देवगिरी येथील उज्जंतकीर्ती आचार्यांचा शिष्य होता. त्या आचार्यांनी त्याला काव्य, व्याकरण, धर्मशास्त्र शिकवून तयार केले. देवगिरी हे जैनांचे एक धर्मपीठ होते. अल्लाउद्दीन सुलतान याने संवत् १५९८ मध्ये विद्यानंदी स्वामींचा सन्मान केला होता असा उल्लेख मिळतो. हरिवंशपुराण हा महाकाय ग्रंथ आहे. त्याचे ६७ अध्याय असून अकरा हजार ओव्या आहेत. हरिवंशपुराणात तीर्थंकर नेमिनाथ, श्रीकृष्ण, जरासंध यांची कथा येते. जैन संस्कृती आणि वैदिक संस्कृती यांच्या तौलनिक अभ्यासाच्या दृष्टीने या ग्रंथाचे फार महत्त्व आहे. जिनदासाचा काळ इ. स. १४९३ च्या सुमारास येतो.

दामा पंडित आणि दयासागर

सन १६५० च्या सुमारास दामा पंडित नावाच्या कवीने 'जंबुस्वामी चरित्र' व 'दानशील तप भावना' असे दोन ग्रंथ लिहिले. जंबुस्वामी हे भ. महावीरानंतर त्यांच्या उपदेशाची परंपरा टिकविणारे तिसरे आचार्य होते. त्यांचे हे काव्यमय चरित्र जैन परंपरेच्या इतिहासात महत्त्वाचे मानले जाते. 'दानशील तपभावना' हा संवादमय ओवीबद्ध ग्रंथ आहे. दान, शील, तप, आणि भावना या चौघात आत्मोन्नतीच्या दृष्टीने सर्वात श्रेष्ठ कोण यासंबंधी झालेला हा संवाद आहे. अनेक लहान लहान कथा व दृष्टान्त या ग्रंथात आलेले आहेत. याच शतकात दयासागराने 'सम्यक्त्व कौमुदी', 'भविष्य दत्त पुराण', 'धर्मामृत पुराण' असे विविध ओवीबद्ध ग्रंथ लिहिले आहेत. सम्यक्त्व कौमुदीची रचना कथावाङ्मयात विशेष महत्त्वाची मानली जाते.

चिमणापंडित आणि महिचंद्र

पैठणचा सुप्रसिद्ध पंडित चिमणा हा 'चिमणापंडित' याच नावाने ओळखला जात असे. पैठणच्या परिसरात राहून या बहुश्रुत आणि बहुसंचारी पंडिताने विविध प्रकारच्या साहित्याची निर्मिती केली. १७ व्या शतकात विदर्भातील कारंजा आणि मराठवाड्यातील पैठण यांना जोडणारा हा एक दुवा होता. एकनाथांच्या भारुडासारखी काव्यरचना चिमणापंडिताने पुष्कळ केली आहे. 'फुगडी','पिंगा', 'लाखोटा' 'चेंडूफळी', 'टिपरी', 'बालक छाटी' या त्यांच्या गीतमय रचना आहेत. 'तीर्थवंदना' या नावाचे भारतातील जैन तीर्थांचे वर्णन करणारे एक लहानसे काव्य त्यानें लिहिले आहे. तीर्थवंदनेत पैठण नगरीचा गौरव त्याने पुढील शब्दात केला आहे

" प्रतिष्ठान ग्राम महातीर्थ त्यांसी।
बारा दारवंटे गंगातट जासी।
मुनिसुव्रत स्वामी निवास तेथे।
आदीश्वर चंद्रप्रभु वंदी तेथे ॥ "

' मुनिसुव्रत विनति ' म्हणून एक हिंदी काव्यही त्याने लिहिले आहे. अनंतव्रतकथा ही त्याची लोकप्रिय काव्यकृती आहे. या कथेच्या प्रशस्तीत " प्रतिष्ठान महानगरी जनमंदिरी। चंद्रप्रभ शुभस्थानी कथा करी चिमणा पंडित। भावसहित नागरवाणी ॥"

असा पैठण येथील चंद्रप्रभ मंदिराचा उल्लेख केला आहे. याच कालखंडात विशालकीर्तींची ' धर्मपरीक्षा ' कवी गंगादास याचे ' पार्श्वनाथ भवांतर ' हे ग्रंथ निर्माण झाले. लातूर येथील भट्टारक महीचंद्र याने इ. स. १६९६ मध्ये आदिनाथ पुराण या उत्कृष्ट महाकाव्याची निर्मिती केली. प्रथम तीर्थंकर ऋषभदेव याचे हे ओवीबद्ध चरित्र आहे. महीचंद्र याने स्वतःचे शिष्यमंडळ तयार केले होते. महीकीर्ती, ब्रह्मचिंतामणि, रामकीर्ती, देवेन्द्रकीर्ती इत्यादिकांनी महीचंद्राचा गुरु म्हणून आपापल्या काव्यात आदरपूर्वक उल्लेख केला आहे. ' आदिनाथ ' पुराणाशिवाय ' सम्यक्त्व कौमुदी ' ' नंदीश्वर कथा, ' ' गरुडपंचमी कथा ', ' नेमीनाथ भवांतर ', ' शांतीनाथ स्तोत्र ' इत्यादि काव्ये महीचंद्रांनी लिहिलेली आहेत.

देवेंद्रकीर्तिकृत कालिकापुराण :– लातूरचे भट्टारक महीचंद्र यांचे एक प्रमुख शिष्य देवेंद्रकीर्ती यांनी 'कालिका पुराण' या नावाचा अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण असणारा ग्रंथ लिहिला आहे. कालिका म्हणजे पद्मावती; तिचे माहात्म्य या प्रचंड पुराणात सांगितले आहे. ग्रंथाचे ४८ अध्याय असून ओवीसंख्या सात हजाराच्या वर आहे. या ग्रंथात शिरड शहापुर येथील मलीनाथ जैन मंदिरात असलेल्या प्रतीप्रमाणे 'सम्यक्त्व कौमुदी' धर्मपरीक्षा व अनंत व्रतकथा ' हे तीन ग्रंथ समाविष्ट झाले आहेत. 'सोमवंशाची उत्पत्ति' ' शहाण्णव कुळांची ' निर्मिती, कौरव पांडवांची उत्पत्ति, परशुरामांची कथा, माहोर क्षेत्राची निर्मिती अशी अनेक प्रकरणे या पुराणात आली आहेत. मल्कावतीचे बोगार, त्यांचे लिंगायत वाणी समाजाशी झालेले भांडण, तगर बोगार जातीची निर्मिती असे काही तत्कालीन विषयही या पुराणात आले आहेत, हलकासलका व्यापार करून गावोगाव भटकून पोट भरणारा वर्ग आणि खेडोपाडी राहून बलुत्यांची कामे करणारा कारागीर वर्ग यांची कुलदेवता कालिका आहे. हा वर्ग सोमवंशी क्षत्रिय असून त्यांचे रक्षण कालिका देवी करते असा कथाभाग या ग्रंथात आला आहे. विशेषतः कासार व बोगार समाजात कालिका पुराणाचे श्रद्धेने वाचन केले जाते.

कवि जिनसागर :– १८ व्या शतकातील मराठी जैन ग्रंथकारात विपुल व विविध लेखनामुळे कवी जिनसागराने आपले वैशिष्टचपूर्ण स्थान निर्माण केले आहे. सन १७२४ ते १७४४ या कालखंडात जिनसागराने आपली ग्रंथनिर्मिती केली. जीवंधरपुराण ही त्याची प्रमुख रचना आहे. जीवंधराची कथा शृंगार व वीररसाने ओथंबलेली आहे. जीवंधराचा पिता सत्यंधर हा हेमांगदाचा राजा असताना मंत्री काष्ठांगार याने विश्वासघाताने त्याचे राज्य बळकावले आणि त्याचा खून केला. सत्यंधराची गर्भवती राणी सुदैवाने वाचली. तिने स्मशानात जीवंधरकुमारास जन्म दिला. जीवंधर मोठा झाल्यानंतर पराक्रमी वीर झाला. त्याने अनेक कुमारिकांशी विवाह केले. शेवटी आईची व त्याची भेट झाली; त्यानंतर त्याने काष्ठांगाराचा सूड घेतला. अशी ही विविध घटनांनी भरलेली नाटचमय कथा आहे. याशिवाय जिनसागराने अनेक व्रतकथा, स्तोत्रे व आरत्या यांची रचना केली.

इतर कवि आणि जनार्दन:–अठराव्या शतकात जिनसागराशिवाय ‘ आदीश्वर भवांतराचे ’ कर्ते छत्रसेन, ‘मेघमाला व्रतकथां’कार लक्ष्मीचंद्र, ‘रविवार व्रतकथे’चा कर्ता यमासा, ‘बारमासी’ या सुप्रसिद्ध काव्याचा कर्ता दिनासा, श्रेणिक चरित्रकार जनार्दन असे प्रमुख कवी झाले. जनार्दनाचे ‘श्रेणिक चरित्र’ हे श्रेष्ठ प्रतीचे काव्य आहे. चाळीस अध्यायाचा हा ग्रंथ म्हणजे एक पुराण काव्याचा आदर्शच आहे. मराठी भाषेसंबंधी या कवीचा अभिमानही मोठा आहे.

“ संस्कृत भाषा देवास्तुत्य । महाराष्ट्र ही भाषा देवानिमित्य युगलवाचा समता सत्य । द्वैत निश्चित असेना ॥ संस्कृत भाषेने निंदा केली । ती काय महापावन झाली । महाराष्ट्र वाचेने स्तुत्य घडली । ती का व्यर्थ गेली म्हणावी ।”असा हा जनार्दनाचा सवाल आहे. जनार्दनाचे श्रेणिक चरित्र गुणदासाच्या श्रेणिक चरित्राचा विस्तार आहे. पण हा विस्तार मोठा मनोहर आहे. प्रतिभा आणि व्यासंग या दोन्ही शक्तींचे येथे मनोज्ञ दर्शन घडते.

एकोणिसाव्या शतकाचा प्रारंभ :– एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी महतीसागर हा कवि विशेष नजरेत भरतो. वऱ्हाडमधे अंबनेर येथे त्याचा सन १७७२ साली जन्म झाला. पण उत्तरायुष्यात मात्र तो फलटण बारामती भागात वावरला. दहिगाव येथे त्याची समाधी आहे ‘ महती काव्यकुंज ’ या नावाने त्याचे काव्य प्रसिद्ध झाले आहे. मराठीत अभंगनिर्मिती करणारा हा लोकप्रिय कवी होता. याच काळात रत्नकीर्ती कवीने ‘उपदेश रत्नमाला’ नावाचा ग्रंथ सन १८१३ मध्ये रचला आहे. जैन धर्माचे सारच या ग्रंथात ग्रंथकर्त्याने आणले आहे.

कोल्हापूर भागातील भट्टारकांनी या शतकाच्या पहिल्या चरणात प्रामुख्याने ग्रंथरचना केलेली दिसून येते. त्यापूर्वी हे भट्टारक प्रामुख्याने कन्नडमध्ये अथवा

संस्कृतात ग्रंथरचना करीत असत. पण यानंतर मात्र त्यांना मराठी ग्रंथाची आवश्यकता वाटू लागली असावी. कोल्हापूर–नांदणी येथील भट्टारक जिनसेन यांनी 'जंबुस्वामी पुराण', 'उपदेश रत्नमाला' व 'पुण्यास्त्रव पुराण' हे ग्रंथ तयार केले. पुण्यास्त्रव पुराण हा ग्रंथ कन्नडमधून मराठीत आणल्याचे कवीने सांगितले आहे.

या वाङ्मयाचा आदर्श :– आतापर्यंत जैन ग्रंथकारांचा व त्यांच्या ग्रंथांचा अगदी स्थूल असा परिचय घडविण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय अनेक ग्रंथकार व त्यांचे ग्रंथ यांचा समग्र परिचय या विशिष्ट मर्यादेत घडविणे अशक्य आहे. या जैन साहित्याकडे अद्यापि विद्वानांचे जावे तितके लक्ष गेलेले दिसत नाही. या साहित्याचा काही अपवाद वगळल्यास म्हणावा तसा अभ्यास झालेला नाही. पुराण, चरित्र, आख्यान, नागरकथा, धर्मकथा, कथासंग्रह, व्रतकथा, रास, खंडकाव्य स्तोत्र, आरत्या, पदे, लावणी असे सर्व लहानमोठे प्रकार त्यात आहेत. गद्य, पद्य, चंपू असेही प्रकार त्यात आहेत. महानुभावीय अथवा भागवतधर्मीय वाङ्मय हे अतिपरिचयाने महाराष्ट्राने आत्मसात केले आहे. जैन वाङ्मयाचाही परिचय जसा दृढ होत जाईल तसा त्यातील धार्मिकतेचा भाग दृष्टीआड होईल व त्यासंबंधी सुद्धा आपलेपणा वाटू लागेल असा विश्वास वाटतो. हे जैनधर्मीय साहित्य इतरांच्या साहित्याप्रमाणे मध्ययुगीन साहित्य आहे. पण ते केवळ मध्ययुगीन नाही. त्यापाठीमागे फार मोठा पुरातन वारसा आहे. तो मराठीत प्रकट झाला आहे इतकेच ! अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह ही या साहित्यिकांची आदर्श जीवनमूल्ये होती. ते दया, क्षमा, शांती, संयम, त्याग इत्यादि गुणांची उपासना करणारे होते. त्यावर त्यांची दृढ श्रद्धा होती. वाचकासाठी धर्मामृतकार गुणकीर्ती यांची काही वाक्ये फक्त येथे उद्धृत करतो.

" धर्म म्हणिजे दयापूर्वकु। सुक्षेत्री धन वेचिने। परोपकारी भजिने। दयादान कीजे। दीनदुखिया निरास जाउ नेदिजे। काव्हणाचे अधिक वेधावे। उने नेदावे। वाटे पडता नेघावे। कुडा लेख न करावा कोन्हाची वस्तु विसरली न राखावी। आस्त्रिसी चोहटा गोष्टी न करावी। परस्त्रीसी हास्य रांडोली न करावी। परस्त्रिये सांगोपांग निरिक्ष न करावे।" असा हा त्यांचा दृष्टिकोन निकोप व आदर्श होता.

संशोधनाची प्रगति :– माझ्या माहितीप्रमाण बिशेप पारिशवाड यांनी १९२४ च्या 'विविधज्ञान विस्तारात' 'प्राचीन जैन मराठी' हा जैन साहित्यासंबंधी पहिला लेख लिहिला. येथील सरकारी हस्तलिखित पुस्तकाचे निरीक्षण करून त्यांनी तो लेख लिहिला होता. लेखाचा शेवट करताना त्यांनी म्हटले आहे की, " पूर्वी मराठी

मुलुखात काही ठिकाणी जैनमत प्रचारात असून जैनांनी मराठीत ग्रंथरचनाही केली होती असे दिसून येईल. इकडे रसिक विद्वानांचे लक्षं असावे इतकेच विनवून हा लहानसा लेख या ठिकाणी संपवीत आहोत. ” डॉ. शं. गो. तुळपुळे, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. वि. पा. जोहरापुरकर, प्रा. ना. ग. जोशी, डॉ. श्री. रं. कुलकर्णी, डॉ. अक्कोळे, डॉ. अ. ना. देशपांडे इत्यादी विद्वानांनी अलिकडे या विषयांच्या अभ्यासात बरीच प्रगती केलेली दिसून येते; ती अधिकाधिक होईल इतकीच अपेक्षा आहे.

पेशवे बाळाजी बाजीराव यांस
दंडा राजापुरीचे इनाम
एक अप्रसिद्ध मोगली फर्मान

– डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी

सुमारे पन्नास वर्षापूर्वी आपल्या मंडळाचे एक सभासद सरदार गं. ना. मुजुमदार यांनी दिल्लीपती दुसरा आलमगीर याचे 'नानासाहेब पेशवे यांस मुख्त्यारपत्र' या लेखात एक फार्सी फर्मान दिलें आहे. हा लेख मंडळ त्रैमासिकाच्या पहिल्या वर्षाच्या पहिल्या अंकात पृ. ४१–४५ वर छापलेला आहे. सदर फर्मान हे दुसऱ्या आलमगीर बादशाहाने सदाशिवभाऊ, पेशव्यांचे दिवाण, या नात्याने त्यांच्या नावाने पाठविले असून त्यांत तत्कालिन दिल्लीतील राजकीय परिस्थिती कशी होती आणि मराठ्यांचा उपयोग मोंगल बादशाहास किती होणार होता, तसेच इमादलमुल्क अथवा दुसरा गाझीउद्दीनखान याने बादशाहास कसे छळले यासंबंधी विस्ताराने माहिती दिलेली असून शेवटी थोडक्यात त्याचा आशय असा आहे की "अशा स्थितीत श्रीमंत नानासाहेब पेशवे यांस सर्व राज्याची मुख्त्यारी देऊन आपल्या जवळ त्यांनी संरक्षणार्थ फौज सज्ज ठेवावी व राज्याची मीरबक्षीगिरी योग्य व विश्वासू माणसास द्यावी आणि आपणांस योग्य तनखा नेमून द्यावा." त्या फर्मानाची तारिख आहे जुलूस ६ जिल्हेज २६. श्री. आबासाहेब मुजुमदारांनी त्याची इंग्रजी तारिख दिली आहे ती १४ ऑक्टोबर इ. स. १७५४ त्यात थोडीशी चूक झाली असून मोडक जंत्रीप्रमाणे ही तारिख २० ऑगस्ट सन १७५९ अशी येते.

असो. या फर्मानावरून असे दिसून येते की, मोगल बादशाहा दुसरा आलमगीर हा आपल्या वजिराच्या कारस्थानांना, द्वेष बुद्धीला आणि परधार्जीण्या वृत्तीला अत्यंत कंटाळलेला होता. आणि त्यामुळे मोगलराज्य सुरक्षित राहावे असे त्यास वाटले असल्यास नवल नाही. ही एवढी मोठी राज्य संभाळण्याची जबाबदारी पेलणारी व प्रस्तुत परिस्थितीशी सर्व सामर्थ्याने टक्कर देणारी एकच व्यक्ती त्यास दिसली, आणि ती म्हणजे पेशवे बाळाजी बाजीराव. म्हणून त्यांनी उपर्युक्त फर्मान बाळाजी बाजीरावास पाठवून स्वतः जवळजवळ राज्यत्याग केलेला दिसतो. हे फर्मान जेव्हा मंडळात वाचले गेले तेव्हा त्याच्या शक्य-अशक्यतेबद्दल

---

* हा निबंध भा. इ. सं. मंडळ, पुणे, येथे ११ जुलै १९७२ या दिवशी मंडळाच्या वाढदिवसानिमित्त वाचला होता.

व त्यात आलेल्या सदोरावाबद्दल खुद्द कै. वि. का. राजवाडे यांनी शंका उपस्थित केली होती. त्यास सरदार मुजुमदारांनी योग्य ते उत्तर देऊन शंका निरसन केले होते. श्री. खरे यांनी देखील यांनी या फर्मानाच्या खरेपणाबद्दल प्रशस्तीपत्र आपल्या Seleet Articles या पुस्तकाच्या पृ. १२६ वरती दिलेले आहे.

प्रस्तुत लेख देखील याच काळातल्या दुसऱ्या आलमगीराच्या फर्मानासंबंधी आहे. सरदार मुजुमदार आणि श्री. ग. ह. खरे यांनी मांडलेला विचार म्हणजे दुसऱ्या आलमगीर बादशाहाने आपल्या राज्याची खुदमुख्त्यारी बाळाजी बाजीरावाकडे सोपविली हा होय. त्या अगोदरची राजकीय परिस्थिती आणि पूर्वपीठिका म्हणून राज्याचा एक एक विभाग बादशाहाने पेशव्यास देण्यास कशी सुरुवात केली ह या फर्मानावरून दिसून येते.

प्रस्तुत फार्सी फर्मानात दंडाराजापुरी पेशव्यांना इनाम दिल्यासंबंधीची माहिती असून हे फर्मान उपर्युक्त वर्णन केलेल्या व श्री. आबासाहेब मुजुमदार यांनी प्रसिद्ध केलेल्या फर्मानाच्या अगोदर साधारणपणे किमान आठ महिने तरी पेशव्यांना बादशाहाने पाठविले होते असे दिसते.

कांही दिवसापूर्वी प्रस्तुत लेखकाने हैद्राबाद येथील दप्तरखान्यास संशोधनाच्या निमित्ताने भेट दिली होती. तेव्हा त्याला आंध्रप्रदेश पुरातत्त्व विभागात सदर फर्मान सापडले. हे फर्मान ४५ इंच लांब आणि २० इंच रुंद अशा कागदावर लिहिले असून त्या कागदावरती उभ्या सोनेरी पट्ट्या काढलेल्या आहेत. तसेच त्या वरती काही भूमितीत सापडतात त्याप्रमाणे आकृत्या काढलेल्या आहेत. फर्मानाच्या सर्वात वरच्या बाजूस बिस्मील्लाह उररहमान उरहीम असे लिहिलेले आहे. त्याच्या खाली बादशहाचा तुगरा कोरला आहे. त्याचा आकार ४"×४" असा आहे. तुगऱ्याच्या उजव्या बाजूस वर्तुळाकार आकृती असून त्यात छोटी छोटी वर्तुळे काढलेली आहेत. त्यामध्यें साहेब किरानपासून जहाँदरशाहापर्यंतची नावे आहेत. मध्यभागी आलमगीर बादशाहाचे नाव आणि हिजरी ११६७ हे दिलेले आहेत. या फर्मानात एकंदरीत ९ ओळी असून त्या प्रत्येक ओळीमध्ये ४ इंचाचे अंतर आहे. फर्मानाचा सारांश थोडक्यात असा–

" बादशाही फर्मान सादर झाले आहे की सुभे...असलेल्या दंडाराजापुरीतील सर्व महाल हे इनाम म्हणून बाळाजी बाजीराव यास त्याच्या मुलासह खाली दिल्याप्रमाणे मुकर केले आहेत; म्हणून अधिकाऱ्यांनी, उच्च उमरावांनी, दिवाणीच्या मुतसद्यांनी, जागीरदारांनी, करोडीच्या अधिकाऱ्यांनी या हुकमाची अंमलबजावणी करावी. महाल मजकूर हे उपर्युक्तांनी त्यांच्या अबदालिने आणि वंशजांनी आपल्या ताब्यात घेऊन त्याचा उपभोग घ्यावा. सदरील महाल हे तगीर करता येणार

नाहीत. तसेच सुभेदारीची पेशकश, फौजदार व दिवाणीचे कर उदा. कलगा वगैरे बिगार, शिकार, दहनिमी, मुकदमी, सरदुश्री कानोनगोई हे माफ केलेले असून त्याबद्दल अडथळा आणू नये. उत्पन्नातील वाढ, दिवाणी कर, बादशाही कर हे सर्व माफ केले आहेत असे समजावे. याबाबत ताकिद जाणावी. प्रतिवर्षी सनद तलब करू नये. या बादशाही फर्मानाबद्दल दिरंगाई अथवा विरुद्ध वर्तन करू नये."

ता. ५ जमादिलाखर जुलूस ५ (आलमगीर दुसरा) [४ जानेवारी सन १७५९.]

या फर्मानामुळे दोनतीन प्रश्न उपस्थित होतात. दंडाराजापुरीवर त्या काळात प्रत्यक्ष कोणाचा ताबा व अंमल होता? दुसरा प्रश्न असा की फर्मान मिळाले म्हणून पेशव्यांना प्रत्यक्ष दंडाराजापुरीचा ताबा मिळाला का? आणि तिसरा प्रश्न असा की बादशाहाने दंडाराजापुरीचे फर्मान कुठल्या राजकीय दबावाखाली पेशव्याना दिले? किंवा हे फर्मान देण्यामागे त्याचा कोणता राजकीय हेतू होता?

दुसऱ्या आलमगीराने पेशव्यांना प्रस्तुत फर्मान कुठल्या कारणाने दिले हे इतिहासात नमूद नाही; परंतु दिल्ली राजधानीतील त्या काळची एकंदर राजकीय परिस्थिती कशी होती ते बघितले पाहिजे; म्हणजे यासंबंधी थोडासा समाधानकारक खुलासा होईल असे वाटते.

१७५२ मध्ये गाझीउद्दीनाचा खून झाला. त्यानंतर सफदरजंगाच्या साह्याने गाझीउद्दीनाचा मुलगा हा बक्षी झाला. त्याने ताबडतोब सफदरजंगाविरुद्ध मोहीम उघडली आणि रघुनाथराव पेशवे आणि मल्हारराव होळकर जे उत्तरेत होते त्यांना दिल्लीला बोलावले. होळकरांच्या मदतीने अहमदशाह बादशाहास पदच्युत करण्यात आले व गाझीउद्दीनाने त्याचे डोळे काढून त्यास आंधळे केले आणि त्यानंतर दुसऱ्या आलमगीरास सन १७५४ जून २ या दिवशी राज्यावर बसविले. या काळात सफदरजंग मरण पावला. गाझीउद्दीनाची दुष्टपणाची वागणूक, तसेच तो अहमदशाह अबदालीस मिळून स्वतः बादशाहाचे जीवित आणि राज्य दोन्हीही धोक्यात आणील अशी परिस्थिती निर्माण झालेली होती. त्याच्या अगोदर काही काळ मराठ्यांनी उत्तरेत अटकेपर्यंत जाऊन मोठे यश संपादन केले होते. मोठे विजय मिळाल्यामुळे राजकीय दृष्ट्या पेशव्यांचे पारडे फार जड झाले होते; आणि आता पेशव्यांच्या शक्तिशाली सैन्याशिवाय आणि त्याच्या संरक्षणाशिवाय मोगल साम्राज्याचे अस्तित्व संपले असते. हे जाणून बहुधा, बादशाहाने पेशव्यांच्या इच्छेनुसार काही राजकीय अटीवरती त्यांना दंडाराजापुरीचे फर्मान दिलेले दिसते.

दंडाराजापुरीवरती यापूर्वी कित्येक वर्षं सिद्यांचा अंमल होता आणि सिद्दी हे स्वतःस मोगल बादशाहाचे अंकित समजत होते असे तत्कालीन कागदावरून तरी

वाटते. पण केंद्रीय सत्ता एकदा दुर्बल झाली म्हणजे लहान लहान सत्ताधीश देखील केंद्रीय सरकारचे हुकूम मानतीलच असे काही नाही. याच तत्त्वाप्रमाणे पाहता सिद्यांनी या फर्मानाप्रमाणे अमल करून दंडाराजापुरी प्रत्यक्ष पेशव्यांच्या ताब्यात दिली किंवा नाही हे पाहण्यासारखे आहे. दंडाराजापुरीचे व्यापारी आणि राजकीय दृष्टया असलेले महत्त्व सिद्दी आणि इंग्रज चांगले ओळखून होते.

दंडाराजापुरी हे सिद्यांच्या ताब्यात होते व ते त्यांच्याच ताब्यात राहावे म्हणून मुंबईकर आणि सुरतकर इंग्रज फार खटपट करीत होते. वेळ पडेल त्याप्रमाणे ते त्यांना पैशाची व दारुगोळयाची मदत देखील करीत. अर्थात हा कारभार छुपेपणे चाले; कारण आपण अशा तऱ्हेची मदत सिद्यांना करतो आहोत असे जाहीर झाले असते म्हणजे सिद्यांचे जे शत्रू मराठे ते त्यांचेही उघडउघड शत्रू झाले असते. इ. स. १७५५ मध्ये सिद्दी मसऊद मरण पावला; व त्याच काळात आंग्रे आणि पोर्तुगीज यांचा इंग्रजांना होणारा त्रास बराच कमी झाला. (फेब्रु. १७५६) तेव्हा आता फक्त मराठेच काय ते त्यांचे वरचढ असे शत्रू शिल्लक राहिले होते. आणि अशा परिस्थितीत दंडाराजापुरी सिद्यांच्याकडून पेशव्यांच्या हाती गेली तर त्यामुळे इंग्रजांच्या समुद्रावरील अस्तित्वास मोठाच धोका निर्माण झाला असता असे इंग्रजांना वाटल्यास नवल नाही; म्हणून दंडाराजापुरी पेशव्यांच्या ताब्यांत जाऊ नये यासाठी इंग्रजांनी अतोनात कारस्थाने केलेली दिसतात.

इ. स. १७५८ मध्ये मानाजी आंग्र्यांचा काही मुलूख सिद्यांनी घेतला. तेव्हा मानाजीने पेशव्यांकडे मदतीची याचना केली आणि याच वर्षी सिद्यांच्या ताब्यांत असलेल्या दंडाराजापुरीवर हल्ला केला. परंतु दुर्दैवाने मानाजी आंग्रे आजारी पडल्यामुळे त्याच्या लोकांना रिकाम्या हाती परतावे लागले आणि कुठल्याही प्रकारचे यश आंग्र्यांना लाभले नाही. दंडाराजापुरी काबीज करण्याचा मनसुबा अर्धवटच राहिला. (आंग्रे शकावली पृ. ११७ कुलाबकर आंग्रे ढब) यावेळी सिद्यांचा सरदार सिदी मुहमद (बहुधा सिद्दी मसअदाचा मुलगा) हा होता. पुढे सप्टेंबर महिन्यांत मानाजी आंग्रयांचा मृत्यू झाला आणि रघोजी आंग्रे कुलाब्याच्या गादीवर बसला; परंतु दंडाराजापुरी आणि सिद्यांचे हे दुखणे तसेच अर्धवट राहिले. याबद्दल खुद्द पेशव्यांचे विचार देखील लक्षात घेण्यासारखे आहेत. सप्टेंबर १९ ला पेशव्यांनी गोवेकराना जे पत्र लिहिले त्यांतील मजकूर असा–

" दंडाराजापुरी सरकारची मसलत आहे. तुम्ही जहाजे इ. ची संजुता करून सामील होणे, राजापुरीवाले तुम्हास लोभ दाखवून कुमकेस बोलावतील कदाचित ममतेस गुंतोन जाल तर आधी तुमचे पारिपत्य होईल. तुळाजी आंगरे याजवर पेशजी मसलत जाहली ते समयी तुम्ही उपराला करावयाची कबुलात करून २॥

लाख रुपये आंग्र्यांकडून नेले ते रुपये सरकारचे आहेत. कारण आंग्र्यांचा मुलूक कोट सरंजाम इ. सर्व कारभार सरकारकडे आले तरी ते रुपये पाठवावे. सौंधेकराचा मुलूक सरकारचे स्वराज्य आहे. त्यातील कूर्मगड व सदाशिवगड तुम्ही घेतले ते नारायण भास्करचे स्वाधीन करणे हे गोष्ट जालियाने फिरंगी दबाव पोचून वळवळ करणार नाहीत." (आंग्रे शकावली पृ. ११९ कुलाबकर आंग्रे)

यावरून असे अनुमान काढता येईल की पेशव्यांना दंडाराजापुरी आपल्या ताब्यात पाहिजे होती. त्यासाठी गोवेकरांना सिद्दीला मदत करण्यापासून दोन हात लांब ठेवले. परंतु प्रत्यक्ष परिस्थिती काय होती ? मुंबईकर इंग्रज यांना दंडाराजापुरी आणि जंजीरा सिद्यांकडेच रहावा असे मनोमन वाटे. १७५९ साल संपेपर्यंत तरी पेशव्यांना दंडाराजापुरी आपल्या ताब्यात आणता आली नाही. फेब्रुवारी १७६० मध्ये जंजिऱ्याचा सिद्दी मुंबईस गेला. तेव्हा मुंबईकर इंग्रजांनी त्याच्या परतीचा बंदोबस्त फारच पक्का केला होता; कारण त्यांना अशी भीती वाटत होती की, " For if he were to fall in the hands of the Marathas, Danda Rajpuri would naturally became a Maratha fief."

(Banaji D. Rd. Bombay the Sidis P. 139)

मुंबई सोडावयाच्या अगोदर सिद्याने इंग्रजास सांगितले की मराठ्यांचे सतत हल्ले होत आहेत आणि त्यांच्याशी सामना देण्यासाठी मजजवळ पैसा अथवा दारुगोळा काहीही नाही. असे जरी त्यांनी सांगितले तरी इंग्रजांना उघडपणे पेशव्यांच्या विरुद्ध सिद्दीला मदत करणे शक्य नव्हते. तसेच त्यांना मदतही नाकारता येत नव्हती. त्यांची मनःस्थिती त्यांच्याच शब्दात सांगावयाची म्हणजे–

" For if the Marathas took possession of Danda Rajpuri, they would become very formidable neighbours..." " If the Marathas become masters of Janjira they would be more troublesome to the English in their demands about the tankha at Surat than the Sidis. In case they did not assist the Sidis, their desparate state of affairs night induce them to ask help of the Dutch.."

म्हणून इंग्रजांनी सिदीला पैसे व दारुगोळा यांची मदत देण्याचे ठरविले. यांचे तात्पर्य एवढेच की जानेवारी १७५९ मध्ये दंडाराजापुरी पेशव्यांना इनाम दिल्याबद्दलचे बादशाही फर्मान हाती पडून देखील प्रत्यक्ष दंडाराजापुरी अथवा त्यातील महाल प्रत्यक्षात पेशव्यांच्या ताब्यात पुढे वर्षभर तरी आलेले दिसत नाहीत. किंबहुना मराठ्यांना ते जिंकून घेणे देखील किती कठीण होऊन बसले होते हे

तत्कालीन राजकीय परिस्थितीचे अवलोकन केल्यावर आपल्या लक्षात सहज येते. उपर्युक्त फर्मान आणि त्यावरील विवेचनाचे थोडक्यात तात्पर्य एवढेच की पेशव्यांनी ज्या विशिष्ट राजकीय हेतूने (सिद्यांची दंडाराजापुरीतून; हकालपट्टी, इंग्रजांना समुद्रावरती शह देऊन मराठी सत्ता आणि वर्चस्व तिथे कायम करणे) हे फर्मान दिल्लीच्या मोगल बादशहाकडून मिळविले होते; पण त्यांचा प्रत्यक्षात त्याना फारसा लाभ झालेला दिसत नाही असे वाटते.

श्रीशिवछत्रपतींच्या स्वराज्यसंस्थापनेची पार्श्वभूमी*

लेखक– प्रा. ग. ह. खरे

भाषांतर –डॉ. चिं. ना. परचुरे

छत्रपति श्री शिवाजी महाराजांनी स्वतःकरिता, आपल्या वारसांकरिता आणि बहुसंख्येत असलेला जो हिंदू समाज त्याच्यासाठी मराठ्यांचे राज्य उभारून दाखविले. अत्यंत प्राचीन कालापासून हिंदूंचे पूर्वज ह्याच भूमीत राहिले होते आणि तिच्यासाठीच लढले होते. स्वातंत्र्य संपादन करण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी शिवाजी महाराजांच्या काळात असलेल्या मोगल, विजापूर, सिद्दी, पोर्तुगीज आणि राज्य करणाऱ्या इतर छोट्या शक्तिसंपन्न अशा किती तरी परकीयांशी त्याना नेटाने झगडा द्यावा लागला होता. ह्या परकीय शक्ती येथे किती दीर्घ काल स्थिरावल्या किंवा क्षणिक काल विसावल्या असा प्रश्न नव्हता; तर या सर्व शक्ती परकीयच होत्या यासंबंधी महाराजांची आणि त्यांच्या अनुयायांची संपूर्ण खात्री होती. कळत वा न कळत या परकीय शक्ती हिंदूंची संस्कृति उध्वस्त करीत आहेत, हिंदू धर्म पुसून टाकीत आहेत, संस्कृत भाषा आणि अत्युत्तम भारतीय वाङ्मय यांचा पूर्ण नाश करीत आहेत याबद्दल त्यांची मनोमय खात्री पटली होती. या परकीय राज्यांतून रोजचे जीवन जगताना हिंदूंना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागत असे. त्याचबरोबर परकीय सत्तेने निर्माण केलेली विषमता आणि अन्याय स्वदेशी नागरिकाना नित्य चटके देत होते; किंबहुना हाच ह्या परकीय राज्यकर्त्यांचा मूळ पिंड होता. माझी ही विधाने सबळ आणि विपुल पुराव्यानिशी मी सिद्ध करू इच्छितो. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांमुळे जिचा जागतिक परिस्थितीत शक्तिपात झाला अशा ब्रिटिश अमदानीशी तुलना करून मी माझे सिद्धांतच सत्य असल्याचे दाखवू शकेन असा मला विश्वास आहे.

विचारार्थ घेतलेल्या या कालखंडात हिंदू, मुसलमान किंवा ख्रिश्चन अशा कोणत्याही समाजातील व्यक्तीस स्वतःच्या धर्माबद्दल आत्यंतिक आदर होता. या काळातील व्यक्ती अत्यंत निष्ठेने स्वतःला आकलन झालेल्या स्वधर्म-तत्त्वाचे पालन करण्याचा प्रयत्न करीत असे. यात बहुसंख्येने असलेल्या हिंदू प्रजेचे मात्र परकीय राज्यकर्त्याकडून धर्मांतर सुरू झाले होते. धर्मांतराबरोबरच हिंदू संस्कृतीचा व

*Khare G. H. Why Shivaji the Great fought for Independence?

वाङ्मयाचा सर्व उपलब्ध मार्गाने विध्वंस करीत मुसलमान आणि ख्रिश्चन राज्यकर्ते हिंदुस्थानात आपली राजकीय सत्ता वाढवीत होते व ती मजबूत बनवीत होते. विशेषतः ख्रिश्चन धर्मीय असलेल्या पोर्तुगीजांनी कोणत्या पद्धतीने भारतात स्वसत्ता वाढविण्याचा यत्न केला ह्याचे बारकावे सांगणे या लहानशा लेखात शक्य नाही. स्वतंत्रपणेच चिकित्सा करावयास पाहिजे असा हा विस्तृत विषय आहे. पोर्तुगीजांनी बळकावलेल्या व त्यांनीच उध्वस्त केलेल्या गोव्यातील हिंदू–मंदिरांची मोजदाद, भग्न केलेल्या मूर्ती, किंवा खेडवळांच्या बळजबरीने घडवून आणलेल्या धर्मांतरांचे साद्यंत वृत्त Balettin Instituto Varcodq Garnq (dated circa 1540 A C.) च्या ६८ व्या कलमात विस्तृतपणे दिलेले आढळते. ह्या विषयासंबंधीचे गोव्याचे संशोधन यापूर्वीच प्रसिद्ध झाले आहे [१] त्यावरून पोर्तुगीजांची राज्यपद्धती मुसलमान राज्यकर्त्यांपेक्षा अधिक पद्धतशीर आणि भयानक होती असे म्हटल्यास आपल्या विषयापुरते ते पुरेसे होईल.

मुसलमान राज्यकर्त्यांनी विशिष्ट हेतूने पावले टाकण्यास प्रारंभ केला होता. नगरांना आणि खेडेगावांना अरेबिक आणि पर्शियन नावे देऊन हिंदू संस्कृति नष्ट करण्याची एक विशेष योजना त्यांनी अंगिकारली होती. या योजनेमुळे केवळ महाराष्ट्रातीलच सुमारे दोनशे महत्त्वाच्या स्थानांचे पुनर्नामकरण झालेले दिसून येते. थेट औरंगझेबाच्या मृत्यूपर्यंत ही नामकरण पद्धती चालूच होती. या पद्धतीत प्रथम दिलेले वा पडलेले मुसलमानी नाव बदलून पुन्हा इस्लामी नाव देण्याचे प्रकारही क्वचित स्थानी आढळतात. मिरजेचे असेच उदाहरण देता येते. पहिल्या बहमनी सुलतानांनी मिरज[२] जिंकून घेतल्याबरोबर त्या शहराचे मुबारकबाद असे नामकरण केले. पुढे हे नाव बदलून आदिलशाही राजवटीत त्याचे मूर्तझाबाद असे नामकरण करण्यात आलेले आढळून येते. पुढे ब्रिटिशांनी मात्र असे धोरण क्वचित्च अवलंबिलेले दिसते.

अशा नामकरणांशिवाय मुसलमानांनी आणखी एक महत्त्वाची आणि निंद्य गोष्ट केली. येथील मंदिरे पाडून, समाध्या उध्वस्त करून किंवा मठ किंवा विहार नष्ट करून, तसेच धार्मिक तलाव किंवा कुंडे अपवित्र करून, आणि प्रामुख्याने या सर्व ठिकाणच्या हिंदू देवतांच्या मूर्ती भग्न करून त्या त्या इमारतीचे मशिदीत किंवा दर्ग्यात रूपांतर करणे हीच ती कृती होय. असे केलेले रूपांतर सहज ध्यानात येते. मंदिरामध्ये काही किरकोळ बदल करून, किंवा मंदिरांच्या पश्चिमेकडील भिंतीला मेहरब बसवून, त्या शेजारी मिंबारची उभारणी करून, एखाद्या मंदिराचे उंच शिखर पाडून त्यालाच घुमटाचा आकार देऊन, किंवा काही स्थानातील समाध्या हलवून आणि त्या ठिकाणी कबरी बांधून मुसलमानांनी असे धार्मिक बदल घडवून आणलेले आहेत. केवळ दक्षिणेत किंवा महाराष्ट्रात

सरकारी कागद पत्रांच्या आधारे किमान असे दोनशे बदल मी दाखवू शकेन. याचमुळे विजापूर किंवा सोलापूर यासारख्या किल्ल्यांच्या भिंतीतून पूर्ण मंदिरे गाडून टाकलेली पहाण्यात येतात; तर कोठे कोठे मंदिरे किंवा धार्मिक स्थाने उध्वस्त करून त्या दगडविटांच्याच साहाय्याने मशिदी किंवा इतर मुसलमानी इमारती उभारलेल्या दिसून येतात. मोठ्या हिंदू मंदिरांचे परिवर्तन करणे अशक्य आहे किंवा विशिष्ट स्थान कायम स्वरूपात आपल्या ताब्यात टिकवून धरणे शक्य नाही असे ध्यानात आल्यास त्या विशिष्ट स्थानाबद्दल मुसलमान राज्यकर्ते निराळाच मार्ग अवलंबीत. अशा मंदिरांचे अधिकाधिक नुकसान ते घडवून आणीत. त्यातील प्रमुख मूर्ती आणि त्याबरोबरच कलात्मकतेसाठी किंवा शोभेसाठी उभारलेल्या इतर शेकडो मूर्ती यांचा ते सरळ विध्वंस करीत. स्थानापन्न केलेल्या मूर्ती जागेवरून हालवून त्या अंधारात इतरत्र फेकुन दिल्या जात, किंवा (इतर इमारतींच्या) पायांत गाडून नष्ट करून टाकीत. अशा मूर्ती हालविणे शक्य असल्यास ठीकच ! अन्यथा नाक, कान, मस्तक किंवा हातपाय अगर छाती विद्रूप करून हे राज्यकर्ते मानवी मूर्ती विछिन्न करीत. यावर कोणी स्वतःच्या कल्पनाशक्तीने असेही म्हणेल की या सुन्दर वस्तूचा नाश करण्याचे दुष्कृत्य केवळ मूर्तीभंजकांनीच केलेले नाही. वास्तूंचा आणि मंदिरांचा हा प्रचंड नाश होण्यास निसर्ग आणि मानवी दुर्लक्ष तसेच जणू बेफिकिरी यांचे संघटनच त्यास कारण आहे. त्यांच्या या कल्पनेत सत्याचा काही अंश आहेच. परंतु त्याचा प्रभावही तितकाच क्षुल्लक आहे.

अशा प्रकारे मुसलमान राज्यकर्त्यांनी हिंदुधर्मीयांची जी अपरिमित हानी केली त्यासंबंधीचे भरपूर पुरावे आपणाजवळ उपलब्ध आहेत. परंतु ते सर्व आज अबोल झाले आहेत. ते येथे बोलके करावयास हवेत. असे दोन प्रकारचे लेखी पुरावे आहेत. बहुतेक सर्व मुसलमानी इतिहासकार असा डांगोरा पिटतात की अनेक मुसलमान राजांनी आपल्या शेजारी राजांविरुद्ध वारंवार जिहाद (धर्मयुद्धे) पुकारली आणि त्यावेळी हिंदूप्रजाजनांना लुबाडले, त्यांची मंदिरे व पवित्र ठिकाणे तोडली-मोडली, मूर्तीभंजन केले आणि मृत्यूदंडाचा धाक दाखवून हिंदूंना जबरदस्तीने बाटविले. यातला बाटवाबाटवीचा भाग कदाचित अतिशयोक्तीचा असेल (तो शब्दशः खरा मानला तर आज मुसलमानांची संख्या प्रचंड झाली असती !) परंतु मंदिरे व मूर्ती यांच्या विध्वंसनाचा भाग सत्यच मानावा लागतो. तत्कालीन शिलालेखातहि त्याला उपोद्बलक माहिती मिळते. विजापूर येथील अब्दलपूरच्या सबर्बन भागात चिंदगी पीराच्या परिसरात एका खांबावरील शिलालेखात हा पुरावा सापडतो. हा मराठी शिलालेख अप्रकाशित आहे. शिवाजीचा जो प्रमुख प्रतिस्पर्धी अफजलखान

त्याने या शिलालेखात स्वत:ला शिकंदर इ. बनियाद इ–बुतान आणि कातील–इ–मुतमरिदान व काफीरान अशी विशेषणे लावून घेतली आहेत. (या गुणविशेषणांचा अर्थ ध्यानात घेता) ही गुणविशेषणे (प्रवृत्ती ध्यानात येण्यास) अधिक सूचक नाहीत का? असाच सूचक आणि निष्कर्ष काढण्यास उत्कृष्ट असा आणखी एक पुरावा देतो. पुणे जिल्ह्यात घोडनदीच्या किनाऱ्यावर घोडे नावाचे छोटे खेडेगाव आहे, तेथील मशिदीच्या खांबावर हिजरी ९९४ (इ. स. १५८६) मधील पर्शियन लिपीतील लेख आहे. ज्या कारणाने संबंधित व्यक्तीने हा लेख कोरला त्यात त्याने स्वत:च लिहून ठेवले आहे की, अल्लाची मर्जी संपादण्यासाठी त्याने तेहेतीस मंदिरे पाडली आणि त्यांच्या (दगडांच्या) साहाय्याने या खेड्यातील मशिदीचा पाया घातला. या खेड्याचे नाव त्याने खराबाबाद असे ठेवले. घोड्यांचे पाण्यापेक्षा हे गाढवांच्या लघवीचे स्थान आहे असा अर्थ सूचित करणाऱ्या नावाचे हे उदाहरण निष्कर्ष काढता येण्याजोगे नव्हे का? ब्रिटिश राज्यकर्त्यांनी तरी (राजकीय) धोरण म्हणून अशा गोष्टी घडविल्या होत्या का?

कर:–मुस्लिम राज्यकर्त्यांनी अन्य धर्मीय आणि राज्यात राहू इच्छिणाऱ्या किंवा तेथील नागरिक हक्क प्राप्त करून घेणाऱ्या व्यक्तींवर जिझिया हा कर लादला होता. परंतु हिंदुस्थान हा कधीच मुस्लीम–देश नव्हता. अति प्राचीन काळापासून हिंदू येथे स्थायिक झाले. मुसलमान राज्यकर्ते हे भारतात आगंतुक किंवा आक्रमक म्हणावे लागतात. भारतावर केलेल्या स्वाऱ्यांत जरी त्यांना यश प्राप्त झाले, ते जरी येथे कायमचे रहिवासी बनले, त्यांच्यातील काही राज्यकर्ते झाले, तरीसुद्धा त्यांच्याही पूर्वी, प्राचीन काळापासून जे येथे स्थायिक झाले, त्या हिंदूंवर 'जिझिया' लादण्याचा त्यांना काही अधिकार पोहोचतो का? निश्चितच नाही. परंतु आपणच येथील प्रारंभापासूनचे राज्यकर्ते आणि हिंदू सरदार हेच जणू उपरे अशा खंबीर (परंतु चुकीच्या) विश्वासाने अनेक मुसलमान राज्यकर्त्यांनी आपल्या हिंदू सरदारांवर हा 'जिझिया' कर बसविला आणि पूर्णशाने वसूल केला असे आढळते. दिल्लीच्या सल्तनेतील अनेक सुलतानांनी आपल्या हिंदू सरदारांवर किंवा नोकरांवर हा कर बसवून त्याची वसुली केली आहे. गुजराती आणि फरुकी सुलतानांनी ही गोष्ट केली. १७ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात म्हणजेच निजामशाहीचा हळूहळू अस्त होत असताना जकात-इ-हिंदूवानी ह्या नावाने किमान उत्तर कोकणच्या प्रदेशातून हा कर असाच वसूल केला जात होता असे दिसते. त्या काळातील राज्यव्यवहारविषयक मूळ कागदपत्रात ह्या कराचे उल्लेख आलेले आहेत. हाच कर निजामशाहीतील इतर प्रदेशातील हिंदूकडून वसूल केला जात होता का हे मला निश्चित सांगता येत नाही. कारण ह्या प्रदेशातील व काळातील ह्या विषयासंबंधीचे भरपूर आणि अस्सल मूळातील कागद उपलब्ध नाहीत. आदिलशाही सल्तनतीत 'गनाचारी' नावाचा ह्याच प्रकारचा कर लादला जात असे.

एका शेतकऱ्याच्या संबंधात महंमद आदिलशहाच्या जुमद १, १०५७ हिजरी (इ. स. २६–५–१६५७) ह्या तारखेच्या पत्रात ह्याचा उल्लेख आलेला आहे. ह्या पत्रावरून सोलापूर मामल्यातील लिंगायत समाजाकडून हा कर साधारणतः वसूल केला जात असे हे स्पष्ट होते. पुढे हा कर काढून टाकल्यावर त्याच्याऐवजी खाना-खुशी नावाचा नवीन कर त्यांच्यावर बसविण्यात आला. तो बसविण्यासाठी लिंगायत समाजाचे चार वर्ग करण्यात आले. साधारणतः पहिल्या वर्गातील कुटुंबाला ३/८ होन (रु. १·५०); दुसऱ्या वर्गाला १/४ होन (रु. १); तिसऱ्या वर्गाला ६/१६ होन (पैसे ७५) आणि चौथ्या वर्गाला १/१६ होत (पैसे २५) असा कर भरावा लागत असे. हा कर कुटुंबाकडून वसूल करण्याचा होता का, तसेच तो केवळ सोलापूर मामल्यातील लिंगायतांकडून किंवा संपूर्ण समाजाकडूनच वसूल केला जात होता की काय ते मला निश्चित सांगता येत नाही. जरा व्यापक दृष्टीकोन घेऊन मी असे गृहीत धरतो की हा केवळ कौटुंबिक कर होता. तसेच सोलापूर मामल्यातील येथील लिंगायत कुटुंबाकडूनच केवळ तो वसूल केला जात असे. परंतु असे मानले तरी दक्षिणेकडील मराठी प्रदेशाकडून ‘ गणाचारी ’ नावाचा एक कर वसूल केला जात असल्याचा पुरावा मिळतोच. विशिष्ट रयतेवर कर लादणे आणि विशिष्ट प्रजेला त्यातून सूट देणे हे मूलतः प्रजेतील विषमता दर्शविणारे आहे. त्यावेळी लिंगायतांमध्येच काही मशागत करणारे शेतकरी किंवा काही व्यापारीही होते. विजापूर कारकीर्दीचा संपूर्ण इतिहास किंवा तेथील प्रत्येक जुन्या कारकीर्दीचा कालक्रम खंडीत न झालेले अधिकृत कागदपत्र उपलब्ध नसताना ह्यासंबंधी सर्वसामान्य विधान करणे धोक्याचे होईल. तरी एकादा नियम सिद्ध करतांना, ‘ त्यासाठी एक निश्चित आणि स्पष्ट उदाहरण पुरेसे आहे ’ असे पूर्वीच्या लंडन विद्यापीठाचे इतिहासाचे प्राध्यापक हर्नशॉ ह्यांनी इतरत्र म्हटले आहे. आपल्याला हे ध्यानात घेतले पाहिजे की, सूक्ष्म इतिहास ठाऊक नसतानाही ‘ जिझिया ’ कर लादणारे औरंगजेब किंवा इतर मुसलमान राज्यकर्ते यांच्या काही किरकोळ संदर्भावरूनच (बॅलन्स), जिझीया हा कर प्रादेशिक आणि हंगामी स्वरूपाचा होता असा निश्चित निष्कर्ष इतिहासकारांना काढावा लागला आहे. असे असूनही ‘ बसाती नुस्सतीन ’ मध्ये महंमद आदिलशाहच्या राजवटीतले, जे हिंदूंनी मानले पाहिजेत किंवा सहन केले पाहिजेत असे जे इतर कायदे (नियम) आहेत त्यांत केवळ ‘ जिझिया ’ सारखाच हेतू असलेला कर दस्तुरुल अमहेन सूचित केलेला आढळतो.

१७ व्या शतकात तत्कालीन महाराष्ट्रात मुसलमानी राज्यात कशी विषमता होती ते वरील दोन करांच्या उदाहरणांनी ध्यानात येऊ शकेल. वरील माहिती भारत इतिहास संशोधक मंडळाच्या शक १८३५ च्या वार्षिक संशोधन वृत्तांत पष्ठ क्रमांक ४५२ ते ४६५ वर प्रसिद्ध केलेल्या व रूमाल क्रमांक ४८, ४९ व ५०

ह्या पुण्याच्या अलायनेशन (Alienation) ऑफिसमध्ये संशोधनासाठी ठेवलेल्या कागदातील करविषयक कायदे किंवा नियमांवरून घेतलेली आहे. या कागदातून तत्कालीन पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील वरील विषयासंबंधीची माहिती आली आहे.

'भूत फरोसी' हा करदर्शक असा विशेष शब्द आहे. 'मूर्तीची विक्री' ह्या अर्थी असलेल्या 'बत्–फरूशी' ह्या शब्दाचे हे प्रथम दर्शनी अपभ्रंशित रूप वाटते. परंतु ज्या कल्पनेने आणि पद्धतीने मूळ कागदपत्रातून 'बतपरास्ती' हा शब्द वापरला गेला आहे तेथे 'मूर्तिपूजा' हाच त्याचा अर्थ गृहीत होता. गांगुली आणि बसू ह्यांनी संपादित केलेल्या विल्सनच्या कठीण शब्दकोशात त्याचा जरा चुकीचा अर्थ दिला असला तरी व्यवहारतः त्याचे कृदन्त किंवा साधित शब्द हा मुख्य अर्थाच्या जवळचाच दाखविला आहे; असा शब्द आहे 'परवरीश' (म्हणजेच मूर्तींचा उत्सव किंवा समारंभ). हा 'कर' होता आणि तो केवळ हिंदूकडूनच वसूल केला जाई हेच ह्या कागदपत्रावरून सर्वप्रथम ध्यानात येते. सार्वजनिक स्थानी जे पूजा करीत, अशा हिंदूंवर हा कर लादला जात असे. केवळ विशिष्ट ठिकाणी, विशिष्ट खेड्यात किंवा शहरातच हा कर बसविलेला नसून विशिष्ट देवतेसाठी आणि प्रसिद्ध नसलेल्या कोणत्याही स्थानावरून हा कर हिंदूंकडून वसूल केला जात असे. बाहेरच्यापेक्षा मोठ्या शहरातील हिंदूकडून तो कमी प्रमाणात घेतला जात असे. हा कर निझामशाही आणि मोगल काळातही वसूल केला जात असे.

करविषयक अशी माहिती दिल्यावरही त्याबाबत काही मुद्दे अस्पष्ट किंवा अपूर्ण रहातात. परंतु मी जी माहिती दिली आहे ती तत्कालीन करांचे स्वरूप कळण्यास पुरेशी आहे असे वाटते. हा सार्वत्रिक कर होता आणि तो मूर्तिपूजकांकडून वसूल केला जाई असेच मला वाटते. प्रार्थना करणाऱ्या किंवा नमाज पढणाऱ्या मुसलमानांकडून हा कर वसूल न करता केवळ पूजा करणाऱ्या हिंदूकडूनच तो वसूल केला जात असे हे माझे मुख्य म्हणणे आहे. तत्कालीन समाजात राज्यकर्त्यांनी पाडलेली ही स्पष्ट विषमताच म्हणावी लागते.

ज्याला विक्रीवर म्हणतात त्यासारखा दुसराही एक कर त्या काळात पहावयास मिळतो. हा कर घोडी, बैल, म्हशी, वैरण अशासारख्या विक्रीसाठी आणलेल्या व्यापारी वस्तूवर लादला जात असे. विक्रीसाठी आणलेल्या प्रत्येक जनावरामागे हिंदूला ५ नाणी आणि मुसलमानाला २॥ नाणी असा हा कर द्यावा लागे. जनावराप्रमाणे धान्याच्या विक्रीवर किंवा इतर वस्तूंच्या व्यापारावरही हिंदूला ५ टक्के तर मुसलमानास २॥ टक्के

या प्रमाणात हा कर भरावा लागे. परंतु गोहत्येला मात्र सुविधा प्राप्त व्हावी आणि त्यासाठी गो–विक्री वाढावी ह्या कल्पनेने ती ह्या करापासून वगळण्यात आलेली होती. खरोखर ही तफावत नाही का ? ह्याला विषमता म्हणावयाची नाही का ? अशा प्रकारचा एखादा कर ब्रिटिश राजवटीत तरी आपणास दाखविता येतो का ?

राज्यकारभार–लष्करी-ब्रिटिशांच्या राज्यात अगदी नजिकच्या काळापर्यंत कार्यक्षम, समर्थ किंवा लायक असूनही एकही भारतीय व्यक्ती स्वकर्तृत्वाने लष्करातील उच्च पद भूषवू शकली नाही. साधारणतः इसवी १९२० पर्यंत इंडियन कमिशन्ड ऑफिसर आणि इसवी १९४७ पर्यंत ब्रिगेडियरच्या वरील लष्करी अधिकाराची जागा हिंदी व्यक्तीस लाभलेली नाही. हे ब्रिगेडियरही संख्येने कमीच होते.

शिवपूर्वकालाचा विचार करता शहाजी भोसले हा अतिशय नामांकित अग्रेसर असा मराठा सेनापती झाला हे सर्वसंमत आहे. अशा शहाजीला मुघली सेवेत येताना इसवी १६२९ मध्ये सर्वसामान्य अशा केवळ पाचहजारी सरदारांची मनसब देण्यात आली होती. विजापूर सुलतानांमध्ये अतिशय मोठ्या मनाचा आणि उदार अंतःकरणाचा म्हणून दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाची ख्याती होती. त्याने इसवी १६२५ मध्ये जे स्थान काही मुसलमान सेनापतींना मिळाले होते, अशा स्थानावर शहाजीला नेऊन अखेरीस त्याला सर-ह-लष्करच बनविले होते. महंमद आदिलशाह आणि दुसऱ्या अली आदिलशाहा यांच्या राज्यात जरी शहाजीचा सन्मान झाला, त्याला त्याचे नावामागे महाराज किंवा फरझंद ही पदवी लागली तरी त्याला कधीही सर–ह–लष्कर हे पद मिळाले नाही. इतर सर्व मराठे सरदारांचे नशीब असेच होते. एखादा हिंदू सरदार 'सर–ह–लष्कर' झाला असे एकही उदाहरण ह्या दोन सलतनीत दाखविता येणार नाही. एखाद्या मोहिमेच्या प्रसंगी सुद्धा हे घडलेले नाही. अत्युच्च सेनापतित्वाबद्दल तर विचारावयासच नको. अत्युच्चपदी मुसलमानच असणार, तसेच कोठेही मराठी सरदारांबरोबर मुसलमान राहणारच.[१०] येथे एका घटनेची नोंद केली पाहिजे. ज्या प्रसंगी स्वतःच्या नेतृत्वाखाली निजामशाहीचे राज्य शहाजीने वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न केला, त्या प्रयत्नात त्याला अपयश आले आहे. तो अपयशी का ठरला ? त्याचे एक उत्तर स्पष्टच आहे. ह्या वेळी निजामशाहीत मुसलमानच दुभंगलेले होते हे एक आणि त्याहिपेक्षा महत्त्वाचे असे की तसेच शहाजी बद्दल आणि मराठ्यांबद्दल त्यांच्यात इतका द्वेष आणि आकस निर्माण झाला होता, ते इतके संधिसाधू बनले होते की शहाजीला साहाय्य करण्यापेक्षा मोंगलांना किंवा विजापूरला मिळणे बरे असा विचार त्यांनी केला. निजामशाहीचा जलदीने होणारा नाश टाळण्यासाठी झटणाऱ्या शहाजीपेक्षा त्यांना मोंगलांना किंवा विजापूरकरांना मिळणेच योग्य वाटले.

राज्यकारभार : नागरी–दीर्घकालीन झगडा दिल्यावर ब्रिटिश राज्यकारभारात भारतीयांना 'इंडियन सिव्हिल सर्व्हिस'मध्ये प्रवेश मिळाला. परंतु तेथेही ब्रिटिशांच्या भरतीपेक्षा भारतीयांची संख्या तुलनेने पाहता अतिशय कमीच होती. भारतीय पोलीस खात्यात तर ती फारच कमी होती. व्हाइसरॉयच्या इंडियन कौन्सिलचे सभासदत्व तर भारतीयास क्वचितच मिळालेले दिसते. भारतीय गव्हर्नरहि फारच क्वचित दिसून येईल. आदिलशाही आणि निजामशाही कारकीर्दीत ह्या स्थितीत फारसा फरक नव्हता. निजामशाहीचे पाय ज्या वेळी या भूमीत खोलवर रुजले नव्हते, अशा तिच्या प्रारंभीच्या काळात स्वतःच लिहून ठेवल्याप्रमाणे दलपतराय हा मात्र तिच्या अर्थखात्याचा मंत्री होता[११] राज्यसत्ता प्रस्थापित करण्यासाठी काही वेळा हे मुस्लीम राज्यकर्ते सुसंस्कृतपणाचा आव आणीत, मनाची सहिष्णुता किंवा मोठेपणा व्यक्त करीत, किंवा गरजेच्या पोटी हिंदू सरदारांचा येनकेन प्रकारेण उपयोग करून घेत. परंतु एकदा का राज्य स्थिरावले की त्यांचे वारस किंवा वंशज कट्टर धर्मांध आणि असहिष्णु बनत व मग त्यांचे धोरण बदले. हिंदू सरदारांपैकी कोणी कितीही लायक व कर्तृत्ववान असला तरी त्याला उच्च स्थानावर किंवा महत्त्वाच्या जागेवर न आणण्याचे धोरणच त्यांनी अवलंबिले आहे. बहमनी राज्यात तर उच्च किंवा खालच्या जागांवर हिंदू व्यक्तीचे नाव तुम्हांस क्वचितच आढळेल[१२] आदिलशाहीत किंवा निजामशाहीत किल्ल्याचे किंवा परगण्यांचे हवालदार किंवा वरच्या श्रेणीचे बातमीदार, कप्तान आणि तुरळक स्थानी मजलीसि, वकील, राजकारणी प्रतिनिधी इत्यादी स्थानी हिंदू नावे आपणास आढळून येतात. परंतु वकिलाच्या जागेशिवाय ह्यापैकी कोणत्याच जागा उच्च श्रेणीच्या किंवा महत्त्वाच्या नव्हत्या.

भाषा – खडी बोली म्हणजेच उर्दूची मातृभाषा, जिला आपण दख्खनी हिंदी म्हणतो, तिचे मूलस्थान दक्षिणेचेच. तिचे पालनपोषण व पुष्टीकरण विजापूर, गोवळकोंडा आणि अहमदनगर येथील दरबारातच झाले. बहमनी राज्यासंबंधीचे अतिशय अल्प लेखन या भाषेत झाले आहे. परंतु पाच सलतनीच्या काळात ती पुष्ट झाली. त्यामुळें तिच्यात बरेचसे लेखनहि झाले. ही भाषा मराठी, पर्शियन आणि अरेबिक यांच्या संमिश्रणाने बनलेली दिसून येते. या भाषेवर तेलगू किंवा कन्नड यांची ध्यानात येण्यासारखी छाप पडलेली नाही. हिचा जन्म व लालनपोषण ज्या विजापूर आणि गोवळकोंडा गावात झाले ती ऐन कन्नड व तेलगू प्रदेशात असतानाहि उर्दूवर त्यांचा प्रभाव असू नये हे थोडे आश्चर्याचे वाटते.

या काळात मराठी भाषेची अवस्था कोणती होती? विजापूर किंवा अहमदनगरच्या दरबारात मराठीला निश्चितच स्थान होते. तिचा दर्जा दुय्यम स्वरूपाचा असला तरी ती राजमान्य भाषा होती हे खरेच. त्याचे कारणही स्पष्ट

आहे. दुय्यम अधिकारी वर्ग बहुसंख्येने मराठा होता. ह्या परिस्थितीचा स्वाभाविक परिणाम असा झाला की राजाच्या आज्ञा किंवा हुकूम जरी पर्शियन भाषेत काढले गेले तरी खालच्या दुय्यम अधिकाऱ्यांना ते मराठीच्या माध्यमातूनच पोहोचविणे जरूर असे. इतकेच नव्हे–काही प्रसंगी ह्या आज्ञा द्विभाषिकही असत. पण मग ह्या आज्ञेतील मराठी भाषेचे स्वरूप कसे असे ? कागदपत्राच्या आधारे हे स्वरूप सहजगत्या ध्यानात येते. कोकणाकडील १६ व्या शतकातील ७ व्या दशकाचा आदिलशाही काळातील हा पत्रव्यवहार ! ह्या कागदपत्रात १५० शब्दांतील विशेषनामे किंवा तांत्रिक शब्द सोडून केवळ सात मराठी शब्द असल्याचे मी दाखवून दिले आहे[१३]

आदिलशाही किंवा निझामशाहीच्या काळात मराठी भाषेला खरोखरच काही राजाश्रय होता का ? तिला तसा तो प्राप्त झालेला मला तरी आढळलेला नाही. बहमनी आणि पाच सलतनीच्या काळात मराठी भाषेतील शेकडो ग्रंथ निर्माण झाले आहेत. परंतु गादीवर असलेल्या एखाद्या सुलतानाकडून त्याबाबतीत लेखकाला दरबारी मान्यता मिळाल्याचे उदाहरण क्वचितच दाखविता येते. मराठी भाषेत ग्रंथ निर्माण केलेले काही मुसलमान लेखक मात्र दाखविता येतात. पण त्यावरून मराठी भाषेला राजाश्रय मिळाला होता असे म्हणणे योग्य नाही.

त्या काळातील मराठी वाङ्मयात प्रत्यक्ष मराठी शब्दांचे प्रमाण कमी होते असे नाही. परंतु तिच्यावरील अरेबिक आणि पर्शियन भाषेचा प्रभाव लक्षणीय आहे. शिवाजी महाराजांनी परकीय भाषेचा हा प्रभाव पुसून टाकण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी एक प्रभावी उपाय योजला. अरेबिक आणि पर्शियन शब्दांना संस्कृतनिष्ठ मराठी पर्यायी शब्दांचा एक कोश तयार करण्याचे त्यांनी ठरविले[१४] अशाच प्रकारे पर्शियन भाषेवरील अरेबिक प्रभाव काढून टाकण्याचे कार्य आजच्या इराणी सरकारने केलेले पहाण्यात येते शिवाजीमहाराजांच्या ह्या शब्दकोशालाच 'राज्यव्यवहारकोश' असे म्हणतात. शब्दकोशाचा हा हेतू त्याच्या उपोद्घातात अगदी स्पष्टपणे व्क्त केला आहे.

राज्य पुरस्काराबाबत परकीय विद्वानांना आणि कवींना सुलतानांनी आश्रय दिल्याची नमनेदार उदाहरणें दाखविता येतात. ह्या काळात इराणमधे हाफिज शिराझी या एक श्रेष्ठ कवी होऊन गेला. हिंदुस्थानात दक्षिणेस येऊन त्याने स्थायिक व्हावे अशा विचाराने त्यास सर्वतोपरी आग्रह करण्यासाठी बहमनी सुलतान दुसरा मुहम्मद ह्याने आपला एक प्रतिनिधी त्याचेकडे म्हणजे इराणला मुद्दाम पाठविला होता. अत्यंत नाखुशीने त्याने ह्या योजनेला किंवा सूचनेला म्हणा पण अनुमती दिली. ऑरमझ ह्या नावानेच ओळखल्या जाणाऱ्या सामुद्रधुनीतील बंदरात तो

येऊन पोहोचला. भारतात येणाऱ्या गलबतात तो बसताच प्रचंड वादळाने ते गलबतच फुटून गेले. त्यामुळे तो मनातून इतका घाबरून गेला की भारतात येण्याचा विचार त्याने तत्क्षणीच सोडून दिला व स्वतःच्या गावी परतला. मात्र त्याने ऑरमझपर्यंत येण्यात जे कष्ट घेतले त्याकरिता त्याला नुकसानभरपाई दिली पाहिजे असा विचार सुलतानाच्या प्रतिनिधीने केला. केवळ प्रवासखर्चापायी त्याला किमान १००० सुवर्ण टंक (कमीत कमी १५००० रुपये) भेट दिले. बंगालच्या राजानेही त्याचा सत्कार केला[१५] एखाद्या संस्कृत किंवा मराठी लेखकास अशा प्रकारचे बक्षिस मिळाले होते का? नाहीच. किमान असे उदाहरण नोंदविलेले नाही.

महाराष्ट्रातील संत–कवींबाबतची परिस्थिती मोठी विचार करण्यासारखी आहे. संत हे नेहमीच (सन्मार्ग) पथप्रदर्शक असतात. तसेच ते परमेश्वरप्राप्तीचे मार्गदर्शक असतात. मानवता, सहिष्णुता, मनाचा उमदा स्वभाव किंवा ईश्वरप्राप्तीच्या विविध मार्गांचे ते खरे मार्गदर्शक असतात. ह्या विशिष्ट काळात अशा कितीतरी हिंदू संतकवींनी येथे जन्म घेतला. त्यांनी सर्व आयुष्य या थोर कार्यातच व्यतीत केले आणि समाजाला थोर तत्वांची शिकवण दिली. अखेरीस ते या भूमीतच मृत्यू पावले. परंतु मुसलमान राज्यकर्त्यांनी त्यांचे कार्याकडे फारच अल्प लक्ष दिले. या उलट त्याच काळात येथे जे अनेक सुफी आणि मुसलमान संत होऊन गेले, त्यांचा मात्र ह्या राज्यकर्त्यांकडून मोठ्या प्रमाणात सत्कार झाला. येथील राज्यकर्त्या सुलतानांनी त्यांना सर्व प्रकारे राजाश्रय दिलेला दिसून येतो. इतकेच नव्हे तर अशा मुसलमान संतांची संख्या देशाच्या गरजेच्या दृष्टीने अपुरी आहे आणि विशिष्ट हेतूसाठी मराठी संतकवी अतिशय निरुपयोगी आहेत असा विचार करून कवी किंवा इतर विद्वानांप्रमाणेच ह्या राज्यकर्त्यांनी बाहेरील इस्लामी देशातून असे संत आणण्याचा प्रयत्न केला हे निश्चित ! या दृष्टीने येथे एक वैशिष्ठ्यपूर्ण उदाहरण देणे योग्य ठरेल. नियमुतल्ला हा किरमनदेशातील एक संत. अहमद वली ह्या बहमनी सुलतानाच्या मनाचा कल त्याचेकडे होता. त्याला भेटण्यासाठी एक प्रतिनिधी मंडळ योजण्यात आले. या मंडळाने त्याची भेट घेऊन त्यास विनंती केली की, त्याने त्याचा एकुलता एक मुलगा जो शाह खलीलुल्लाह त्यालाच स्वतःच्या तत्वज्ञानाचा व शिकवणुकीचा वारस म्हणून येथे पाठवावे. त्याच्या येथील वास्तव्याने आणि शिकवणुकीने राज्याला शोभा आणण्याची त्याची कल्पना ! पण मुलासंबंधीच्या जिव्हाळ्यामुळे तो अशी कायमची ताटातूट पत्करण्यास तयार होईना ! मग त्याचा आजोबा मिर्झा नुरुल्लाह ह्याला येथे पाठविण्याची विनंती करण्यात आली. ह्या सूचनेस मान्यता मिळाली. श्रीमंती थाटात त्याचे येथे स्वागत करण्यात आले. त्यावेळी गादीवर असलेला सुलतान अहमद हा स्वतः त्यास सामोरा गेला. त्याने मिर्झा नुरुल्लाह, त्याच्या बरोबरचा लवाजमा आणि

नोकरवर्ग यांना मुक्तहस्ते देणग्या दिल्या. नियमातुल्लाह ह्याच्या मृत्यूनंतर खदिलुल्लाह स्वत: दक्षिणेस आला[१६] त्याच्यावरही सर्व प्रकारची मेहेरबानी करण्यात आली.

कोणा मुसलमान सुलतानाच्या हातून एखाद्या मराठी संतकवीला अशा प्रकारची प्रतिष्ठा मिळालेली दाखविता येईल का? कागदपत्रांतून असे एकही उदाहरण दाखविता येत नाही. अशा मुसलमान संतकवींना (काही) त्यांच्या शिष्यांकडून किंवा अनुयायांकडून रोखीच्या देणग्या किंवा इनामे मिळत असत. पण हे संतकवी बहुतांशी विशिष्ट कुटुंबियांशी घनिष्ट संबंध आलेले किंवा त्यांच्यातच वास्तव्य करणारे असे होते. बहुतांशी म्हणण्याचे कारण एवढेच की अशी काही उदाहरणे दाखविता येतात की जेथे दिलेली इनामे किंवा जमिनी तात्पुरत्या अगर कायम स्वरूपात राज्यकर्त्यांकडून जप्त झाल्या आहेत. परंतु सर्वसाधारणत: कायम उत्पन्नाबाबत किंवा ते पुढे चालू ठेवण्याबाबत सहिष्णुतेचे धोरण दाखविले गेले आहे. ह्याउलट मराठी संतकवींना कशी वागणूक दिली ह्यासंबंधीचा दाखला म्हणून एक उदाहरण देता येईल. हे परंपरागत चालत आलेले उदाहरण आहे. पण ह्याच्या मुळात एक सत्य दडलेले आहे. पैठणचे एकनाथस्वामी हे १६ व्या शतकातील अग्रस्थानी असलेले मराठी संतकवी! ते दररोज गोदावरीच्या जलात स्नान करण्यास जात. एकदा स्नान करून परत येत असताना एका मुसलमान फकिराने त्यांना बघितले. तो त्यांच्यावर थुंकला व अशा प्रकारे त्याने त्यांना दूषित किंवा भ्रष्ट केले. महाराज परत फिरले. त्यांनी नदीच्या जलात पुन्हा बुडी मारली. पण येताना त्या फकिराने त्यांच्यावर पुन्हा थुंकून त्यांना भ्रष्ट केले! हा प्रकार सतत सात वेळा घडला. आठव्या वेळी स्नानाने पवित्र होऊन महाराज जेव्हा परतले तेव्हा आपल्या अपमानकारक वागणुकीबद्दल त्या मुसलमान फकिराने पश्चात्ताप व्यक्त केला. फकीर अशा प्रकारे मराठी संतकवींचा अपमान करण्याचे धाडस करू शकत होता हेच ह्या घटनेने सूचित होते.

न्याय:— ब्रिटिशांच्या राज्यात इंग्रज न्यायाधीश अगर इंग्रजी ज्यूरींच्या साहाय्याने दोषारोप असलेले इंग्रजी लोक कायमचे निर्दोषी ठरविले जात असत. पिढीजात वतन मिळविण्यासाठी इस्लामधर्म स्वीकारल्याची अनेक उदाहरणे आदिलशाही राजवटीत दाखविता येतात. वतन पिढीजात चालत आहे म्हणून ते चालू ठेवण्याचा हक्क आहे असे काही म्हणता येत नाही. परंतु काही प्रसंगी इस्लामचा स्वीकार केल्यामुळे काही लोकांना मालकी हक्क मिळाल्याचे दिसून येते. ते जर हिंदूधर्मीय राहिले असते तर त्यांना हे हक्क मिळाले असते का? ह्याचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. ह्या वेळी अपराधी किंवा गुन्हेगारांनी जर

इस्लामधर्म स्वीकारला तर दोषारोपातून त्यांची मुक्तता होई. आक्रमणाचे वेळी बळजबरीने धर्मांतर तर चालेच; परंतु त्याशिवाय न्यायदानात पक्षपात करून, अपराधी किंवा गुन्हेगाराला क्षमा दाखवून, दोषी लोकांना तुरुंगातून मुक्त करून, गैरप्रकारांनी किंवा बेसुमारपणाने त्यांच्या मागण्या मान्य करून हे धर्मांतर करण्यासाठी ह्या राज्यकर्त्यांकडून प्रोत्साहनच दिले जात असे. शक १५३२ (इसवी १६११) च्या कागदपत्रांत अशा प्रकाराबाबत अत्यंत कडक शब्दातील अभिप्राय व्यक्त झालेला आहे. ह्या प्रसंगी एका खोटा हक्क सांगणाऱ्या मुसलमानास वास्तविक राजन्यायालयात त्याच्या दुष्टपणाबद्दल शिक्षा व्हावयाची; परंतु तो इस्लामधर्मीय असल्यामुळे आणि राज्य त्या धर्मीय असल्यामुळे याला सोडून दिल्याचे स्पष्ट होत आहे. (राजवाडे, खंड पंधरा, पृ. २८)

ह्या प्रत्येक क्षेत्रात आदिलशाही किंवा मुघल शासनसंस्था ही शंभर टक्के जुलमीच होती असे मला म्हणावयाचे नाही. परंतु ह्या परकीय सत्तेत निश्चितच विषमता होती, अन्याय चालत असे. तेथे अनेक प्रकारच्या उणीवा होत्या; तसेच राज्यकर्त्यांकडून परिस्थितीचा गैरफायदा घेतला जात असे हे निश्चितच. अशा प्रकारच्या आजूबाजूच्या वातावरणामुळे श्रीशिवाजी महाराज आणि त्यांचे अनुयायी चालू राजवटीच्या विरुद्ध उठाव करण्यास प्रवृत्त झाले व त्यांनी स्वातंत्र्याच्या लढ्याला प्रारंभ केला. आपण हे ध्यानात घेतले पाहिजे की स्वातंत्र्यलढ्याला एकदा प्रारंभ झाला की तो कधीही स्वातंत्र्य हस्तगत केल्याशिवाय थांबत नाही. बायरनच्या प्रसिद्ध पंक्तीत स्वच्छ म्हटलेच आहे.

Freedom's battle once begun,
Bequeath'd from bleeding sire to son,
Though baffled oft, is ever won.

संदर्भ

१ प्रियोळकर अ. का.:- गोवा इंक्वीझिशन.
२ किंग:- हिस्टरी ऑफ दि बहमनी डिनॅस्टी, पृष्ठ क्र. २४-२५.
३ बहरी:- मनलगन् (औरंगजेबाने काय केले याचे वर्णन करतो).

यक देव रह्या न यक देवल
हुअे संगे सियाह किशन केवल
देवल हुअे च्युंकि आबखाने
बलदेव भये रूरूबखाने
पीछे बी हुआ न कोअी अेसा
आगे बी तो सच न होगा अैसा—

४ डॉ. वर्मा याजकडे असलेल्या ठशावरून घेतले आहे.

५ ग. ह. खरे : ऐतिहासिक फार्सी साहित्य खं. १–क्र. ८१

६ भा. इ. सं. मंडळ, पुणे : शिवचरित्र साहित्य खं. ९–पृ. २९ B

७ ग. ह. खरे : ऐतिहासिक फार्सी साहित्य खं. ५–क्र. ७१

८ रोझ : आऊटलाईन ऑफ मॉडर्न नॉलेज

९ महंमद इब्राहीम झुबैरी : बसाती नुस्सलातीन (हैद्राबाद प्रत) पृ. ३४८ ते ३६०

१० बशीरुद्दीन अहमद : फरामीनुस्सलातीन–पृ. २०९

११ काणे पां. वा. : धर्मशास्त्राचा इतिहास, खंड १. पृ. ४०६ ते ४१०

१२ तबातबाच्या बुर्हान्–ह–मासीरमध्ये अनुकूल व प्रतिकूल हिंदूंची मिळून शेकडा ४ नावे आहेत.

१३ ग. ह. खरे : उपर्युक्त.

१४ आपटे द. वि. व दिवेकर स. म. (संपा.) : शिवचरित्रप्रदीप पृ. १४३

कृते म्लेंच्छोच्छेदे भुवि निरवशेषं रविकुला–
वत्तंसेनात्यर्थं यवनवचनैर्लुप्तसरणिम् ॥
नृपव्याहारार्थं स तु विबुधभाषां वितनितुं
नियक्तोऽभूत् विद्वान्नृपवरशिवच्छत्रपतिना ॥ ८१ ॥

१५ ब्रिग्ज फिरिश्ता : खंड २, पृ. ३४७
बाऊन इ. जे. : लिटररी हिस्टरी ऑफ पर्शिया. खं. ३. पृ. २८६

१६ बुर्हान–इ–मासिर मूळ पृ. ५४ (किंग : इंग्रजी भाषांतर. पृ. ५०–५६,)

□ □ □

वार्षिक वर्गणी पाठवा

इतकी वर्षे मंडळाची वार्षिक वर्गणी भरण्याची सूचना पाठविण्यात येत असे. आता टपाल खर्चात अतोनात वाढ झाली आहे. सूचनेंची वाट न पाहता आपली वर्गणी सत्वर भरावी.

–चिटणीस

क्षत्रप राजांची रांजणगाव येथील नाणी

लेखिका : डॉ. सौ. शोभना गोखले

क्षत्रप राजवंशीयांच्या नाण्यांचा एक फार मोठा साठा या वर्षी काहीशा योगायोगाने हाती आला आहे. "क्षत्रप" हे राजवंशाचे नाव सामान्य वाचकांच्या फारशा परिचयाचे नाही. परंतु इ. स. च्या प्रारंभापासून तीन चारशे वर्षे त्यांच्या नाण्यांना महाराष्ट्राच्या अर्थव्यवहारात फार मोलाचे स्थान होते. राजकीय क्षेत्रातहि त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. सातवाहन घराण्याची पश्चिम महाराष्ट्रातील सत्ता त्यांनीच मोडकळीस आणली. त्यापूर्वी त्यांची नाणी अनेक ठिकाणी मिळालेली असली तरी एवढा मोठा साठा यापूर्वी सापडलेला नव्हता.

१५ जुलै १९७४ च्या 'सकाळ'मध्ये पुणे जिह्यातील, शिरूर तालुक्यातील, रांजणगाव यथे काही पुरातन कालची नाणी सापडली, ही बातमी फोटोसहित आली होती. नाण्याच्या फोटोवरून ती नाणी क्षत्रपकालीन असावीत हे प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासकांच्या चटकन ध्यानात येण्याजोगे होते. दुसरे दिवशी डेक्कन कॉलेजातील पुरातत्त्व विभागाचे प्रमुख डॉ. शांताराम भालचंद्र देव, प्रस्तुत लेखिका आणि डॉ. मधुकर केशव ढवळीकर या तिघांनी रांजणगाव येथे जाऊन ती नाणी पाहिली. रांजणगाव येथील श्री. भिकू खेडकर यांच्या शेताजवळील पडीक जमिनीतील टेकाड फोडताना दगडाच्या सापटीत एका मातीच्या गाडग्यात ही नाणी सापडली. टेकाड फोडणाऱ्या चार वडाऱ्यांनी ती नाणी चौघांत वाटून घेतली. वाटणीवरून त्यांच्यात भांडण उत्पन्न झाले. या भांडणाची तक्रार जमीन मालकाने पोलिसांना दिली आणि अशा तऱ्हेने या नाण्यांचा शोध लागला.

ही नाणी अभ्यासासाठी डेक्कन कॉलेजच्या पुरातत्त्व विभागास देण्याची मा. जिल्हाधिकारी यांनी परवानगी दिली. त्याचप्रमाणे शिरूर येथील मॅजिस्ट्रेट श्री. बिबीकर आणि पोलिस अधिकारी श्री. डांगे यांनी सर्वतोपरी सहाय्य केले.

या नाण्यांच्या संचयामध्ये एकूण १५१८ चांदीची नाणी असून एक नाणे तांब्याचे आहे. क्षत्रप राजांच्या नाण्यांचा महाराष्ट्रात सापडलेला हा दुसरा संचय आहे. यापूर्वी १९२५ साली शिरवळ[१] येथे चारशे नाण्यांचा संचय सापडल्याची नोंद आहे.

या नाण्यांची ओळख करून देण्यापूर्वी क्षत्रप राजे कोण, महाराष्ट्रात या राजांनी आपले वर्चस्व बसविण्यासाठी वारंवार कसे प्रयत्न केले यासंबंधीचे थोडक्यात

केलेले विवेचन अस्थानी ठरणार नाही. कुशाण राजा पहिला कनिष्क याने इ. स. च्या पहिल्या शतकाच्या अखेरीस भारताच्या पश्चिम आणि मध्य भागात आपले बस्तान बसविले. या कुशाण राजांचा राजप्रतिनिधी म्हणून क्षहरात वंशातील नहपानाने महाराष्ट्रात आपले स्थान निर्माण केले. लवकरच त्याने 'राजन' हा किताब घेतला. या नहपानाने नाशिक, कार्ले, जुन्नर येथे शिलालेख कोरविले व स्वतःची नाणी पाडली. नाशिकजवळ जोगलटेंभी येथे नहपानाची नाणी विपुल प्रमाणात सापडली. या नहपानाचा गौतमीपुत्र सातकर्णीने पराभव केला आणि नहपानाच्या नाण्यांवरच आपली उज्जयिनीची राजमुद्रा ठोकली; नहपानानंतर सौराष्ट्रात कार्दमक नावाचे घराणे उदयास आले. या घराण्यातील रुद्रदामन हा सर्वश्रेष्ठ महाक्षत्रप. याने जुनागढ येथे धरण बांधले, लेख कोरविला, सातकर्णींचा पराभव केला. त्याने सातवाहन राजांशी विवाहसंबंध जोडले. कान्हेरी येथील लेखात रुद्र-दामनाची कन्या वासिष्ठीपुत्र सातकर्णींस दिल्याचा उल्लेख आहे. अशा तऱ्हेने दुसऱ्या शतकात महाराष्ट्राचा क्षत्रप राजांशी संबंध आला. या क्षत्रपांची नाणी चांदीची असून त्यांवर सुलट बाजूस राजाची प्रतिमा, राजाच्या डोक्याच्या मागे कालनिर्देश आणि उलट बाजूस ब्राह्मी लिपीत कोरलेले राजाचे नाव आणि मध्य-भागी मेरू पर्वत आहे. या नाण्यांचे स्वरूप सुबक आणि देखणे असल्यामुळे ती नाणी लोकप्रिय झाली. व्यापारी पेठेत त्यांचा भाव वधारलेला होता. सातवाहन राजा यज्ञश्री याने या क्षत्रप राजांच्या नाण्याप्रमाणे आपली नाणी पाडली. आता-पर्यंत राजप्रतिमा असलेली वासिष्ठीपुत्र पुळुमावीची तीन नाणी, वासिष्ठीपुत्र सातकर्णींची तीन आणि राजा यज्ञश्रीची एकूण सहा नाणी सापडली आहेत. यावरून क्षत्रप नाण्यांचे राजकीय व आर्थिक क्षेत्रातील महत्त्व लक्षात येते. सात-वाहन साम्राज्याच्या अस्तानंतर वाकाटक साम्राज्य उदयास आले. त्या साम्राज्याचा दबदबाहि निर्माण झाला; परंतु अश्वमेध यज्ञ करणाऱ्या या वाकाटक राजांनी स्वतःची नाणी पाडली नव्हती. त्यांच्या राज्यात क्षत्रपांचीच नाणी प्रचलित होती. महाराष्ट्रात आणि गुजरातमध्ये क्षत्रप राजांची नाणी बहुसंख्येने सापडलेली आहेत.

रांजणगाव येथील संचयामध्ये एकूण चौदा क्षत्रप राजांची नाणी असून द्वितीय रुद्रसेनाच्या वंशातील तीन राजांची नाणी आहेत. या संचयात द्वितीय रुद्रसेनाचे एक तांब्याचे नाणे आहे. या नाण्यांच्या संचयाची खालीलप्रमाणे विभागणी आहे.

राजाचे नाव	नाण्यांची संख्या
१) प्रथम रुद्रदामनाचा पुत्र–प्रथम रुद्रसिंह	३
२) प्रथम रुद्रसिंहाचा पुत्र–प्रथम रुद्रसेन	२०
३) प्रथम रुद्रसेनाचा पुत्र–पृथ्वीषेण	१
४) प्रथम रुद्रसिंहाचा पुत्र–दामसेन	१८
५) प्रथम रुद्रसेनाचा पुत्र–द्वितीय दामजश्री	४
६) आभीर राजा ईश्वरदत्त	९
७) दामसेनाचा पुत्र–वीरदामन्	१६
८) दामसेनाचा पुत्र–प्रथम यशोदामन्	३
९) दामसेनाचा पुत्र–विजयसेन	१५०
१०) दामसेनाचा पुत्र–तृतीय दामजश्री	४४
११) वीरदामनाचा पुत्र–द्वितीय रुद्रसेन	३३१
१२) द्वितीय रुद्रसेनाचा पुत्र–विश्वसिंह	८५
१३) द्वितीय रुद्रसेनाचा पुत्र–भर्तृदामन्	५१८
१४) विश्वसेन भतृदामनाचा पुत्र–विश्वसेन	२६६
द्वितीय रुद्रसिंहाच्या वंशातील राजे	
१) स्वामी जीवदामनाचा पुत्र–द्वितीय रुद्रसिंह	१०
२) द्वितीय रुद्रसिंहाचा पुत्र–द्वितीय यशोदामन्	१
३) स्वामी द्वितीय रुद्रदामनाचा पुत्र–स्वामी तृतीय रुद्रसेन	१
उलटे ठसे असलेली नाणी	३१
अस्पष्ट अक्षरे असलेली नाणी	७
द्वितीय रुद्रसेनाचे तांब्याचे नाणे	१
	एकूण १५१९

तीन नाण्यांच्या सुलट बाजूला 'म', 'ल', 'स' ही ब्राह्मी लिपीतील अक्षरे आहेत.

प्रस्तुत लेखात महत्त्वाच्या नाण्यांचेच वर्णन केले असून नंतर त्यांच्या ऐतिहासिक महत्त्वाची चर्चा केली आहे.

प्रथम रुद्रसिंहाचा पुत्र–प्रथम रुद्रसेन

प्रथम रुद्रसेन हा शक १२५ मध्ये महाक्षत्रप झाला. रांजणगाव संचयामध्ये शक १४३ हा कालनिर्देश असलेले आणि संपूर्ण असलेले नाणे आहे. रॅप्सनच्या सूचीमध्ये हा कालनिर्देश असलेल्या नाण्यांची नोंद नाही.

आकृती १



महाक्षत्रप दामसेन




महाक्षत्रप विजयसेन



महाक्षत्रप द्वितीय रुद्रसेन

गोखले : रांजणगांव येथील क्षत्रपांची नाणी

आकृती २



पाषाण देवालयातील परशुरामाचे चित्र

प्रथम रुद्रसेनाचा पुत्र–दामसेन

या राजाची शक १४९ आणि शक १५० हा कालनिर्देश असलेली नाणी संचयात आहेत आणि हेच या राजाच्या नाण्यांचे या संचयातील वैशिष्टच आहे.

दामसेनाचा पुत्र–वीरदामन

वीरदामनाची शक १५० हा कालनिर्देश असलेली एकूण ७ नाणी या संचयामध्ये आहेत. आतापर्यंत शक १५६ ते शके १६० हा वीरदामनाचा कालखंड मानण्यात येत असे. परंतु रांजणगाव येथील संचयात त्याही पूर्वीचा कालनिर्देश असलेली नाणी सापडली आहेत.

दामसेनाचा पुत्र–विजयसेन

या संचयामध्ये विजयसेनाची एकूण १५० नाणी आहेत. शक १६० मध्ये विजयसेन हा क्षत्रप होता आणि शक १६२ मध्ये तो महाक्षत्रप झाला. रॅप्सनच्या सूचीनुसार त्याची कारकीर्द शक १७२ मध्येच संपत असल्याचे दिसून येते. परंतु रांजणगाव संचयामध्ये शक १७४ हा कालनिर्देश असलेले एक नाणे सापडले आहे; यावरून त्याची कारकीर्द आणखी दोन वर्षांनी वाढलेली दिसून येते.

दामसेनाचा पुत्र–तृतीय दामजश्री

रॅप्सनच्या सूचीनुसार याचा कालखंड शक १७२ ते शक १७६ दिसून येतो. परंतु रांजणगाव येथील संचयात शक १७७ हा कालनिर्देश असलेले नाणे सापडले आहे.

वीरदामनाचा पुत्र–द्वितीय रुद्रसेन

या राजाची नाणी अस्पष्ट आणि खराब असल्याची रॅप्सनने नोंद केली आहे. त्याच्या कारकीर्दीच्या सुरुवातीची नाणी फार अस्पष्ट असल्यामुळे रॅप्सनने शक १७३ किंवा १७९ ही याच्या कारकीर्दीची सुरुवात असावी असे नमूद केले आहे. रांजणगाव येथील संचयात शक १७७ हा कालनिर्देश असलेली दोन नाणी सापडली आहेत. एका नाण्यावर कालनिर्देश व सुस्पष्ट असून दुसऱ्या नाण्यावरील अक्षरांचा शिरोभाग कापलेला आहे. शक १७७ हा काल म्हणजे तृतीय दामजदश्रीच्या कारकीर्दीचा शेवट आणि द्वितीय रुद्रसेनाच्या कारकीर्दीचा आरंभ होय, हे या नाण्यांवरून दिसून येते.

द्वितीय रुद्रसेनाचा पुत्र–भर्तृदामन

या संचयामध्ये भर्तृदामनाची सर्वात जास्त म्हणजे ५१८ नाणी आहेत. काही नाणी नव्याने सापडली आहेत. शक २०२ हा कालनिर्देश असलेली दोन

नाणी आहेत. त्यावरील 'महाक्षत्र' आणि 'रुद्रसेनपुत्रस' ही अक्षरे सुस्पष्ट आहेत. याशिवाय शक २०४, २०५, २०९, २१० हे कालनिर्देश असलेली नाणी या संचयामध्ये आहेत हे या संचयाचे वैशिष्टच आहे.

भर्तृदामनाचा पुत्र–विश्वसेन

विश्वसेन हा शक २१६ ते शके २२६ या कालखंडात क्षत्रप होता. रांजणगाव संचयामध्ये शक २१४ हा कालनिर्देश असलेले विश्वसेनाचे एक नाणे आहे. यावरून शक २१४ मध्ये भर्तृदामन महाक्षत्रप असतानाच विश्वसेन क्षत्रप होता हे निदर्शनास येते. (पहा: आकृती क्र. १)

या संचयामुळे महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाविषयी एक नवीन पुरावा उपलब्ध झाला आहे. तिऱ्सया शतकाच्या मध्यावधीमध्ये सातवाहन साम्राज्याचा अस्त झाला. या सार्वभौम वंशाच्या शाखांनी देशाच्या निरनिराळ्या विभागात राज्य केले ही गोष्ट सर्वश्रुत आहे. पश्चिम महाराष्ट्रातून त्यांचे उच्चाटन झाल्यावर उत्तर महाराष्ट्र, कोकण आणि गुजरात हे विभाग आभीर राजांनी पादाक्रांत केले. नाशिक येथील ईश्वरसेनाच्या[२] लेखावरून महाराष्ट्राचा उत्तर भाग आभीरांनी हस्तगत केल्याचे दिसून येते. खानदेश हा आभीरांच्या अंकित राजांनी बळकावलेला होता हे डॉ. वा. वि. मिराशी[३] यांनी निदर्शनास आणले आहे. या सर्वांवरून तत्कालीन राजकीय अशांतता दृष्टोत्पत्तीस येते. सातवाहन राजा पुलुमावी याचे पश्चिम महाराष्ट्रातून उच्चाटन झाले होते. या राजाची नाणी विदर्भातील तऱ्हाळा येथे सापडली; परंतु पश्चिम महाराष्ट्रात या राजाच्या नाण्यांचा मागमूसही नाही. वाकाटक सम्राटांप्रमाणे आभीरांचीही स्वतःची नाणी नव्हती. त्यामुळे त्यांच्या राज्यातहि क्षत्रपांचीच नाणी चलनात असल्याची शक्यता आहे. द्वितीय रुद्रसेन आणि भर्तृदामन या महाक्षत्रपांची नाणी सर्वात जास्त संख्येने सापडली आहेत. यावरून द्वितीय रुद्रसेन किंवा भर्तृदामन यांनी जुन्नर ते रांजणगाव या व्यापारी मार्गावरून प्रवेश करून त्या विभागावर तात्पुरता अंमल बसविण्याचा प्रयत्न केला असण्याची शक्यताही दिसून येते.

रांजणगाव हे जुन्नर ते प्रतिष्ठान या प्राचीन व्यापारी मार्गावर वसलेले आहे; त्यामुळे या ठिकाणी व्यापाराची चांगलीच उलाढाल होत होती, हे दिसून येते, महाराष्ट्रात क्षत्रपांची नाणी इतरत्रही बऱ्याच ठिकाणी सापडली असल्यामुळे क्षत्रपांची नाणी अतिशय लोकप्रिय होती हे निःसंदिग्धपणे दिसून येते. सातवाहन साम्राज्याच्या ऱ्हासानंतर सातवाहन नाण्यांची किंमत बाजारात अर्थातच कमी झाली. त्यामुळे अर्थातच क्षत्रपांच्या चांदीच्या नाण्यांची धातू म्हणूनही किंमत वाढली. विजयसेन, रुद्रसेन, भर्तृदामन या महाक्षत्रपांच्या नाण्यांवर ब्राह्मी

लिपीतील 'म', 'ल' आणि 'स' ही अक्षरे, याशिवाय वर्तुळ, चंद्रकोर, यासारखी सावकारांची चिन्हे दिसून येतात. या चिन्हांवरून क्षत्रपांचीच नाणी सर्वत्र प्रचलित होती, हे निदर्शनास येते. या संचयामध्ये ३१ नाण्यांवरील राजांच्या प्रतिमा नेहमीप्रमाणे उठावाच्या नसून त्या खोदलेल्या आहेत. अर्थात ही नाणी, नाणी म्हणून प्रचलित नसून त्यांची धातू म्हणून किमत होती हे उघड आहे.

क्षत्रपांच्या या नाण्यांमध्ये कोठलाही नवीन क्षत्रप किंवा महाक्षत्रप आढळून आलेला नाही. परंतु आजवर अज्ञात असलेले कालनिर्देश मात्र आढळून आलेले आहेत आणि हेच या संचयातील नाण्यांचे वैशिष्टय आहे. द्वितीय रुद्रसेनाचे शक १८९ हा कालनिर्देश असलेले तांब्याचे नाणेही महत्त्वपूर्ण आहे.

(१) जर्नल ऑफ बॉबे ब्रँच रॉयल एशियाटिक सोसायटी, १९२५, खंड २ पृ. ३७४.

(२) एपिग्राफिया इंडिका, खंड ८, पृ. ८८.

(३) ॲनल्स ऑफ भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिटयूट, खंड २६, पृ. १५६.

(४) रॅप्सन, इ. जे., अे कॅटलॉग ऑफ दि इंडियन कॉईन्स इन दि ब्रिटिश म्युझिअम, १९०८.

परशुरामाचे एक चित्र

—कमल चव्हाण

राजपूत व पहाडी शैलीच्या चित्रामध्ये कृष्णलीला हा विषय प्रामुख्याने प्रिय होता. तर महाराष्ट्रात उत्तर मध्ययुगात (Late Medieaval) दशावताराच्या चित्रणाला महत्त्व प्राप्त झाले. चित्रातच नव्हे तर लोकनाटय, लोकगीत यामध्ये हा विषय लोकप्रिय होता. मनोविनोदाचे एक फार लोकप्रिय साधन म्हणजे गंजीफा; त्यातहि पत्यावर दशावतारी चित्रे असत. दागिन्यांवरहि दशावताराची प्रतीके कोरण्याची प्रथा सुरू झाली. ' कोल्हापुरी साज ' म्हणतात त्या प्रकारच्या मंगळसूत्रावर दशावताराची प्रतीके आजहि गुंफलेली असतात.

पेशवाईत राजेरजवाडे, सरदार व धनिक लोक यांनी आपापल्या वास्तूत व देवालयात रंगकाम करविले. या चित्रित वास्तूतील भित्तीचित्रात दशावताराची चित्रे हमखास असत. लहानमोठी, चांगली, वेडीवाकडी पण दशावताराची चित्रें रंगविलेली असावीत अशी प्रथाच त्या वेळी असावी. या विषयाचे चित्रण रुढीबद्ध होऊ लागल्यामुळे चित्रकामात कल्पनेचा अभाव उत्पन्न होऊन चित्रण यंत्रवत होऊ लागले. दशावतारातील काव्यात्मक कल्पना किंवा तात्त्विक आशय या कोणत्याही पैलूचे आकलन चित्रकारांना झाले असावे असे वाटत नाही. इतकेच काय तर या विषयाचे लोकग्राह्य असे मनोरंजक प्रस्तुतीकरणहि क्वचितच पाहावयास मिळते.

विष्णुच्या दशावताराच्या मालिकेत परशुरामाचा अवतार हा सहावा मानलेला आहे. या सहाव्या अवताराचे चित्रणहि झालेलेच आहे. आजच्या या निबंधाचा विषय ' पाषाण ' येथील सोमेश्वराच्या मंदिरातील परशुरामाचे एक अभिनव भित्तीचित्र हा आहे. पुण्याहून साधारण ६ मैलावर असणाऱ्या या गावी शिवाचे हे मंदिर आहे. हे देवालय छत्रपती शाहू यांच्या मातोश्री येसूबाई यांनी १७१९ ते १७३० च्या दरम्यान केव्हातरी बांधले, असे समजतात. मंदिरापुढील दोन मंडप व ओवऱ्या शिवरामभाऊ या गृहस्थांनी १७८० मध्ये बांधल्या. या नंतरच्या बांधकामातील मंडपापैकी पुढील मंडपात चित्रे आहेत. या भित्तीचित्राचे विषय तत्कालीन पद्धतीप्रमाणे प्रामुख्याने पौराणिक कथा व दशावतार कथा हेच आहेत. काही धार्मिकेतर चित्रेहि येथे पाहावयास मिळतात.

या ठिकाणचे परशुरामाचे चित्र पाहण्यापूर्वी महाराष्ट्रातील इतर काही ठिकाणी दशावताराच्या मालिकेत चित्रित झालेल्या परशुरामाच्या चित्रांची नोंद

घ्यावयास हवी. वाईला रास्त्यांच्या मोतीबागेतील भित्तीचित्रात परशुराम व सहस्रार्जुन कार्तवीर्य यांच्या आकृती दाखविल्या आहेत. दोघांमध्ये युद्ध चालू आहे. ढालतलवार घेतलेल्या कार्तवीर्याचे डोके उडविण्यासाठी परशुरामाने आपला परशु उगारलेला दिसतो आहे. वाईलाच पटवर्धनांच्या वाड्यातील भित्तीचित्रातहि अशाच प्रकारे अस्त्रशस्त्राने सुसज्जित कार्तवीर्यावर परशुरामान परशु उगारलेला आहे. मेणवलीला नाना फडणीसाच्या वाड्यातील चित्रात परशुराम एक पाय कमलपीठावर ठेवून व दुसऱ्या पायाने युद्धाचा पवित्रा घेऊन कार्तवीर्याचा वध करण्यास प्रवृत्त झालेला आहे. कार्तवीर्याचे काही हात जमिनीवर तुटून पडलेले दिसत आहेत. साताऱ्याच्या राजवाड्यातील भित्तीचित्रात कार्तवीर्याच्या आकृतीपेक्षा मोठी अशी परशुरामाची आकृती दोन्ही हातांनी परशु सावरून आततायी सहस्रार्जुनाचा शिरच्छेद करण्यास वेगाने चाल करून गेलेली दाखविली आहे. धनुष्यावर प्रत्यंचा चढविलेल्या सहस्रार्जुनाचे काही खंडित हात इतस्तत: विखुरलेले आहेत. पुण्याच्या नानावाड्यातील चित्रात धनुष्यधारी कार्तवीर्याचे परशुरामाशी युद्ध चित्रित केले आहे. परशुरामाच्या परशुने कार्तवीर्याचे काही हात खाली तुटून पडलेले आहेत.

या सगळ्यांच्या पेक्षा थोडे निराळे चित्रण दिसते ते पांडेश्वर येथील देवालयात. येथे एकट्या परशुरामाचेच चित्रण आहे. अर्थात त्याच्या हातात परशु आहे पण तो युद्ध करीत नाही. या ठिकाणच्या इतर देवदेवतांच्या मूर्तीसारखी ही आकृती आहे. रुढीबद्ध चित्रणाच्या प्रवृत्तीमुळे अधिकांश चित्रात क्षत्रिय राजा कार्तवीर्य ब्राह्मणी पगडी घातलेला दाखविला आहे.

या सर्व चित्रांच्या अवलोकनानंतर एक गोष्ट लक्षात येते ती ही की परशुरामाच्या झंजावाती अवतारकार्याच्या एकाच पैलूचे चित्रण यात केलेले आहे. पृथ्वीवरून दुष्टांचे उच्चाटन करण्यासाठी क्षात्रधर्म पत्करलेल्या या ऋषीपुत्राने जो संहार केला त्याची कथा ही चित्रे सांगतात. परशुरामाच्या अवतारकार्याचा हा एक प्रमुख भाग असला तरीहि या अवताराच्या कार्याची सीमा एवढीच नाही, तर त्याच्या अवतारकार्याचा सृजनात्मक भागहि तेवढाच महत्वपूर्ण आहे. परशुरामाच्या अवतारकार्याच्या कथा विष्णुपुराण, अग्निपुराण, भागवत, विष्णुधर्मोत्तर पुराण, रामायण, महाभारत आदि ग्रंथांत आहेत. या कथामधून त्याच्या कार्याविषयी निरनिराळे उल्लेख आहेत.

अधिकांश पौराणिक कथा, व्याख्याने यावरून परशुराम हा जमदग्नीऋषी व रेणुका यांचा धाकटा पुत्र. तो परम शिवभक्त असून त्याच्या भक्तीवर प्रसन्न होऊन शंकराने त्याला परशु दिला व म्हणूनच परशुराम हे नाव त्याला प्राप्त झाले.

परशुरामाच्या आयुष्यातील एका महत्त्वपूर्ण घटनेचा उल्लेख रामायणात येतो. सीतास्वयंवरात रामाने शिवाच्या धनुष्याचा भंग केला. परशुरामाला हे कळताच त्याचा राग अनिवार झाला व त्याने रामाला युद्धाचे आवाहन दिले. या राम–परशुराम युद्धात परशुराम पराभूत झाला. महाभारतात परशुरामाचा उल्लख कर्ण व अर्जुन यांच्या गुरूच्या रूपात येतो. भीष्माबरोबर परशुरामाचे युद्ध झाले व भीष्माने परशुरामाला पराजित केले.

परशुरामाच्या अवतारकार्यात परशुरामाचे सहस्रबाहु कार्तवीर्याशी व क्षत्रियांशी झालेले शत्रुत्व ही कथा सर्वाधिक प्रचलित आहे व याच कथेतील परशुराम कार्तवीर्य युद्धाचे चित्रण आपणास अधिकांश चित्रामधून पहावयास मिळते. ती कथा अशी: एकदा हैहय राजा सहस्रबाहु कार्तवीर्य जमदग्नी ऋषीच्या आश्रमात आला. ऋषी व त्याचे पुत्र तपस्येकरिता जंगलात गेलेले होते. त्यांच्या अनुपस्थितीमध्ये कार्तवीर्याने आश्रमाची नासधूस केली व आश्रमातील कामधेनूचे बळजबरीने हरण केले. तपस्येहून आल्यानंतर सर्व वृत्तांत ऐकून परशुराम क्रुद्ध झाला. त्याने कार्तवीर्याबरोबर युद्ध केले व त्याचे सहस्र हात कापून त्याचा वध केला. यानंतर हत्येच्या पातकाच्या निवारणार्थ तो प्रायश्चित्त घेण्यास तीर्थयात्रेस गेला. परशुराम जाताच कार्तवीर्याच्या पुत्रांनी आश्रम नष्ट केला व ध्यानस्थ जमदग्नीचा वध केला. तीर्थयात्रेवरून परत आल्यावर परशुरामाला जव्हा हे सर्व कळले तेव्हा तो संहारास सिद्ध झाला. कार्तवीर्याच्या पुत्रांचा वध करूनच त्याचा क्रोधाग्नि शांत झाला नाही, तर त्याने २१ वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली. त्याने जरी पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची शपथ घेतली होती तरी त्याच्या अघोरी निश्चयापासून इतर ऋषींनी त्याला परावृत्त केले व हा नरमेध थांबविला. यानंतर परशुरामाने वरुणदेवाला पृथ्वीचा काही भाग देण्याविषयी विनवले. वरुणदेवाने समुद्राच्या सीमा मागे घेऊन परशुरामाला पृथ्वीचा भाग दिला. काही आख्यानांनुसार परशुरामाने स्वतः समुद्राला त्याच्या सीमा मागे घ्यायला लावून पृथ्वीचा काही भाग वसाहतीसाठी रिकामा करून घेतला. हा विजित भाग ' अपरांत ' म्हणून ओळखला जाऊ लागला. परशुरामाने या भागात ब्राह्मणांची वसाहत केली. या मागासलेल्या भागाच्या उन्नतीसाठी परशुरामाने खूप श्रम घेतले. परशुरामाच्या प्रयत्नामुळेच या भागात सुबत्ता नांदू लागली व म्हणूनच परशुराम हा केरळ, कोकण, गोवा या सबंध पश्चिम किनाऱ्यावरील प्रमुख दैवत मानले जाऊ लागले.

पाषाण येथील भित्तीचित्रात परशुरामाच्या अवतार–कथेचा हा जो रचनात्मक उत्तरार्ध आहे त्याचे चित्रीकरण आहे व त्यामुळे तत्कालीन रूढ चित्राच्या तुलनेने हे चित्र लक्षणीय ठरते. (आकृती क्र. २)

हे चित्र मंदिराच्या घुमटात खालील बाजूच्या षोडषकोणी भिंतीच्या एका भागात आहे. चित्राचा आकार ३६"×२०" असा लंबचौकोनी आहे. चित्रात परशुरामाची आकृती मध्यभागी आहे. प्राचीन कालापासून भारतीय चित्रशैलीच्या परंपरेनुसार चित्रविषयातील महत्त्वपूर्ण आकृती इतर आकृतींच्या मानाने मोठी काढावयाची प्रथा होती; त्याप्रमाणे या चित्रातहि परशुरामाची आकृती इतर आकृतींच्या मानाने मोठी रेखलेली आहे, पण चित्रात ही आकृती इतर वातावरणाशी व आकृतींशी समरस न होता उपरी किंवा ओढून ताणून बसविल्यासारखी वाटते. चित्रात परशुरामाच्या आकृतीचे प्रस्तुतीकरण पारंपरिक वाङ्मयीन वर्णनानुसार आहे. परशुरामाच्या डोक्यावर मुगुट आहे. पांढरे धोतर व उत्तरीय असा त्याचा वेष असून त्याच्या डाव्या हातात परशु आहे. परशुरामाच्या समोर असलेल्या शेतकऱ्याशी त्याचा वार्तालाप चाललेला आहे. त्याच्या समोरच्या शेतकऱ्याच्या डोक्यावर घोंगडी असून तो विहीरीजवळ बैलजोडीच्या सहाय्याने मोटेचे पाणी शेतात सोडीत आहे. या चित्रातील दुसरा शेतकरी दाढी मिशा असलेला वयस्क पुरुष आहे. याही शेतकऱ्याच्या डोक्यावर घोंगडी असून तो केळयाच्या झाडाजवळची जमीन खणीत आहे. या लंबचौकोनी चित्रसंयोजनाच्या साधारण मध्यभागी एक आडवी पट्टी आहे. ही आडवी पट्टी म्हणजे पाण्याचा पाट असावा. हे पाण्याच्या पाटाचे चित्रीकरण रूढीबद्ध आहे. पाण्याच्या या प्रवाहात कुठेही पाण्याचा भास होत नाही. चित्रात फोरग्राऊंडमध्ये दोन बगळे दाखवलेले आहेत. या बगळ्यामुळे जमीन ओलसर व पाणी असलेली आहे हे सूचित होते. Background मध्ये नारळीची, केळीची व इतर झाडे दाखविलेली आहेत.

या चित्राचा विषय जरी पौराणिक असला तरी चित्राच्या प्रस्तुतीकरणामुळे हे चित्र ग्रामीण जीवनविषयक एक चांगले चित्र झाले आहे. ग्रामीण जीवनाच्या या रम्य चित्रीकरणामुळेच या चित्राला वैशिष्टच प्राप्त झाले आहे. नारळीच्या व केळीच्या झाडांनी नटलेल्या वनश्रीचे चित्रीकरण करून चित्रकाराने विषयवस्तुचा भूभाग कोकण प्रांत किंवा पश्चिम किनारा आहे हे दाखविलेले आहे. चित्रकाराला भौगोलिक परिस्थितीचे ज्ञान होते हे यावरून स्पष्टच होते. तसेच भातखाचर आहे हे दाखविण्याकरिता शेतात बगळ्यांचे चित्रीकरण करून वातावरणनिर्मीतीचा त्याने केलेला प्रयत्न लक्षणीय आहे. चित्रात बगळ्याचे चित्रण रूढीबद्ध नाही. यापूर्वीच्या व समकालीन चित्रात आकाशात उडणाऱ्या बगळ्यांची मालिका दाखविण्याची पद्धत होती किंवा हे पक्षी नदीकाठी उभे असलेले दाखविलेले असत. पण या चित्रात या पक्षांचा उपयोग या भूभागातील जलवायूचा तपशील दाखविण्याकरिता केला आहे. शेतकऱ्याच्या डोक्यावरची घोंगडी या भागातील परंपरागत वेषभूषेची कल्पना देते.

चित्र फेस्को पद्धतीचे (Technique) चे आहे. Background मध्ये लाल रंग आहे. हिरवा, पिवळा व पांढरा या खनिज रंगाने इतर जागा भरल्या असून बाह्यरेषा काळया रंगाने रंगविल्या आहेत.

प्रस्तुत चित्र तंत्रा (Technique) मुळे महत्वपूर्ण झालेले नसून प्रस्तुतीकरणांच्या वेगळेपणामुळे वैशिष्टचपूर्ण झाले आहे. या अवताराचे चित्रण करताना तत्कालीन चित्रकारांनी परशुरामाच्या जीवनकथेतील संहारक भागच निवडला; पण प्रस्तुत चित्राच्या चित्रकारांनी परशुरामाच्या अवतारकार्याचा सृजनात्मक भाग निवडून तो ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत करून रूढ परंपरेपासून निराळी अशी स्वतंत्र अभिव्यक्ती केली आहे.

गाथाभिगीतम्

गणेश थिटे

गाथा गाऊन त्याच्या मोबदल्यात कुणी काही दिले तर त्याचा स्वीकार करू नये असा नियम बौद्ध साहित्यात काही ठिकाणी सूचित झालेला दिसतो. उदाहरणार्थ **कसिभारद्वाजसुत्त** (**सुत्तनिपात** ४ थे सुत्र) यात अशी कथा आली आहे की बुद्ध एकदा भिक्षा मागत जात असता भारद्वाज ह्या शेती करणाऱ्या ब्राह्मणाकडे येतो. भारद्वाज त्याला भिक्षा देण्याचे नाकारतो आणि वर 'तू काही शेती वगैरे काम का करीत नाहीस' असे विचारतो. बुद्ध त्याला काही गाथा गाऊन उत्तर देतो की मी सुद्धा शेतीच करतो; फक्त ती शेती मानसिक व नैतिक क्षेत्रातील आहे. बुद्धाच्या उत्तरामुळे भारद्वाज प्रसन्न होऊन त्याला मग काही भिक्षा देऊ करतो. पण आता बुद्ध ती भिक्षा स्वीकारण्यास तयार नसतो. तो म्हणतो–

गाथाभिगीतं मे अभोजनेय्यं
संपस्सतं ब्राह्मण एस धम्मो।
गाथाभिगीतं पणुदन्ति बुद्धा
धम्मे सती ब्राह्मण वुत्तिरेसा ॥

गाथा गाऊन प्राप्त झालेले मी स्वीकारू शकत नाही. द्रष्टया लोकांचा, हे ब्राह्मणा, हा धर्म आहे. बुद्ध लोक गाथा गाऊन प्राप्त झालेल्याचा त्याग करतात. जोवर धर्म अस्तित्वात आहे तोवर हे ब्राह्मणा, तीं प्रक्रिया अशी राहणार. (**सूत्र निपात**, पालिटेक्ट्स् सोसायटी आवृत्ति, पान १४; ८४; तुलना करा संयुक्त निकाय १. पा. १६६; १६७; १७३.)

'Vedic sources of some Buddhist beliefs' **Journal of the Asam Research Society**, 14, 1960 (H. Goswani Commemoration Vol.) P. 16 ह्या लेखात पु. बि. **बापट** ह्यांनी वरील बौद्ध नियमाचे मूळ वैदिक ग्रंथात आहे हे दाखविण्यासाठी काठकसंहिता १४·५ उद्धृत करून त्या परिच्छेदात अशाच प्रकारचा विचार आहे असे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र त्यांनी १४.५ मधील संबंधित वाक्ये मुळातून पाहून जशीच्या तशी उद्धृत न करता अपूर्णपणे उद्धृत केली आहेत. त्यामुळे ज्या दोन वाक्यांचा एकमेकांशी संबंध नाही तीही वाक्ये एकमेकांशी जोडून सर्व अर्थच चुकीचा लावला आहे. **बापटांनी** उद्धृत केलेली वाक्ये व त्यांचे भाषांतर असे–

"यो गाथानाराशंसीभ्यां सनोति तस्य न प्रतिगृह्यम्। ...अनृतं मत्तो यदा सोऽमत्तो भवति अथ तं तत् तुपति॥" If a man makes some offerings after listening to some laudatory verses, then those offerings should **not** be accepted... For the man is beside himself (on account of the laudatory verses) and so he cannot (at that time) be truthful to himself. When he regains his former self then that action of his–that of giving–hurts him."

वास्तविक काठकसंहिता १४·५ मध्ये पुढील वाक्ये आहेत–

यो गाथानाराशंसीभ्यां सनोति तस्य न प्रतिगृह्यम्। अनृतेन हि स सनोति। अनृतं हि गाथा। अनृतं नाराशंसी। मत्तस्य न प्रतिगृह्यम् अनृतं हि मत्तो यदा हि सोऽमत्तो भवत्यथ तं तत्तुपति॥ म्हणजे–" जो गाथानाराशंसींच्या योगे (धनादि) मिळवतो त्याच्याकडून काही घेऊ नये. कारण तो अनृताच्या सहाय्याने मिळवत असतो. कारण गाथा अनृत आहे. नाराशंसी अनृत आहे. (तसेच) धुंदीत (मद्याच्या) असलेल्या माणसाकडून काही घेऊ नये; कारण जेव्हा तो धुंदीत असतो तेव्हा तो अनृत असतो. जेव्हा तो शुद्धीवर येतो तेव्हा त्याला ती (दानक्रिया) सतावते (त्याला पश्चात्ताप होतो)."

येथे गाथा ऐकून त्यानंतर दिलेले घेऊ नये असे सांगितले नसून (जसे बौद्ध साहित्यात आहे) जो गाथानाराशंसी म्हणून धन मिळवतो त्याने दिलेले घेऊ नये; म्हणजे भाट, गायक इत्यादींपासून काही स्वीकारू नये असे म्हटले आहे. शिवाय जो धुंदीत (दारुच्या वगैरे) असेल त्याच्याकडूनही काही घेऊ नये असे येथे सांगितले आहे. म्हणजे ज्यांच्याकडून काही घ्यावयाचे नाही त्या व्यक्ती दोन आहेत. एक गाथा गाऊन उपजीविका करणारा व दुसरा धुंदीत असणारा. **बापट** ह्यांनी संपूर्ण वाक्ये उद्धृत न केल्यामुळे त्यांना येथे दोन नियम सांगितले आहे हे लक्षातच आलेले नाही. त्यामुळे **मत्त** म्हणजे दुसऱ्याने म्हटलेल्या गाथा ऐकून मत्त झालेला असा काल्पनिक अर्थ त्यांनी काढलेला आहे; त्याला काही एक आधार नाही. उलट काठकसंहितेसारखीच वाक्ये मैत्रायणी संहिता १.११५ व तैत्तिरीयब्राह्मण १.३.२.६–७ येथे आली आहेत. त्यावरून येथे दारु पिऊन मत्त झालेल्याने दिलेले काही घेऊ नये ("गाथा ऐकून **मत्त** झाल्याकडून" असे नव्हे) हे स्पष्ट होईल. विशेषतः तैत्तिरीय ब्राह्मणातील वाक्यांवरून काही एक संशयच उरणार नाही, म्हणून ती उद्धृत करीत आहे.

देवा वै ब्रह्मणश्चान्नस्य शमलमपाघ्नन्। यद्ब्रह्मणः शमलमासीत्। सा गाथा नाराशंस्यभवत्। यदन्नस्य सा सुरा। ६। तस्माद्गायतश्चं मत्तस्य न प्रतिगृह्णीयात्। यत्प्रतिगृह्णीयात् शमलं प्रतिगृह्णीयात्। तै. ब्रा. १.३.५–६–७). म्हणजे "देवांनी ब्रह्माचा (वेदाचा) व अन्नाचा मलिन भाग दूर केला. ब्रह्माचा मलिन

भाग गाथा नाराशंसी बनला. अन्नाचा मलिन भाग सुरा झाला. म्हणून गायक व (मद्याने) मत्त ह्यांच्याकडून काही घेऊ नये. जर घेतले तर मलच घेतल्यासारखे होईल."

ह्यावरून काठकसंहितेत व तेथील परिच्छेदांशी सदृश असलेल्या मैत्रायणी संहितेत व तैत्तिरीय ब्राह्मणात पुढीलप्रमाणे दोन नियम सांगितले आहेत–(१) गाथा नाराशंसी गाणाऱ्या माणसाने काही दिले तर ते घेऊ नये. (२) मद्याच्या धुंदीत असलेल्याने काही दिले तर ते घेऊ नये. परंतु बौद्धसाहित्यात जो नियम आला आहे की आपण गाथा म्हटल्यावर कुणी काही दिले तर ते घेऊ नये असा आहे. ह्या नियमाला वरील तीनही वैदिक परिच्छेदांत काडीमात्र आधार सापडणार नाही.

बौद्ध साहित्यात आढळणाऱ्या नियमाची वेगळ्या काही उताऱ्यांशी सांगड घालावी लागेल. हा नियम संगीताविषयी सामान्यपणे आढळणाऱ्या तिरस्काराच्या भावनेशी संबद्ध आहे. वर उल्लेखिलेल्या वैदिक परिच्छेदात गायकाकडून काही घेऊ नये असे म्हटले आहे. तसेच आपणही गायन करून उपजीविका करू नये; निदान ती गर्ह्य आहे अशा प्रकारचे विचार अनेकदा आढळून येतात. जैमिनीय उपनिषद् ब्राह्मण १.१८.२.१ मध्ये गायक मलिनपणे जगतात असे म्हटले आहे (मलेन हि एते जीवन्ति।) राजाच्या स्तुतिपर गाथा म्हणून जगणारे भाट तुच्छ मानले जात. महाभारतात १३ परिशिष्ट १.१५.८३६ व पुढे येथे गृहस्थांवर अवलंबून असणाऱ्या माणसांची यादी दिली आहे. त्यात **रंगोपजीविन्** व **सर्वशिल्पज्ञ** ह्यांचा उल्लेख आहे. सर्वशिल्पज्ञांमध्ये संगीतकारांचा समावेश आहे. म.भा. १३ परिशिष्ट १.१५.२०० व पुढे ह्या अनुसार जे आपस्वार्थी असतात ते संगीतकार भाट होतात असे म्हटले आहे. शर्मिष्ठा देवयानीला तुझे वडील गाणारे, स्तुतिपाठक, भिकारी, दिलेले घेणारे आहेत असे म्हणते व हिणवते. प्रजापतिस्मृति ५१ येथे गाणारा ब्राह्मण हा माकडाप्रमाणे आहे असे म्हणून त्याला कमी लेखले आहे. (मून्वयै-श्चिकित्सां कुरुते कथां चित्रां करोति यः। गीतं गायति भृत्यर्थं विप्रः स ह्यवगो मतः॥) अशा रीतीने संगीताचा पेशा हा हीन मानला गेला आहे. नीरो हा रोमन सम्राट जेव्हा "व्यावसायिक" संगीतकार झाला तेव्हा रोमन् लोकांना ते आवडले नाही. (पहा **J. F. Scott in E. Wellesz, Ancient and Orienital Music** Oxford Reprint 1966, P. 417). बुद्धालाही समाजात संगीताने उपजीविका करणाऱ्यास कमी लेखतात हे माहीत होते. म्हणून तो जरी संगीत शिकला होता (पहा ललित–विस्तार, ed. **J. Lefmann**, Halle, 1902, P. 156) तरी संगीताचा त्याला उपजीविकेसाठी उपयोग करावयाचा नव्हता. म्हणून तो गाथा म्हणून झाल्यावर मग काही कुणी दिले तर ते नाकारीत असे.

भोकरदनः सातवाहनकालीन नवे कलाकेंद्र

शांताराम भालचंद्र देव

ज्यांना महाराष्ट्राचे पहिले सम्राट म्हणता येईल अशा सातवाहन राजघराण्याचे राजकीय जीवन व त्यांच्या समकालीन सांस्कृतिक परिस्थिती या दोन्हीबद्दल सर्वंकष माहिती अद्याप पूर्णतया उपलब्ध झालेली नाही. या राजघराण्याबद्दलही विविध प्रश्न अद्याप अनुत्तरित राहिलेले आहेत. त्यांचा काल, या राजघराण्याचा उगम, त्यांचा धर्म, या राजघराण्यातील राजांची संख्या, त्यांची नावे व त्यांच्याबद्दल उपलब्ध असलेली वाङ्मयीन माहिती या सर्वात एकमत नाही. या राजघराण्याच्या समकालीन सामाजिक आणि सांस्कृतिक माहिती ज्यात मिळू शकेल अशा वाङ्मयीन पुराव्याचा सखोल व तुलनात्मक अभ्यासही अद्याप व्हावयाचा आहे.

याच राजघराण्याच्या कालात बौद्धधर्मीयांनी अनक ठिकाणी लेणी कोरली व त्यात शेकडो उत्कीर्ण लेखही आहेत. या लेण्यांचा वास्तुशास्त्राच्या दृष्टीने अभ्यास झालेला आहे हे खरे असले तरी त्यातील लेख सांस्कृतिक दृष्टचा संपूर्णपणे अभ्यासिले गेलेले नाहीत. प्रतिवर्षी नवनवीन लेख उघडकीस येत आहेत. जैन वाङ्मयात, सातवाहनांबद्दल विविध माहिती उपलब्ध आहे. परंतु त्यावरून ऐतिहासिक दृष्टचा सुस्पष्टता आणता येत नाही. विशेषतः सातवाहनांच्या कुलोत्पत्तीसंबंधी, त्यांच्या बलाढचपणाविषयी आणि त्यांच्या दिग्विजयाबद्दल थोड्याफार कथा या वाङ्मयात आढळून येतात; परंतु त्यात सत्य किती, दंतकथा किती आणि ऐतिहासिकता किती याचे विश्लेषण करता येत नाही.

सातवाहनांच्या राज्यात तीस तटबंदीयुक्त नगरी होत्या असा उल्लेख प्लिनीने (२) केला असला तरी पुरातत्त्वीय उत्खननात यासंबंधीचा निश्चित पुरावा उपलब्ध झालेला नाही. पैठण, तेर, कराड, ब्रम्हपुरी (कोल्हापूर), नेवासे इत्यादि ठिकाणी उत्खनने झालेली आहेत. यातील पहिली तीन अपूर्ण व मर्यादित स्वरूपात केली गेल्याने त्यातून सातवाहनकालीन सामाजिक वा आर्थिक जीवनाबद्दल फारशी माहिती उपलब्ध झालेली नाही. ब्रम्हपुरी व नेवासे या ठिकाणी मात्र घरादारांचे अवशेष मिळाल्यानें तत्कालीन राहाणीमान कसे असावे याबद्दलचे अंदाज करता आलेले आहेत. मात्र तटबंदीयुक्त वसतीचा पुरावा अद्याप उपलब्ध झालेला नाही. कदाचित विस्तृत उत्खननाच्या अभावी अशा तऱ्हेचा पुरावा अद्याप अज्ञात असावा.

कोल्हापूर, तेर आणि नेवासे या ठिकाणी सातवाहनकालीन कलात्मक वस्तूंच्या स्वरूपात तत्कालीन कला–कुसरीबाबत महत्त्वपूर्ण पुरावा उपलब्ध झालेला आहे. कोल्हापूरच्या उत्खननात सातवाहनकालीन ब्रॉन्झच्या विविध वस्तू उपलब्ध झालेल्या आहेत. चाकावर बसवून फिरवता येण्यासारखे हत्ती,[३] ब्रॉन्झची तबके इत्यादि वस्तू तत्कालीन कला व कारागिरी यांचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. नेवासे [४] आणि तेर या ठिकाणी, तद्वतच कोण्डापूर येथे सापडलेल्या उत्कृष्ट केओ-लीनच्या मूर्ती सातवाहनकालीन कलेच्या उच्च प्रतीची प्रचीती आणून देतात. या मूर्ती सांच्यात बनविलेल्या असून त्या यक्षांच्या तद्वतच सजविलेल्या घोड्यांच्या व हत्तींच्या आहेत. यक्षसदृश प्रतिमा त्यांच्या प्रमाणबद्धतेमुळे जितक्या आकर्षक आहेत, तितक्याच त्यांच्या विविध दागदागिन्यांमुळे व चेहेऱ्यावरील अर्धस्फुट स्मितामुळे मनोहारी झालेल्या आहेत.

याव्यतिरिक्त तेर येथे उत्कृष्ट हस्तिदंताची स्त्रीमूर्ती सापडलेली असून [५] ती तेथील सुप्रसिद्ध संग्राहक कै. रामलिंगप्पा लामतुरे यांनी मिळवलेली आहे. अशाच तऱ्हेची दुसरी हस्तिदंती स्त्रीमूर्ती युरोपात इटलीतील पॉम्पे या सुप्रसिद्ध प्राचीन स्थली मिळालेली आहे. या मूर्तींच्या सादृश्यावरून व त्यांच्या शैलीच्या साम्या-वरून सातवाहन साम्राज्यातील तगरपुर (तेर) येथे या मूर्ती घडवीत असत असे मत काही विद्वान मांडतात. तेर, पैठण, नाणेघाट, कल्याण यांचा व्यापारी मार्गाने संपर्क येत असल्याने व इसवी सनाच्या सुरुवातीस भारत-रोम व्यापार वाढल्याने सातवाहन साम्राज्यातील कला केंद्रात बनविण्यात आलेली ही हस्तिदंती मूर्ती व्यापारी मार्गे पॉम्पे येथे निर्यात करण्यात आली असावी.

परंतु तेरव्यतिरिक्त दुसरे हस्तिदंती कलाकुसरीचे केंद्र अलिकडील पुरात-त्वीय संशोधनात उघडकीस आले असल्याने, ही कला केवळ तगर या केंद्रापुरतीच मर्यादित नव्हती असे आता निश्चितपणे म्हणता येते. औरंगाबाद ते अजंठा या राजमार्गावर औरंगाबादपासून सुमारे ४० मैलांवर असलेल्या सध्याच्या भोकरदन या ठिकाणी उत्खननात हा नवीन पुरावा उपलब्ध झालेला आहे. भोकरदन हे प्राचीन भोगवर्धन या नावाचे अपभ्रष्ट रूप आहे. या ठिकाणी पांढरीची टेकाडे आहेत व हे स्थल प्राचीन भोगवर्धन असावे असा पहिला शोध भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे महानिदेशक श्री. म. न. देशपांडे यांनी लावला.

भोकरदनला प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर असे दिसून आले की या ठिकाणी पाच मोठमोठी पांढरीची टेकाडे आहेत व त्या टेकाडावर सातवाहनकालनिदर्शक अशी काळी-आणि तांबडी खापरे वरवरच मिळतात. याशिवाय पावसाळ्याच्या शेवटी

टेकाडांची माती धुपून जावून जे लहानमोठे प्राचीन अवशेष उपलब्ध होतात त्यांचे संग्रह गावात अनेक ठिकाणी विविध व्यक्तींनी केलेले आहेत. यात प्राचीन नाणी, मातीची खेळणी व मूर्ती इत्यादि निरनिराळ्या प्रकारचे अवशेष अंतभूत झालेले आहेत. त्याचप्रमाणे या प्राचीन टेकाडापासून सुमारे एक मैल अंतरावर शैव गुहा आहेत. या सर्व गोष्टी लक्षात घेता, येथे उत्खनन करण्याचे ठरले [६] व ते उत्खनन १९७२–७३ व ७३–७४ या साली करण्यात आले.

या उत्खननात जो पुरावा उपलब्ध झाला त्यावरून असे दिसून आले की भोकरदन सातवाहनकालात विविध कलांचे केंद्र होते व विशेषतः हस्तिदंती मूर्ती व इतर वस्तू तयार करणाऱ्या कारागीरांची वस्ती त्या ठिकाणी होती. तेर येथे सापडलेली हस्तिदंताची स्त्रीमूर्ती वरवर, उत्खनन न करता, स्तरीय संदर्भविरहित सापडलेली होती. परंतु भोकरदनला अशा दोन मूर्ती सापडल्या व त्याचबरोबर इतरही अनेक हस्तिदंताच्या वस्तू व हस्तिदंताचे तुकडे सापडल्याने भोकरदन सातवाहनकालात हस्तिदंत कारागिरीचे केंद्र होते असे निश्चित झाले.

भोकरदनच्या उत्खननात सातवाहनपूर्वकालाचे काहीही अवशेष सापडले नाहीत. त्यामुळे केवळ पूर्वसातवाहनकालातच भोकरदनला वस्ती झाली असा कयास करता येतो. या कालात राहाणारे येथील रहिवासी, निदान बरेचसे, बौद्ध-धर्मीय असावेत; कारण सांची आणि भारहूत येथील स्तूपांच्या उत्कीर्ण लेखात 'भोगवढणक' येथील रहिवाश्यांनी त्या स्तूपांना देणग्या दिल्या असे सांगितले आहे. सातवाहनांच्याच कालात पश्चिम महाराष्ट्रातील बहुतेक बौद्ध लेणी कोरली गेली हे ध्यानात घेता महाराष्ट्रात त्याचप्रमाणे भोगवर्धन येथेही बौद्धधर्माचा व धर्मी-यांचा प्रभाव असावा यात नवल नाही.

सातवाहनांच्याच कालात बौद्धधर्माच्या प्रसाराबरोबरच निरनिराळ्या कलांना उत्तेजन मिळाले यात शंका नाही. सांचीच्या स्तूपाच्या एक तोरणावरील उठावातील शिल्पे विदिशा या मध्यप्रदेशातील ठिकाणच्या दंतकारांनी आपल्या कलात्मक हातांनी खोदली असा तेथील लेख सांगतो. तेव्हा शैलोत्कीर्ण गुंफा, शिल्पे, मृत्तिकाशिल्पें, हस्तिदंती काम, ब्रॉन्झचे काम या विविध कलांना सातवाहन-कालात प्रोत्साहन मिळाले.

विदिशाप्रमाणेच सातवाहनकालात भोकरदन–भोगवर्ध्दन–हे दंतकारांच्या कलेबद्दल प्रसिद्ध असावे. पैठण ही सातवाहनांची राजधानी समजली जाते. पैठणच्या उदयानंतर भोकरदनची मांडणी झाली आणि राजधानीच्या सुबत्तेनुसार भोकर-दनच्या कलाकारांना उत्तेजन मिळत गेले. सातवाहनांच्या अस्तानंतर पैठणचे महत्व इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात कमी झाले. यामुळे भोकरदनचेही महत्त्व

इसवी सनाच्या तिसऱ्या शतकानंतर अगदी लयाला गेले; याचा प्रत्यय उत्खननात तिसऱ्या शतकानंतरच्या थरात सापडलेल्या निकृष्ट पुराव्यावरून येतो.

सातवाहनांच्या कालात भोकरदनला झालेल्या वस्तीचे स्वरूप आणि तेथील विविध धंदे-कलांचे स्वरूप उत्खननात सापडलेल्या पुराव्यावरून दिसून येते. या कालातील घरे दगडगोटयांचा पाया, त्यावर काही उंचीपर्यंत विटा व त्यावर मातीच्या कच्च्या विटा, लाकडी वासे व त्यावर उभारलेले कौलारू छप्पर अशा योजनेची होती. बहुसंख्य घरांत मातीने बांधलेल्या भट्टया होत्या व पाणी वाहून जाण्याकरिता पन्हाळचा व पाणी साठवण्यासाठी मोठमोठे मातीचे अर्धवर्तुलाकृति कुंडे होते. काही घरात मोठ्या संख्येने मुसी सापडल्या. या मातीच्या असून त्यावर दोन्ही पृष्ठभागावर काचेचा द्रव दिलेला होता. या उघड्या गोल तोंडाच्या व निमुळत्या अथवा बहिर्गोल बुडाच्या असल्याने त्या चिमटयात पकडून विस्तवावर, त्यातील सोन्यासारखा धातू मिळविण्यासाठी, धरल्या जात असाव्यात हे निश्चित. याशिवाय काही घरात मणी व नाणी बनविण्याचे दगडी साचे सापडले. याच आकाराचे मणी व नाणी सापडल्याने, हे साचे प्रत्यक्ष या ठिकाणी वापरले जात असले पाहिजेत.

धातुकाम व मणिकाम याशिवाय भोकरदन येथे हस्तिदंताचे विविध काम होत होते याचाही पुरावा उत्खननात मिळाला. कारागीरांच्या वसतीतील सलग तीन घरात हस्तिदंताचे लहानमोठे तुकडे, दोन हस्तीदंती स्त्रीमूर्ती, हस्तिदंताचे विविध आकारातील, काही पूर्ण व काही अपूर्ण अवस्थांतील मणि व बांगड्या व डोळ्यात काजळ घालावयास वापरता याव्यात अशा कज्जलशलाका या वस्तू सापडल्या. काही हस्तिदंताचे लहान दंड अशा स्वरूपात होते की त्यावर बांगड्या अखंड काढण्यासाठी खाचा आखलेल्या होत्या. त्याचबरोबर हस्तिदंताचे फासेहीं तयार केले जात. हे काटकोनी चौकोनी असून त्याच्या प्रत्येक मुखावर गोल ठिपके खोदलेले होते. अशा कज्जलशलाका, बांगड्या व फासे सातवाहनकालातील कराड, नेवासे, तेर, इत्यादि ठिकाणीही सापडलेले आहेत. परंतु भोकरदनला त्यांचा आढळ मोठ्या प्रमाणावर झाला व तोही कारागीराच्या घरात.

या बारीकसारीक वस्तूशिवाय भोकरदनला उत्खननात पूर्वसातवाहनकालातील थरात दोन उत्कृष्ट हस्तिदंती स्त्रीमूर्ती सापडल्या. यातील एक अर्धी व दुसरी पूर्ण आहे. पूर्ण असलेलीही दर्शनी भागावर अत्यंत खराब झालेली आहे. अर्धी मूर्ती तेर व पॉम्पे येथे सापडलेल्या स्त्रीमूर्तींची आठवण करून देते. अनेक पदरी जाड कमरपट्टा, पायात मोठे तोडे व त्यावर एकावर एक अनेक वाळे, पारदर्शक अधोवस्त्र यांनी ही मूर्ती अलंकृत केलेली असून स्त्रीचा नाभीप्रदेश, मांड्या व पोटऱ्या

रसरशीत व प्रमाणबद्ध आहेत. यांचा उठाव व गोलाई तेरच्या मूर्तीपेक्षा सरस असून उत्कृष्ट कलेची साक्ष या मूर्तीत मिळते. मूर्तीच्या दोन्हीं अंगाला प्रत्येकी एक स्त्रीमूर्ती असून त्यापैकी एकीने करण्डक व दुसरीने काही अस्पष्ट वस्तू हातात घेतली आहे. एकीने आपल्या खांद्यावर सध्याच्या 'शबनम्' पिशवीसारखी पिशवी अडकवलेली आहे. या अर्ध्या स्त्रीमूर्तीच्या वरच्या भागात मधोमध एक गोल खोबणी केलेली दिसते. मस्तक ते छातीपर्यंतचा मूर्तीचा वरचा अर्धा भाग दुसऱ्या हस्तिदंताच्या तुकड्यापासून बनवून तो भाग पिनच्या सहाय्याने या खोबणीत अडकविला जात असावा. कदाचित नऊ ते दहा इंच उंचीचा सलग हस्तिदंताचा तुकडा मिळणे कठीण पडत असावे; त्यामुळे व बनवावयास सुलभ जाण्यासाठीही, ही मूर्ती दोन भागात बनविली गेली असावी. यंदाच्या उत्खननात सापडलेली दुसरी हस्तिदंती मूर्ती पूर्ण असली तरी तिचा दर्शनी भाग फुटून तुटून विद्रूप झालेला आहे. या मूर्तीची योजनाही वरील मूर्तीप्रमाणेच आहे. तिच्या दोन्ही अंगाला प्रत्येकी एक दासी उभी असून त्यांनी आपल्या हातात काही वस्तू घेतलेली आहे. मुख्य स्त्रीच्या मूर्तीवरील अलंकार व वस्त्रयोजना वरील मूर्तीप्रमाणे असली तरी तिची केशभूषा मात्र नयनमनोहर आहे. पॉम्पे येथे उपलब्ध झालेल्या मूर्तीप्रमाणेच भोकरदनच्या या स्त्रीमूर्तीने आपले केस अनेक पेडांच्या वेण्या घालून सजवलेले आहेत. प्रत्येक पेडाच्या टोकाला गेंदेदार गोंडे बांधले आहेत. या दोन्ही स्त्रीमूर्ती तेर येथे सापडलेल्या मूर्तीपेक्षा प्रमाणबद्धता, अवयवांची गोलाई व टवटवीतपणा आणि उठाव या दृष्टीने नि:संशय सरस आहेत.

उत्खननात उपलब्ध झालेल्या या दोन उत्कृष्ट मूर्ती, हस्तिदंताच्या बांगड्या, कज्जलशलाका, मणि व फासे, हस्तिदंताचे अनेक तुकडे, निरुपयोगी नाण्यांचे दगडी साचे, मण्यांचे दगडी साचे, तांब्याने रिव्हेट केलेल्या हस्तिदंती व शंखाच्या बांगड्या व कारागिरांची वसती दर्शविणाऱ्या घरांचे अवशेष, भोकरदन सातवाहनकालात एक कलाकेंद्र म्हणून उर्जितावस्थेत होते हेच दर्शवितात. खुद्द तेर वा इतरत्र सापडलेल्या पुराव्यापेक्षा भोकरदनचा पुरावा विविध, संख्येने मोठा व कलात्मकदृष्टचा सरस असल्याने, भोकरदन पैठणच्या राजकीय आणि आर्थिक आश्रयामुळे हुन्नरासाठी प्रसिद्ध झाले असावे. पैठणला जाणाऱ्या व्यापारी मार्गावर असल्याने तेथील कलात्मक वस्तूंची निर्यात केवळ सातवाहन साम्राज्यांतर्गत प्रदेशात होत होती असे नसून, येथील वस्तू परदेशातही जात असाव्यात. पॉम्पे येथे सापडलेली हस्तिदंती स्त्रीमूर्ती तेर ऐवजी भोकरदन येथे बनविली गेली असावी असे म्हणणे धाडसाचे ठरू नये. सातवाहनांच्या अस्ताबरोबरच येथील कलेला अवकळा आली !

संदर्भ

(१) पहा, बृहत्कल्पसूत्र, खंड ६

(२) मजुमदार व पुसाळकर (संपादक), दि एज ऑफ इंपिरयल युनिटी, पृ. १९४.

(३) पहा, कार्ल खण्डालावाला, ललितकला, ७, 'ब्रह्मपुरी' पृष्ठ २६.

(४) सांकलिया व इतर, फ्रॉम हिस्ट्री टु प्री-हिस्टरी अॅट नेवासा, पृ. ४०७.

(५) मोतीचंद्र, जर्नल ऑफ दि प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियम, ६, अेन्शंट इंडियन आयव्हरीज, पृ. ४.

(६) पहा, देव, शां. भा, भोकरदन एस्कॅव्हेशन, पृ. १८८.

१७१४ चा अहमदाबाद येथील हिंदु-मुसलमान दंगा

दि. के. देशपांडे

इ. स. १७१४ ते १७१६ या तीन वर्षांत अहमदाबाद येथे हिंदु–मुसलमान जमातीत तीन वेळा दंगे झाले. यांपैकी इ. स. १७१४ मध्ये झालेला दंगा फार मोठ्या प्रमाणावर झालेला असल्याने व त्या दंग्यात मालमत्तेची व माणसांची हानी फार मोठ्या प्रमाणावर झाली असल्याने त्या दंग्याची हकीकत येथे थोडक्यात देत आहे. पुढील दोन वर्षांत झालेले दंगे किरकोळ स्वरूपाचे असल्याने त्या दंग्याचा शेवटी ओझरता उल्लेख केला आहे.

१७१४ चा हिंदु–मुसलमान दंगा होळीचे निमित्ताने झाला. या वर्षी होळीचा दिवस १८ फेब्रुवारी १७१४ हा होता. दंगा पुढे २–३ दिवस उग्र स्वरूपात चालू होता. यावेळी अहमदाबाद (गुजरात) हा दिल्लीचा एक सुभा होता. मराठ्यांच्या स्वाऱ्या यापूर्वीपासून गुजरातमध्ये क्वचित होत असल्या तरी त्यांचा राजकीय प्रभाव यावेळी गुजरातमध्ये मुळीच नव्हता. दिल्लीचा बादशहा फरुकशियर (१७१३–१७१९) हा असून तेथील प्रमुख कारभारी सय्यद बंधु होते. अहमदाबादला या वेळी दाऊदखान पन्नी हा सुभेदार होता. हा दाऊदखान पन्नी औरंगजेबाच्या काळापासून गाजलेला अनुभवी अधिकारी असून तो दक्षिणेच्या राजकारणातील एक चांगला जाणकार व राजकारणी मुत्सद्दी होता. सुभेदार म्हणून तो अहमदाबादला अधिकारावर आल्याच्या दुसऱ्या वर्षी[1] म्हणजे इ. १७१४ मध्ये ही दंग्याची घटना घडली.

होळीच्या दिवशी, मदन गोपाल[2] या सावकाराच्या हरि राम या गुमास्त्याने आपल्या घरी काही व्यावसायिकांना व हिंदु मित्रांना होळीचा सण साजरा करण्याकरिता आमंत्रण देऊन बोलाविले. अहमदाबादची मदनगोपाळची पेढी चांगली भरभराटीला आलेली असून, हरि रामकडे अहमदाबादच्या अनेक सावकारांचे व सराफांचे जाणे येणे असे. त्यांची भव्य हवेली अहमदाबादच्या झवेरी वाड्यात[3] (सराफ गल्लीत) होती. पेढीचा मालक मदन गोपाळ हा मात्र त्या वेळी दिल्लीला होता.[4] होळीच्या निमित्ताने हरि रामकडे बरीच मंडळी जमली.

पानसुपारी व इतर प्राथमिक औपचारिक भाग संपल्यावर सर्वजण होळी खेळण्यासाठी बैठकीवरून खाली आले. होळी खेळण्याचे वेळी ही सर्व मंडळी रंगात आली. एकमेकांच्या अंगावर धूळ-माखणे (धुळवडीचा कार्यक्रम), रंग टाकणे किंवा गुलाल उधळणे या गोष्टी सुरू झाल्या. या त्यांच्या गोष्टी आपापसात चालू असता योगायोगाने एक मुसलमान त्या रस्त्याने जात होता. रस्त्याने जाणाऱ्या-येणाऱ्यांना आपल्या या खेळात सामील करून घेण्याची हिंदूंची पद्धत असल्याने त्या मुसलमानाला या लोकांनी घेरा घालून, या खेळात ओढले.

इतरांप्रमाणेच त्याच्या अंगावर गुलाल उधळणे, रंग उडविणे व धूळ माखणे या गोष्टी त्यांनी केल्या. त्या मुसलमानाला ही गोष्ट नुसती अयोग्य नव्हे तर अपमानास्पद वाटली असे त्यानंतरच्या घटनांवरून दिसते.[५] काही वेळाने मोठ्या खुबीने तो मुसलमान त्यांच्या तावडीतून निसटला व आपल्या मित्रांसमवेत महंमद अली नावाच्या एका मुसलमान धर्मगुरूसमोर, चिखलाने व रंगाने भरलेल्या अंगासह उभा राहिला. धर्मगुरू महंमद अली त्या वेळी एका मुसलमान समुदायासमोर कुराणावर भाष्य करीत होता. एवढे होईतो वरिष्ठ आणि कनिष्ठ अशा सर्व वर्गाचे मुसलमान एकत्रित येऊन या घटनेबद्दल राग व क्षोभ व्यक्त करण्यासाठी तेथे जमा झाले. धर्मप्रेमाने भारलेल्या व आपल्या धर्मीयांस सहाय्यभूत होण्यासाठी त्या जमावाने महंमद अलीला जामा मशिदीत ओढीत नेले. [६] अबदुल अझीझ नावाचा सुन्नी बोहरी जमातीचा प्रमुख होता. या गोष्टीचा तडा लावून घेण्यासाठी त्यालाहि मशिदीत बोलावण्यात आले. आपल्या काही अनुयायांसह अब्दुल अझीझ मशिदीत आला. येवढा वेळ जाईपर्यंत ही बातमी चोहोकडे पसरली आणि त्यामुळे अनेक मुसलमान लष्करी शिपाई, व्यापारी, शहरचे व जवळपासचेहि रहिवासी टोळ्याटोळ्यांनी 'दीन दीन' करीत, आरडाओरडा करीत त्या मशिदीत जमू लागले.[७] हिंदूंची घरे व दुकाने लुटावीत, जाळावीत व हिंदूंच्या कत्तली कराव्यात अशी त्या सर्वांची तीव्र इच्छा होती.[८]

नंतर ते सर्वजण जमावाने अहमदाबाद शहराचा प्रमुख काजी[९] खैरूल्ला खान याचे घराकडे गेले. ही इस्लामी धर्माची बाब आहे व काजीने त्यात लक्ष घातले पाहिजे, अशी त्या जमावातील लोकांची मागणी होती. हा सर्व प्रकार अगोदरच लक्षात आल्यामुळे व जमावाला घाबरून काजीने आपल्या घराचा दरवाजा व बाहेरील फाटक बंद केले व तो आत लपून बसला.[१०] जमावातील अशिक्षित, अडाणी व रांगडे लोक तो दरवाजा बंद करून बसला म्हणून त्याला अद्वातद्वा बोलून मोठमोठ्याने शिवीगाळही करू लागले. काही गुंडांनी त्याच्या घराला आग लावून दिली. सियार-उल-मुताखेरीन या फारसी ग्रंथाचा लेखक

म्हणतो की खुद्द काजीचीच या कृत्याला फूस होती.[११] आपल्या कृत्याला काजीचा पाठिंबा आहे हे दाखविण्यासाठी हे सर्व लोक शेवटी त्याला घेऊन रस्त्याने चालले.[१२] रस्त्याने जाताना वाटेतील हिंदूंच्या सर्व घरांना आगी लावीत हा जमाव पुढे चालला.[१३] कापड बाजारातील हिंदूंची दुकानें त्यांनी लुटली व जाळली. सराफ बाजारही साफ लुटला. पैसा, सोने-नाणे, हरतऱ्हेचा माल यांनी खच्चून भरलेली ती दुकानें व तो बाजार शेवटी खलास झाला.[१४] मुसलमानी जमावाकडून घरांना आगी लावण्याचे व सर्वनाश करण्याचे हे काम असेच पुढे चालू राहिले असते; परंतु कपूरचंद भन्साळी या पुढाऱ्याने सशस्त्र विरोध केल्यामुळे ते एवढ्यावरच थांबले.[१५] हा कपूरचंद अहमदाबादचा त्या वेळी नगरशेठ म्हणून गाजलेला, अत्यंत धनवान् असा सावकार व व्यापारी होता. तो धर्माने जैन असून अहमदाबादच्या हिंदू व्यापाऱ्यांचा व सराफांचा पुढारी होता. बोहरी जमातीचा प्रमुख अब्दुल अझीझ व कपूरचंद भन्साळी यांच्यात त्या वेळी फार वैमनस्य होते. कपूरचंद नगरशेठ म्हणून गाजत असल्याने बोहरी पुढारी अबदुल अझीझ याला त्याचा फार हेवा वाटे.[१६] त्या दोघांच्या दीर्घकाळ असलेल्या वैमनस्यामुळे, त्यावेळी दोघांनी वचपा काढण्याचा प्रयत्न केला असे दिसते. जाळपोळ करीत जमाव झवेरीवाड्याकडे आला; त्या वेळीं नगरशेठ कपूरचंद भन्साळी, दंग्याला कारणीभूत ठरलेला मदनगोपाळच्या पेढीचा गुमास्ता हरि राम व इतर पुढारी तेथे जमले होते. आपल्या घराला व झवेरीवाड्याला (सराफ आळीला) आगी लागण्याचा धोका आहे हे ओळखून या सावकाराने झवेरीवाड्याचे मोठे दरवाजे लावून घेतले. आपल्या जवळ व इतर मित्रांचे जवळ शस्त्रास्त्रे सज्ज ठेवून त्याने संरक्षणाची कडेकोट व्यवस्था केली.[१७] कपूरचंदच्या ओळखीचे व आश्रयाखालील काही गुजराती मुसलमान सैनिक त्याच्या भोवती जमा झाले.[१८] बेकार लढाऊ लोकांना अशा वेळी काम मिळण्याची संधी मिळते. ' मिराते अहमदी ' या ग्रंथाचा लेखक रागाने लिहितो की 'धर्माचा विचारही न करता व्यापाऱ्यांच्या व सराफांच्या वाड्याभोवती ते गुजराती मुसलमान शिपाई त्यांच्या संरक्षणासाठी उभे राहिले. पैशासाठी त्यांनी आपला धर्मही विकला.' झवेरीवाड्याच्या मोठ्या दरवाज्याबाहेर दारुगोळ्यासहित लढवय्ये लोक ठेवून खिडक्या व झरोके उघडून त्यातून हिंदूंचे वतीने प्रतिकार सुरू झाला. आपापल्या महालाच्या गच्चीवरूनही एकमेकाकडे दगड-गोटे व दारुगोळे फेकणेही सुरूच होते. या धुमश्चक्रीत कित्येक जीव प्राणास मुकले. हा दंगा पुढे दोन दिवस असाच चालू होता. दंग्याच्या काळात सुभ्याच्या राजधानीच्या शहरातीलच सर्व दुकानें बंद झाल्याने व्यापार अगदी बसला. दंगा चालू होता त्या वेळी अहमदाबादचा सुभेदार दाऊदखान पन्नी हा साबरमती जिल्ह्यात वसूल गोळा करण्यासाठी फिरतीवर होता. दंग्याची हकीकत त्याला कळल्यावर तो लगेच राजधानीला परतला. लढणाऱ्या दोन्ही पक्षांना एकमेकापासून

दूर करण्यासाठी त्याने फौजेची एक तुकडी पाठवली. रक्तपात थाबविण्याचा व कोणाचाही अडथळा न जुमानण्याचा त्यांना हुकूम दिला. कपूरचंद भन्साळी याने सुभेदाराच्या व त्याच्या दिवाणाच्या गाठीभेटी घेतल्या. शहरातील व्यवहारी धूर्त व शहाण्या लोकांनी लष्करी तुकडीला सर्व माहिती देऊन दंग्याची ठिकाणे दाखविली. दाऊदखानच्या येण्यामुळे दंगा थांबविण्यास मदत झाली व सर्वत्र शांतता निर्माण झाली.

अहमदाबादच्या याच दंग्याच्या कारणाचे मूळ सियार–उल–मुताखेरीन[१९] या ग्रंथात थोडे वेगळे दाखविले आहे. सय्यद गुलाम हुसेनखान या लेखकाच्या माहितीप्रमाणे या दंग्याचे कारण पुढीलप्रमाणे आहे. 'होळीचा सण साजरा करण्याची हिंदूंची एक विशिष्ट पद्धत आहे. एका गृहस्थाला आपल्या रिवाजाप्रमाणे होळी साजरा करावयाची होती. त्याच्या घराच्या टोकाला (दुसरे बाजूला) मुसलमानांची वस्ती होती. मुसल्मानांनी रात्री होळी पेटविण्यास हरकत घेतली. प्रत्येक माणूस आपल्या घरात कुलमुखत्यार आहे या सबबीवर त्या हिंदूने ती फेटाळून लावली व होळी पेटवली. दुसऱ्याच दिवशी त्या शेजारच्या मुसलमानांनी एक गाय आणून आपल्या वाड्यात ठेविली. हिंदूच्याच सबबीवर (प्रत्येक माणूस आपल्या घरात कुलमुखत्यार असतो.) सणाच्या निमित्ताने तिचे मांस शिजवून सर्वांना मेजवानी करावी व गरीबांना ते वाटावे या उद्देशाने त्यांनी ती गाय कापली. गाय कापण्याच्या मुसलमानांच्या कृतीने त्या आळीतील सर्व हिंदू खवळले व ते मुसलमानांवर चालून गेले. मुसलमान आपापल्या घरात लपून बसले. आपल्या धर्माविरुद्ध आगळीक झाली यामुळे संतप्त झालेल्या हिंदूंनी गाय कापलेल्या मूसलमानांना धरून आणण्याचा प्रयत्न केला; परंतु तो न सापडल्याने त्याच्या १४ वर्षाच्या मुलाला धरून आणून गाय कापलेल्या ठिकाणी त्याला मारून टाकले. ही हकीकत कळताच शहरातील मुसलमान संतप्त झाले. त्यांनी या घटनेबद्दल भयंकर कोलाहल केला. केवळ शहरातील नागरीक मुसलमान नव्हे, तर सुभेदार दाऊदखान पन्नीचे हजारो अफगाण सैनिकही त्यात सामील झाले.[२०] या पुढच्या प्रत्यक्ष दंग्याची हकीकत मात्र पूर्वी दिलेल्या प्रमाणेच या लेखकाने दिलेली आहे.

दंगा शांत झाल्यावर पुढे घडलेल्या हकिकतीसंबंधी सियार-उल-मुताखेरीन व मिराते अहमदी या दोन फारसी ग्रंथांत थोडी भिन्नता आढळते. सियार-उल-मुताखेरीनमध्ये पुढची हकिकत पुढीलप्रमाणे दिली आहे. "दंगा शांत झाल्यावर आपल्यावर अन्याय झाला आहे, या भावनेने मुसलमानांनी आपले नावाजलेले तीन पुढारी अबदुल वहीद, महमदअली (उत्तम वक्ता) व अबदुल अझीझ (बोहरी

पुढारी), यांना बादशाहाकडे दिल्लीला तक्रार करण्यासाठी पाठवले. सुभेदाराशी व हिंदूंच्या पुढाऱ्यांशी जुळवून घेण्यासाठी याच पुढाऱ्यांची योजना झाली होती. परंतु सुभेदाराकडून त्यांचे समाधान न झाल्यामुळे ते तक्रार करण्यास राजधानीला गेले[२१].

या प्रकरणात आपले अंग गोवले जात आहे हे पाहून सुभेदार दाऊदखान पन्नी याने दुसरी बाजू बादशाहाचे कानावर घालण्यासाठी कपूरचंद भन्साळी याला दिल्लीला पाठविले. त्याचेबरोबर घडलेल्या घटनांची इत्थंभूत हकिकत सांगणारे एक अधिकृत पत्र सुभेदाराने दिले. या पत्रावर खुद्द सुभेदार, अहमदाबाद शहराचा मुख्य काजी, सुभ्याचा सेनाधिकारी व सर्व सरकारी अधिकाऱ्यांच्या सह्या होत्या. या पत्रात, "या दंग्यांत हिंदूंचा काहीही दोष नाही. सर्व आगळीक व आक्रमक वृत्ती मुसलमानांनी दाखविली आहे." अशी शिफारस लिहून दिली. [२२] हे सर्व सरकारी अधिकारी मुसलमान होते. मुसलमानांच्या शिष्टमंडळाचे तीन पुढारी दिल्लीला आल्याबरोबर त्यांना सय्यद अबदुल्लाचा काश्मीरी व विश्वासू अधिकारी रतनचंद याने, त्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करून तुरुंगात टाकले. खोजा महमद जाफर या धर्मप्रेमी माणसाचे या घटनेकडे लक्ष जाऊन त्याने त्यांची काही दिवसानंतर तुरुंगातून सुटका केली."[२३]

'मिराते अहमदी' या ग्रंथात अहमदाबादच्या लेखकाने ही हकिकत थोडी वेगळी परंतु अधिक सविस्तर दिली आहे. तो म्हणतो–" बादशाहा फरुखसियरच्या फौजी तळावरील हिंदु सावकार व गुजराती व्यापारी यांना होळीनिमित्ताने झालेल्या दंग्याची हकिकत व्यापारी लोकांच्या पत्रातून कळल्यावर, त्यांनी दिल्लीत आपला धंदा बंद केला व सर्वांनी एकमुखाने महमदअल्ली, मुल्ला अबदुल अझीझ यांचे चिथावणीने दुकानांची राखरांगोळी, माणसांच्या कत्तली, पैसा व मालाची व बाजारपठेची लूट झाली, अशी तक्रार बादशाहाकडे केली. बादशाहाने फर्मान काढले व त्याप्रमाणे कडव्या (harsh) गुर्झबरदारांनी (mace-bearers) जाऊन महमदअल्ली अझीझ, मुल्ला अबदुल अझीझ, कपूरचंद भन्साळी, हरिराम यांना बेड्या घालून राजधानीत न्यायालयापुढे उभे करण्यासाठी पाठवले[२५].

हे बादशाहाचे खास दूत अहमदाबादला येण्यापूर्वीच, बादशहाच्या या आज्ञेची माहिती, मुल्ला अबदुल अझीझ याला बादशहाच्या तळावरील बोहरी व्यापाऱ्यांच्या पत्रातून कळाली. त्यांनी महमदअल्लीला ती माहिती दिली आणि ते दोघे स्वतःच बादशाहाकडे तक्रार करण्यासाठी दिल्लीला निघाले. कपूरचंद भन्साळी व हरिराम यांना ती माहिती यानंतर मिळाली. ते दोघेही दिल्लीला आपणहून निघाले. मध्यंतरी रस्त्यावर ही सर्व मंडळी दिल्लीला गेल्याची माहिती बादशहाच्या खास दूतांना-

गुर्झबरदारांना-कळाली, तेव्हा ते दिल्लीला परतले. एकमेकांमागून एक सर्वजण राजधानीला पोचले. धर्मगुरु महमदअल्ली हा गोड व रसाळ वाणीचा अत्यंत प्रभावी वक्ता होता. समोरच्या जमावावर त्याचा बोलण्याची फार छाप पडे. दिल्लीला जातांक्षणीच जामा मशिदीत काझीच्या स्थानावरून कुराणावर भाष्य करण्यास त्याने सुरुवात केली. हजर असलेल्या समाजावर त्याचा फार चांगला परिणाम झाला. तो अत्यंत लोकप्रिय ठरला. त्याची कुराणावरील भाष्ये ऐकण्यासाठी गरीब व श्रीमंत अशा सर्व थरातल्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटू लागल्या. सर्वजण त्याचे अनुयायी होऊन त्याचेभोवती गोळा होऊ लागले. फाजेलखानामार्फत त्याच्या गुणांची प्रशस्ती बादशाहाचे कानावर गेली. बादशाहाने त्याला आपल्या भेटीस बोलाविले. महमदअल्लीने मुल्ला अझीझला आपले बरोबर घेतले. तोही हुशार व गुणी माणूस होता. बादशहाने त्यांचे तोंडून सर्व हकिकत सविस्तर ऐकली. हिंदु व्यापाऱ्यांच्या चुकीच्या तक्रारीमुळे अशा चांगल्या माणसाला घरदार सोडून यावे लागले याचा बादशहाला खेद झाला. त्यांच्या निर्दोषत्वाबद्दल बहुधा बादशहाची खात्रीच झाली असे दिसते.[२६] कपूरचंद भन्साळी यांच्या पायात बेडचा घालून त्याला अटकेत टाकावे असा बादशहाने हुकुम दिला. सुभेदाराने त्याच्या घरादाराची जप्ती करावी असाही हुकूम बादशहाने अहमदाबादला पाठवून दिला. त्या हुकुमाची ताबिली होऊन कपूरचंदाचे अहमदाबादचे घर व मालमत्ता जप्त करण्यात आली. पुढे बादशहाने महमद अल्लीचे कुराणावरील भाष्य ऐकले, तेव्हा तर तो त्याचेवर पूर्वीपेक्षा जास्त खूष झाला. भाष्य ऐकताना बादशहा सारखा "वाहवा!" करीत राहिला. बादशाहाने त्याची फारच स्तुस्ती केली. ही वार्ता सगळीकडे पसरली. अनेक लोक त्याचेकडे सारखे येजा करू लागले. असे काही दिवस गेल्यानंतर कपूरचंद भन्साळीच्या लक्षात आले की महमदअल्ली व बोहरा जमातीचा पुढारी मुल्ला अबदुल अझीझ यांच्याशी जुळवून घेतल्याशिवाय, त्यांच्या मदतीवाचून आपली सुटका होणार नाही. तेव्हा त्या दोघांना कपूरचंदाने निरोप पाठविला की, "आपण सर्वजण एका भागातले व एका गावातले राहणारे आहोत. भांडण विसरून, शत्रुत्वाचे मैत्रीत रूपांतर करून आपण तडजोड करूं या व सर्वजण प्रेमाने आपल्या मुलुखात परत जाऊं या." पुढे मुल्ला अबदुल अझीझने बादशाहाकडे परत जाण्याची परवानगी मागितली व त्याच वेळी त्याने कपूरचंदाचीहि सुटका बादशाहाकडून करवून घेतली. कुराणाचा भाष्यकार महमदअली मात्र बादशाहाचे आग्रहाने व प्रेमाने तेथेच राहिला. इतर सर्वजण पुढे सुखरूपपणे आपल्या गावी परतले."[२७]

१७१५ मध्ये सुभेदाराच्या अफगाण सैनिकांनी हिंदूंची दुकाने लुटल्यामुळे अहमदाबादेचे वातावरण पुन्हा बिघडले होते. या वेळी दाऊदखानाला परत बोलावून,

त्याच्या जागी गझनीखान झालोरी याला नेमले. अजितसिंग राठोड गुजरातचा सुभेदार म्हणून नेमला जाईपर्यंत झालोरीच तेथे सुभेदार म्हणून काम पहात होता.

१७१६ मध्ये हिंदू–मुसलमानात भयानक दंगा होण्यासारखी परिस्थिती अहमदाबादला पुन्हा निर्माण झाली. 'ईद'च्या निमित्ताने काळूपूर भागातील बोहरी लोकांनी गाय व म्हैस कापण्यासाठी जमा केल्या. या वेळी अजितसिंग राठोड हा राजपूत सुभेदार असल्यामुळे, त्याला हे आवडणार नाही या धास्तीने किंवा गायी-विषयी कणव मनात निर्माण झाल्यामुळे त्या भागातील हवालदाराने कापण्यासाठी आणलेली गाय आपल्या ताब्यात घेतली. यामुळे बोहरी संतप्त झाले व ते जमावाने काजी खैसल्लाखान याच्याकडे तक्रार करावयास गेले. काजी काहीच निर्णय देईना. त्याचीहि स्थिती हवालदाराप्रमाणेच झाली. लूटमार व जाळपोळ मोठ्या प्रमाणा-वर होणार असे दिसू लागले. काही शांतताप्रिय नागरिकांनी हे टाळण्यासाठी सुभेदार अजितसिंगाकडे जाऊन, यासंबंधी निर्णय देऊन दंगल टाळण्याची विनंती केली. सुभेदार अजितसिंगाने निर्णय दिला की "आपल्या धर्माप्रमाणे यथायोग्य आचरण करण्यास मुसलमानांना पूर्ण स्वातंत्र्य आहे." हा निरोप काजीकडे गेल्यावर मुसलमान समुदाय शांत झाला व पुढील गंभीर प्रसंग टळला.

स्वातंत्र्यपूर्वकाळात, ब्रिटिश साम्राज्य येथे स्थिरावण्यापूर्वी फार काय मराठ्यांचाहि राज्यविस्तार होण्यापूर्वी दिल्लीच्या मोगल अमदानीत, हिंदू-मुसलमान दंगा कसा निर्माण होत असे व तो वणव्याप्रमाणे कसा वाढत असे याची माहिती, या प्रश्नाचा अभ्यास करणाऱ्याला उपयोगी पडेल. यात दिलेल्या सर्व हकीकती मुसलमान लेखकांनी व अधिकाऱ्यांनी दिलेल्या आहेत हेहि या संदर्भात लक्षात घेण्याजोगे आहे.

संदर्भ

१. Siyer–ul–Mutakherin by Sayyad Gulam Husen Khan, Vol. I, P. 72.

२. 'मदन गोपाळ' हा उत्तर हिंदुस्थानी सावकार गाझीउद्दीनखान फिरोजजंग याचेबरोबर खजिनदार म्हणून गुजरातेत आला. फिरोजजंगाच्या मृत्युनंतर त्याने अहमदाबादला स्वतःची पेढी उघडली व त्या पेढीवर हरि राम हा गुमास्ता ठेवून दिला.

३. गुजरातेत पूर्वी शहराच्या वस्तीत एकेका जातीच्या वस्तीच्या मोठमोठ्या गल्ल्या असत. संरक्षणासाठी या गल्ल्यांच्या दोन्ही बाजूला दरवाजे असत. संकटाचे वेळी हे दरवाजे बंद करून गल्लीचे संरक्षणाची व्यवस्था करीत असत. गल्ली

लहान असेल तर त्याला 'पोळ' म्हणत व मोठी असेल तर त्याला 'वाडा' किंवा वाडी म्हणत. जसे 'भाट वाडी', 'ब्राह्मण वाडी', 'झवेरी वाडी.'

४ 'मिराते अहमदी' पृ. ३५८
('मिराते अहमदी : लेखक : अलीमहमदखान.)

५ मिराते अहमदीचा कर्ता अली महमदखान हा 'त्या मुसलमानाच्या अंगावर रंग उडविल्यामुळे त्याचा अपमान झाला' असेच म्हणतो.

६ मिराते अहमदी

७ कित्ता

८ "The whole crowd was bent upon killing and looting Hindus." पृ. ३५८

९. काजी हा त्या वेळी सरकारी अधिकारी गणला जात असे.

१०. सियार-उल्-मुताखेरिन या फारसी ग्रंथाच्या लेखकाच्या म्हणण्याप्रमाणे सुभेदार हिंदूंचा पक्षपाती असल्याने, काजीने यांत लक्ष घातलें नाही.

११. सियार-उस्-मुताखेरिन खंड १; पृ. ७३.

१२. कित्ता

१३. कित्ता

१४. मिराते अहमदी

१५. सियार-उल्-मुताखेरिन

१६. मिराते अहमदी

१७. मिराते अहमदी व सियार-उल-मुताखेरिन

१८. कपूरचंद भन्साळी याचेवर अशा अडचणी व संकटे पुढे वारंवार येऊ लागल्याने त्याने ५०० खडे स्वार ठेवून स्वतःच्या बचावाची व्यवस्था केली.
Commissariat : History of Gujarat Vol. II

१९. सियार-उल्-मुहाखेरिन खंड १; पृ. ७२ चे पुढे.

२०. कित्ता

२१. सियार-उल-मुताखेरिन, खंड १; पृ. ७२ व पुढे

२२. कित्ता

२३. कित्ता

२४. गुर्झबरदार (Mace–bearer) : गदेसारखे किंवा दातेरी टोके असलेल्या रविसारखे एक हत्यार खांद्यावर टाकून खास बादशाही हुकमाने कामावर

निघणारे बादशाही दूत. हे दूत बादशाही हुकुमाने नेमलेल्या कामावर जात असल्याने त्यांना काही विशेष अधिकार असत. ते जातील त्या ठिकाणच्या स्थानिक मोगली अधिकाऱ्यांनाहि त्यांचे म्हणणे ऐकावे लागे व त्यांना जरूर ती मदत करावी लागत असे.

२५. मिराते अहमदी

२६. महमदअलीच्या कुराणावरील रसाळ व प्रभावी वक्तव्यांमुळे बादशाहाची त्याच्या निर्दोषीपणाबद्दल खात्री झाली. दुसऱ्या पक्षाची बाजूहि ऐकून न घेता, त्याला निर्दोषी ठरवण्याचा बादशाहाचा निर्णय लक्षात घेण्याजोगा आहे. धर्मप्रेमापुढे मोगली न्याय कसा दुबळा ठरत असे त्याचा हा एक नमुना आहे.

२७. मिराते अहमदी

२८. Bombay Gazetteer Vol. I: 1. 299

२९. Commissariat, History of Gujarat. Vol III P. 390.

शोध निबंध

मंडळाच्या त्रैमासिकासाठी पुरातत्त्व, प्राचीन कला, संस्कृती, इतिहास यावरील संशोधनात्मक किंवा साधन विचार करणारे निबंध पाठवावेत. शक्यतो मराठीत असावेत, इंग्रजीहि समाविष्ट करण्यात येतात.

पन्हाळगडचा वेढा (इ. स. १७०१)

प्र. न. देशपांडे

मराठ्यांचे राज्य नष्ट करण्याच्या इराद्याने जवळजवळ दीड तप दक्षिणेत तळ ठोकून बसलेल्या औरंगजेबाला राजारामाच्या मृत्यूची (२ मार्च १७००) बातमी समजल्यावर मनोकामना पूर्ण झाल्याचा आनंद झाला. खाफीखान लिहितो, 'बादशहाला ही बातमी कळली...त्याने परमेश्वराचे आभार मानले आणि शाहजण वाजविण्याची आज्ञा केली.'[१] मोगल लष्करातील लहानमोठ्या अधिकाऱ्यांची प्रतिक्रिया खाफीखानाने पुढील शब्दात व्यक्त केलेली आढळते. 'या दुष्ट मराठ्यांची पाळेमुळे नाहीशी झाली. त्याच्या (राजाराम) मागे त्याची लहान मुले आणि निराधार बायका राहिल्या आहेत[२] त्यांचा निकाल लावणे म्हणजे अगदी सोपे आणि क्षुल्लक काम आहे.' परंतु औरंगजेबाचा आणि त्याच्या पदरी असलेल्या अधिकाऱ्यांचा लवकरच भ्रमनिरास झाला. राजारामाच्या मृत्यूनंतरही मराठ्यांचे राज्य धुळीस मिळविता येणे अशक्य आहे याची औरंगजेबाला खात्री पटली. राजारामाची विधवा पत्नी ताराबाई हिने मराठा सरदारांत चैतन्य निर्माण केले आणि मोठ्या मर्दुमकीने अनेक आघाड्यांवर मोगलांचा प्रखर प्रतिकार करण्यास सुरुवात केली. खाफीखानानेच म्हटल्याप्रमाणे ताराबाईने विलक्षण धामधूम उडविली.[३] स्वातंत्र्यप्रिय मराठ्यांची चिवट आणि निकराची झुंज पाहून मोगल बादशहा हताश झाला. तरीही मोठ्या जिद्दीने मराठ्यांचे किल्ले जिंकून घेण्याची मोहिम औरंगजेबाने पुन्हा हाती घेतली. या मोहिमेत त्याने अनेक किल्ले घेतले. परंतु हे किल्ले घेताना मोगल सरदारांचे सामर्थ्य उपयोगी पडले नाही. किल्लेदारांना अफाट लाच देऊन किल्ले ताब्यात घेण्याचे तंत्र औरंगजेबाने स्वीकारले. परंतु अशा प्रकारे हाती आलेले किल्ले मोगलांची पाठ फिरताच मराठ्यांनी जिंकून घेतले. त्यामुळे खजिनाही रिकामा झाला आणि किल्लेही गेले असे म्हणण्याची पाळी औरंगजेबावर आली. अखेरीस मोहिमेचा हा शेवटचा कालखंड त्याच्या दृष्टीने शोकपर्यवसायी ठरला.

औरंगजेबाच्या अपयशाला प्रामुख्याने ताराबाईचे कर्तृत्व आणि मराठे सरदारांची स्वातंत्र्यलालसा कारणीभूत झाली. पावसाळा येईपर्यंत किल्ले झुंजवायचे आणि त्यानंतर मोगलांकडून भरपूर लाच घेऊन ते त्यांच्या हवाली करावयाचे ही नीति मराठ्यांनी स्वीकारलेली होती.[४] पावसाळा संपताच पुन्हा किल्ले जिंकून

घेऊन वर्चस्व प्रस्थापित करणे मराठ्यांना अशक्य नव्हते. मराठ्यांच्या या धूर्तपणाची औरंगजेबाला नीटशी कल्पना झाली नाही असेच म्हणावे लागेल. सतत किल्ले जिंकत राहणे, एवढे एकच ध्येय त्याने उराशी बाळगले होते. 'तारीखे दिल्कुशा'चा लेखक भीमसेन सक्सेना याने म्हटल्याप्रमाणे 'बादशहाला मराठ्यांचे किल्ले जिंकून घेण्याचे वेडच लागले [५]होते.' मराठ्यांनी स्वीकारलेले तंत्र ज्याप्रमाणे औरंगजेबाच्या अपयशाला कारणीभूत झाले, त्याचप्रमाणे मोगल अधिकाऱ्यांची भ्रष्टाचारी वृत्ती, मोहिमेविषयीची उदासीनता आपापसातील द्वेषभाव आणि वेळकाढूपणा इत्यादी दुर्गुणही कारणीभूत झाले. जवळजवळ दीड तप आपापली घरेदारे सोडून परप्रांतात डोंगराळ प्रदेशातील किल्ले जिंकण्याचे बिकट काम मोगल सैन्य करीत होते. बादशहाचा अधिकार म्हणून त्याची आज्ञा मानावयाची आणि पडेल ते काम केवळ कर्तव्य म्हणून करावयाचे अशी प्रवृत्ती मोगल सेनेत निर्माण झाली होती. मोगल सेनेच्या संसाराची दुर्दशा कशी झाली होती याचे चित्र भीमसेन सक्सेनाने मार्मिकपणे रेखाटले आहे.[६] मोगल अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचे दाखलेही विपुल प्रमाणात मिळतात.[७] औरंगजेबाच्या मोहिमेच्या अपयशाचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे किल्ले जिंकण्यासाठी मोगलांनी स्वीकारलेले चुकीचे तंत्र हे होय. डोंगरी किल्ले जिंकून घेण्यासाठी दमदमे उभारणे, साबात किंवा भुयारी मार्ग खोदणे इत्यादी अत्यंत खर्चिक क्लेशकारक मार्गांचा मोगलांनी अवलंब केला. दमदमे उभारण्यासाठी आणि 'साबात' तयार करण्यासाठी लाखो रुपये मोगल अधिकाऱ्यांनी खर्च केले. परंतु कचखाऊ प्रवृत्तीमुळे किल्ल्यांच्या तटांना खिंडार पाडून प्रवेश करणे आणि जय मिळविणे त्यांना फारसे जमले नाही. किल्ले ताब्यात घेण्यासाठी मराठ्यांना भरपूर लाच देण्याचे सत्र या अधिकाऱ्यांनी सुरु केले. अशा प्रकारे मोगलांच्या खजिन्यालाच खिंडार पडून तो रिकामा होण्याची वेळ आली. खाफीखान लिहितो, 'शहाजहान बादशहाने साठविलेला सगळा खजिना बादशहाने ओतला...पण मराठ्यांचा पराक्रम वाढतच [८]गेला.'

किल्ले घेण्यासाठी मोगल अधिकारी किती यातायात करीत आणि अखेरीस ते अपयशी कसे ठरत याची कल्पना इ. स. १७०१ मधील पन्हाळगडाच्या वेढ्याच्या हकीकतीवरून येण्यासारखी आहे. औरंगजेबाचा एक विश्वासू अधिकारी साकी मुस्तैदखान हा या मोहिमेच्या वेळी घटनास्थळी उपस्थित होता. त्याने आपल्या 'मासिरे आलमगीरी' या फारसी ग्रंथात पन्हाळगडच्या वेढ्याचे (९ मार्च ते २८ मे) वर्णन तपशीलाने दिले आहे. खाफीखानाने आपल्या 'मुन्तखबुललुबाब' या ग्रंथात पन्हाळ्याच्या वेढ्याची हकीकत दिली आहे. साकी मुस्तैदखानाने तरबियतखान, फत्तेहुल्लाखान इत्यादी मोगल सरदारांच्या कर्तृत्वाची आणि अकलमंदीची केलेली तारीफ आढळते. खाफीखानाने मात्र पन्हाळ्याच्या वेढ्याचा

तपशील देताना तरबियतखान हा मोगल अधिकारी फत्तेहुल्लाखान, महंमद मुरादखान या कर्तृत्ववान अधिकाऱ्यांचा द्वेष करीत असे हे स्पष्ट केले आहे. 'बादशहाची दक्षिणेकडील मोहीम लांबण्याचे मुख्य कारण म्हणजे सरदारांतील मतभेद आणि त्यांच्यातील एकीचा अभाव हे होय' असे प्रामाणिक मत खाफीखानाने व्यक्त केलेले आढळते.[९] परंतु मोगल अधिकाऱ्यांच्या अपयशावर खरा प्रकाश सर विल्यम नॉरीस या ब्रिटिश राजदूताने टाकलेला दिसून येतो. पन्हाळगडचा वेढा चालू असतानाच विल्यम नॉरीस औरंगजेबाच्या भेटीसाठी लष्करी तळावर आला होता. त्याने स्वतः वेढ्याचे निरीक्षण केले. साकी मुस्तैदखानाप्रमाणे मॉरीसनेही पन्हाळ्याच्या वेढ्याची हकीकत लिहून ठेवली; त्यावरून मोगलांनी स्वीकारलेले मोहिमेचे तंत्र किती चुकीचे होते याची कल्पना येते.

साकी मुस्तैदखानाने वेढ्याचे वर्णन करताना तरबियतखानाने तयार केलेल्या 'साबात'ची किंवा भुयारी मार्गाची माहिती दिलेली आहे. हा मार्ग खडकाळ जमीन खणून तयार करण्यात आलेला होता. एकाच वेळी तीन सशस्त्र माणसे जाऊ शकतील एवढा तो रुंद केलेला होता. त्याशिवाय भुयारी मार्गात एका विशिष्ट ठिकाणी वीस सैनिक बसू शकतील असे स्थळ तयार करण्यात आले होते. या ठिकाणाहून सैनिकांना किल्ल्याच्या सफेलीवर किंवा पडकोटावर असलेल्या लोकांवर मारा करण्यासाठी खास सोय करण्यात आली होती.[१०] याचाच अर्थ या स्थळाला आणि भुयारी मार्गाला जंग्यांची (loopholes) तरतूद करण्यात आली असावी. बुरुजाच्या खालच्या भागापर्यंत हे भुयार तयार करण्यात आले. साकी मुस्तैदखान लिहितो, 'बुरुजाचा खालचा भाग खणून इतका पोकळ करण्यात आला होता की खालील पोकळीत मोगलांचे एक पथक पहारा देत असे.[११] दुसऱ्या बाजूने फतेहुल्लाखानाने किल्ल्याच्या तटापर्यंत अशाच प्रकारचा भुयारी मार्ग तयार केला.' खाफीखानानेही या दोन्ही मार्गांची माहिती दिलेली आहे.[१२] औरंगजेबाने एप्रिल १७७१ मध्ये फतेहुल्लाखानाने तयार केलेल्या भुयारी मार्गाचे निरीक्षण केले असे नॉरीस लिहितो.[१३]

परंतु अशा प्रकारचे भुयारी मार्ग तयार करूनही मोगलांना किल्ला सर करण्याची हिंमत होईना. खाफीखान लिहितो, 'हे सर्व करूनही किल्ल्यावरील लोक हवालदिल झाल्याचे चिन्ह [१४]दिसेना.' खाफीखानाने त्याचे कारण दिले नाही. नॉरीसने केलेल्या निरीक्षणात मोगल अधिकाऱ्यांच्या कचखाऊ प्रवृत्तीचे दर्शन होते. 'The fort, it seemed, had no more guns than the besiegers and not more than three hundred men, and though there were two or three breaches in the wall; yet the Mughal army dared not attempt to enter or make an [१५]assault या कचखाऊ प्रवृत्तीची

कारणमीमांसा करताना नॉरीसने अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारी वर्तनाला दोष दिला आहे. औरंगजेबाने एक लाखापेक्षा अधिक सैनिक पगारावर ठेवले असताना प्रत्यक्षात वीस हजार सैनिकच खऱ्या अर्थाने लढत होते. खोटी हजेरीपुस्तके तयार करणे आणि भरपूर पैसा खाणे ही गोष्ट अधिकाऱ्यांना चांगलीच मानवलेली होती. नॉरीस लिहितो, " Ye cheifest Gaine of all ye officers for a Generall yt has ye pay of 8,000 horse wch is about 25,000 sterling a month (as Ased Choun has) if he keepes 1,500 it is reckond a greate deale and ye Rest put in his pockett and sae all ye Rest." [१६] औरंगजेबाच्या तोफखान्यावर काम करणाऱ्या एका इंग्लीश माणसानेही पुढीलप्रमाणे उद्‌गार काढले होते; ' ye top to ye bottom there is nothinge but cheatinge and treachery and basenesse in ye Highest degree. ' [१७] बिकट आर्थिक परिस्थितीमुळे मोगल लष्करातील नोकरांचे पगारही थकले होते असे नॉरीसला दिसून आले.

किल्ल्याच्या तटावर मारा करण्यासाठी सात तोफा मोगलांनी रोखल्या होत्या. या तोफांमधून दगडी गोळ्यांचा वर्षाव करण्यात येत असे. वास्तविक पहाता लोखंडी गोळ्यांचा उपयोग अधिक परिणामकारक झाला असता. नॉरीसने त्याबद्दल आश्चर्य व्यक्त केलेले आढळते. मोगलांचा तोफखाना अवजड आणि किल्ले (विशेषत: डोंगरी) जिंकुन घेण्याच्या दृष्टीने कमी फलदायी होता. हरिहर दास यांनी म्हटल्याप्रमाणे, 'The Mughal's heavy artillery was so inadequte because it was cumbrous, unmanageable and ill–mounted by the Indian gunners, who were at that period unskilled in the management of [१८]ordnance.' यावरून दमदमे उभारणे आणि भुयारी मार्ग खोदणे या दोन्ही गोष्टी डोंगरी किल्ले घेण्याच्या दृष्टीने सोयीच्या नव्हत्या हे दिसून येईल. डोंगरी किल्ले जिकण्यासाठी दोराच्या साह्याने किंवा शिडयांच्या मदतीने कडेकपारी आणि तट चढून जाणे हाच खरा मार्ग होय. मोगलांना हा मार्ग अपरिचित आणि दुष्कर होता. पुष्कळ ठिकाणी त्यांनी स्थानिक मावळे लोकांना भरपूर पैसे देऊन त्यांचा उपयोग करून घेतला. परंतु शिडयांच्या किंवा दोराच्या साह्याने (नरदुबान) किल्ला जिंकून घेणे मोगलांना जमलेच नाही.

एप्रिल १७०१ मध्ये औरंगजेबाने पन्हाळा आणि पावनगड या दोन्ही किल्ल्यांवर निकराचा हल्ला करण्याची आज्ञा मोगल अधिकाऱ्यांना केली. पावन-गड हा पन्हाळ्याजवळचा दुसरा डोंगरी किल्ला होय. एका अर्थाने हा किल्ला

म्हणजे पन्हाळचाचा उपदुर्ग. त्यामुळे पन्हाळचाबरोबर पावनगड जिंकून घेण्याची योजना औरंगजेबाने आखलेली होती. पन्हाळा आणि पावनगड यांच्या दरम्यान असलेली एक टेकडी महमद मुरादखान याने सर केली आणि टेकडीवरून मोर्चे बांधण्याचा उपक्रम सुरू केला असे खाफीखान सांगतो. परंतु मुरादखानचे वर्चस्व सहन न होणाऱ्या रूहुल्लाखान, हमीदुद्दीनखान इत्यादी अधिकाऱ्यांनी मुरादखानला अडचणीत पकडून त्याचा कार्यभाग उधळून लावण्यात यश मिळविले. दोन किल्ल्यांच्या दरम्यान असलेल्या टेकडीवर मोगलांनी ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला; परंतु तो अपयशी ठरला असे नॉरीस लिहितो.

किल्ले (पावनगड आणि पन्हाळा) जिंकण्याची आशा मावळू लागल्यामुळे मोंगल अधिकाऱ्यांनी नॉरीस आणि त्याच्या सहकाऱ्यांना मदत करण्याची विनंती केली. या प्रसंगी बादशहाला मदत केली तर मागाल त्या सवलती मिळतील असे आमीषही नॉरीसला दाखविण्यात आले. या ब्रिटिश राजदूताने आपल्याबरोबर बारा पितळी तोफा आणल्या होत्या. या तोफांमधून लोखंडी गोळे उडविले पाहिजेत अशी अट घालून नॉरीसने औरंगजेबाला तोफा देण्याचे मान्य केले.[२२] नॉरीसबरोबर आलेल्या सर्व ब्रिटिश सोल्जरांनी किल्ला जिंकून घेण्यासाठी मोगल सेनेला मदत करावी अशी औरंगजेबाची इच्छा होती. परंतु त्यात धोका वाटल्यामुळे नॉरीसने फक्त सहा कुशल गोलंदाजांना मदतीस देण्याचे कबूल केले. बादशहा आणि ब्रिटिश राजदूत यांच्यामध्ये मतैक्य होऊ शकले नाही. दरम्यानच्या काळात शहाजादा महमद कामबक्ष आणि तरबियतखान यांनी किल्लेदाराबरोबर बोलणी सुरू केली होती. अखेरीस भलीमोठी रक्कम घेऊन मराठा किल्लेदाराने २८ मे १७०१ रोजी पन्हाळा आणि पावनगड हे दोन्ही किल्ले मोगलांच्या हवाली केले. साकी मुस्तैदखान मात्र लिहितो की किल्ल्यातील लोक शहाजाद्याला शरण आले. तेव्हा बादशहाने मोठ्या उदार मनाने त्यांचे अपराध माफ करून त्यांना किल्ले सोडून जाण्याची परवानगी दिली.[२४]

पन्हाळ्याच्या वेढचासंबंधी खाफीखान, साकी मुस्तैदखान आणि विल्यम नॉरीस या लेखकांनी दिलेला तपशील काळजीपूर्वक पाहिल्यास प्रामुख्याने खालील गोष्टी स्पष्ट होतात.

१. पन्हाळा आणि पावनगड जिंकून घेण्यात मोगलांना यश आले नाही. मराठ्यांनी स्वीकारलेल्या तंत्राप्रमाणे किल्लेदाराने पावसाळा तोंडावर आल्यानंतर भलीमोठी रक्कम मोगलांकडून घेऊन दोन्ही किल्ले त्यांच्या हवाली केले. २८ मे रोजी किल्ले स्वाधीन करण्यात आले ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.

२. डोंगरी किल्ले जिंकून घेण्यासाठी मोंगलांनी स्वीकारलेले युद्धतंत्र (दमदमे उभारणे, साबात तयार करणे इत्यादी) खर्चिक, क्लेशकारक आणि हास्यास्पद स्वरूपाचे होते. या पद्धतीमुळे तीनतीन महिने वेढा रेंगाळत चालत असे.

३. मोगलांजवळच्या तोफा फारशा परिणामकारक नव्हत्या. तोफांमधून दगडी गोळे उडविण्याचे तंत्र स्वीकारल्यामुळे त्यांचा प्रभावही पडू शकत नव्हता.

४. मोगल अधिकारी एंकमेकांचा द्वेष करीत होते. साधी टेकडी हस्तगत करण्याचे यशही महंमद मुरादखानला त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनी लाभू दिले नाही. स्वतः बादशहा संशयी स्वभावाचा होता. नॉरीस लिहितो, ‘The old Kinge is very cunninge and has spys upon everydody’

पन्हाळ्याप्रमाणेच इतर डोंगरी किल्ले घेण्यासाठीही मोगलांनी चुकीचे तंत्र स्वीकारले आणि परिणामी औरंगजेबाची दक्षिणमोहीम अखेरीस अपयशी ठरली.

संदर्भ

१. मराठ्यांचे स्वतंत्र्ययुद्ध (खाफीखानाचा साधनग्रंथ)–संपादक सेतुमाधवराव पगडी, पृ. ४८.

२. कित्ता, पृ. ४८.

३. कित्ता, पृ. ४९.

४. ताराबाईने सिंहगडच्या किल्लेदारास १६ एप्रिल १७०३ रोजी लिहिलेल्या पत्रातील उल्लेख पहाण्यासारखा आहे. ‘पर्जन्य पडेपर्यंत किल्ला भांडवावयाचा होता ती गोष्ट न केली’ (भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष ७, अं. १–४, पृ. ७५)

५. मोगल आणि मराठे (तारीखे दिल्कुशा) – सं. सेतुमाधवराव पगडी, पृ. १६७.

६. कित्ता – पृ. १६०. बादशहाच्या लष्करातील लोकांना ‘जगात उत्तम निवासस्थान म्हणजे तंबू’ असे वाटू लागले.

७. The Army of the Indian Moghulas –Irvine, p. 45; मोगल आणि मराठे पृ. १५७–१६०.


८. मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ८२.

९. कित्ता, पृ. ६२

१०. मराठे व औरंगजेब (मासिरे आलमगिरी)–सं. सेतुमाधव पगडी, पृ.९७

११. कित्ता – पृ. ९७

१२. मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ५८–५९
१३. The Norris embassy to Aurangzeb–H. H. Das, P. 295.
१४. मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ५९
१५. The Norris embassy to Aurangzeb, P. 294
१६. कित्ता, पृ. २९४
१६. कित्ता, पृ. २९४
१८. कित्ता, पृ. ३००–३०१
१९. मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ६१
२०. कित्ता, पृ. ६१–६२
२१. The Norris embassy to Aurangzeb, P. 295
२२. कित्ता, पृ. २९६
२३. मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ६४
२४. मराठे व औरंगजेब, पृ. ९९
२५. The Norris embassy to Aurangzeb, P. 294.



बाजी पासलकरांच्या सुटकेचा मार्ग

बाजी पासलकरांचे अटकेतून पलायन

द. न. पासलकर

पुण्याच्या पश्चिमेला बारा मावळांपैकी मोसे खोरे हे एक आहे. हे बाजी पासलकरांच्या ८४ मोसे खोऱ्यांपैकीं. मोसे बु. एक गांव आहे. त्या मोसे खोऱ्याची हद्द पुण्याच्या पश्चिमेला १८ मैलावर मालखेड व सांगरुण या चबूतऱ्यापासून पश्चिमेला सुरू होते. हा चबुतरा म्हणजे शिवगडाचे उत्तरेकडील टोक मोसे खोऱ्यातून जी नदी वहात येते तिला टेकले आहे. तेथपासून मोसे खोरे पश्चिमेला सुरू झाले.

इ. स. १६४२ चे दरम्यान मोसे खोऱ्यामध्ये (सूडाचा उतारा मध्ये ७।१२ स. नं. ११५– मोगलाचे आडव असा उल्लेख आहे.) बादशहाचा मोसे बु. येथे मोगलाचा वाडा आहे. या वाड्याचे क्षेत्रफळ अंदाजे उत्तरदक्षिण २१६ फूट व पूर्व-पश्चिम १९२ त्यापैकीं दक्षिणेचा भाग १०८ फूट व उत्तरेचा भाग ८४ फूट आहे. मध्यभागी दक्षिणेला अर्ध्या भागात ३ फूट उंचीचे जोते आहे. दक्षिणेला पश्चिमेस पूर्वीचे घरटाक्याचे पाये आहेत. या घरटाक्याचे पाये पूर्वीच्या किल्ल्याच्या आसपास असणाऱ्या घरटाक्यांच्या पायासारखे आढळतात. आज हा वाडा सपाट अवस्थेत आहे. जे आहे ते फक्त जमिनीबरोबर असणारे दगडी पायेच आहेत. हा वाडा १६ व्या शतकातला असावा. या वाड्यामध्ये इ. स. १६४२ मध्ये बाजी पासलकर अटकेत होते. त्याच गावी बाजी पासलकरांचा वाडा आहे. मोसे बु. गावी व 'तव' या ठिकाणी सात भावांसह बाजी रहात असत. कालांतराने भाऊपणा वाढला व तक्षीण्या जन्माला आल्या. त्या वेळी वरसगावचा गोदाजी पासलकर बादशहाला फितुर झाला. "वरसगांव, जांबली व सोनापूर ही तीन गावे मला द्या; मी तुम्हांला मदत करीन" याचा उल्लेख 'राजा शिवछत्रपति भाग १' या पुस्तकात आहे. पुढे बादशहाने बाजीला बंदिवासात मोगलांचे वाड्यांत ठेवले. बाजीची कुलस्वामिनी श्री वागजाई देवी, त्या ठिकाणी प्रसन्न झाली. तो समय पहाटेचा होता. देवी बाजीला म्हणाली, "बाजी, ऊठ ! हात आणि पाय झटक" त्याप्रमाणे बाजीने केले. तोच एका हातातील व एका पायातील अशा दोन्हीही बेड्या तुटल्या. देवी-बरोबर बाजी पश्चिमेस निघाले. मोसेच्या शिवेवरती आपटशेळमध्ये खडकावर देवीच्या घोड्याचा पाय वठलेला आहे. त्याची पूजा आजतागायत भाविक लोक करतात. मौजे पाथरशेत इथे देवी गुप्त झाली. त्या ठिकाणी मंदिर व त्या कालातील शिलालेख आजतागायत आहेत व जुन्या मंदिराचे शिला अवशेष आहेत.

घोडदांडांनी बाजी बांबीच्या पाण्यावर गेले व त्या ठिकाणी तोरण माचीमध्ये पळसे गावच्या यमाजी हळंदे यांचा जनावरांचा वाडा होता. त्या वाड्यात यमाजींची सून होती; ती बाजीचे दाढी-मिशा असलेले विक्राळ रूप पाहून घाबरली. 'घाबरू नकोस ! येमाजीस बोलव.' यमाजी गावात गेला होता. थोड्याच वेळात येमाजी हळंदे आल्यावर बाजीच्या राहिलेल्या दोन्ही बेड्या तोडल्या. नंतर बाजी येमाजीस म्हणाले, आंबेगाव खोऱ्यामधुन तानाजी कडूला बोलावून आण. त्याप्रमाणे तानाजी कडू व त्याचेबरोबर परटीण आपल्या दोन मुलांसह आली. ही दोन मुले पौड खोऱ्यामध्ये आटगाव घुटके, भांबार्डे इथे गेली. सदर परीटाला पाटीलकी दिली. परीट व दिघे यांची पाटीलकी आजतागायत तेथे आहे. हा दिघे दिघी धानुरीचा असावा. पुढे ही मंडळी कोकणात निघाली. वामनखिड रस्त्याने कांगूर-महाल तामीन खिडीने धामनवळगांववर गेले. धामनवळ गांव पुण्याचे पश्चिमेस ५० मैलावर आहे. हे गांव सह्याद्रीच्या माथ्यावर वसले आहे. खडकवासला धरणात येणाऱ्या नदीचा उगम याच गावात झाला. विश्रामगड ऊर्फ कुर्डू किल्ला आहे. हा किल्ला सह्याद्रीचे मध्यभागी तिठ्ठयावर आहे. या किल्ल्याचा आकार आंब्याच्या कोयीसारखा आहे. इ. स. १६४७ मध्ये शिवकालीन बाजी पासलकरांचा जो पोवाडा आहे तो याच ठिकाणी घडला आहे. यमाजी शाहिराने गायला आहे. शाहीर यमाजी बाजीचा आश्रित होता. पोवाडा गायिला म्हणून सव्वा शेराचा लंगर (तोडा) यमाजीला दिला असा उल्लेख आहे. हा पोवाडा मराठ्यांचा पोवाडा भाग १ मध्ये आहे. सदर किल्ला पुणे व कुलाबा जिल्ह्याच्या सरहद्दीवर आहे. येथेंच बाजी काही काळ आश्रयास राहिला.

पोतनिसांची स्वराज्यसेवा

ब. र. पोतनीस

श्री छत्रपती शिवाजी महाराज त्रिशतसांवत्सरिक राज्यारोहण समारंभानिमित्त रायगड किल्ल्यावर व महाराष्ट्रात मोठमोठे कार्यक्रम साजरे होत आहेत.

श्री शिवछत्रपतींचे काळात प्रसिद्ध होऊन गेलेल्या शूर, पराक्रमी व्यक्तींची पूर्वपीठिका सांगणारे कागदपत्र सध्या प्रसिद्ध होत आहेत व त्या छत्रपतींच्या किल्ल्याचे इतिहासाबाबत कागदपत्रे पुढे येत आहेत. त्या दृष्टीने आमचे पोतनिसांच्या पूर्वजांचे रायगड किल्ल्याचे इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान असल्याने त्यातील आमच्या पूर्वजांचा त्रोटक इतिहास येथे सादर करीत आहे.

इ. स. १६६५ मधील पुरंदरचा वेढा निकराने लढविणारे श्री शिवछत्रपतींचे शूर सरदार "मुरारबाजी देशपांडे" व त्यांचे धाकटे बंधु "महादजी बाजी" यांचे घराणे पूर्वीपासून चांगलेच कर्तबगार होतें. त्या व्यक्ती म्हणजे काही धूमकेतूसारख्या राजकीय प्रांगणात अकस्मात उदीत झालेल्या नाहीत.

ह्या घराण्याचा मूळपुरुष कानप्रभू या घराण्याकडे प्रांत मावळचे गावकुळकर्ण व देशकुलकर्ण आदिलशाहीपासून चालत होते व वतने जमीनजुमलाही होता. मुरारबाजीच्या घराण्याची चार आडनावे झालेली आहेत ती अशी :— देशपांडे, नाउफर, खासनवीस व पोतनवीस (पोतनीस). मुरारबाजीस त्रिबक शंकराजी, संभाजी व महादजी बाजी असे चार बंधु होते व ते सर्वजण स्वराज्य-संरक्षणाच्या कार्यात मुरारबाजीबरोबर होते.

मुरारबाजी पुरंदरचा वेढा लढविताना २८ मे सन १६६५ रोजी धारातीर्थी पडला. त्याचे धाकटे बंधु महादजी बाजी हे श्री शिव छत्रपतींचे खासनवीस होते. त्यांची गणना सरदारात व राजमंडलात होती. हे 'महादाजी बाजी' (महादेव बाजी) म्हणजेच आमचे पूर्वज होत. इ. स. १६९३ मध्ये मराठ्यांनी मोगलांकडून "सिंहगड किल्ला" जिंकून घेतला; त्या समयी त्यांचा पुतण्या "विठ्ठल त्रिबक" व महादाजी बाजी–यांनीं "कष्ट-मेहनत-बहुत केली"– कामगिरी उत्तम प्रकारे बजावली; या त्यांच्या कार्यांचा मोठा गौरव होऊन त्या कामगिरीबद्दल तालुके आष्टमी प्रांत नागोठणे चेउलपैकी व मौजे उरवडे ता. मुठे खोरे प्रत्येकी चावर

एक इनाम पूर्वी देण्यात आलेली त्याची माहिती देवून ती चालविण्याविशी पेशजी दिल्हे होते ती शंकराजी नारायेण पंतसचीव यांनी मावळ प्रांताचे सरसुभेदार नरहरी त्रिमल यांना जे आज्ञापत्र (सनद) लिहिले आहे ते शके १६१७ माघ शु।। १५ तारीख ८ फेब्रुवारी सन १६९६ चे मजकडे उपलब्ध आहे. त्याची नक्कल भारत इतिहास सं. मंडळ पुणे यास देऊन त्याचे वाचनही तारीख ९ जाने. सन १९७४ रोजी झालेले आहे. ह्यानंतरही श्री राजाराम महाराज छत्रपती यांनी सन १७०१ मध्ये व ताराबाई राणीसाहेबांचे पुत्र शिवाजी राजे यांनी इ. स. १७०३ मध्ये "महादाजी बाजी हे राज्यातील पुरातन सेवक सेवा एक नीष्ठें करीत आले व करीत आहेत यावरी चालवणे आवश्य म्हणोन मौजे उरवडे ता. मुठे खोरे हा गाव इनाम पुत्रपौत्रादी वंशपरंदरेने चालविण्याविशी आज्ञापत्र दिलेली आहेत." त्याचप्रमाणे महाड प्रांतातील गावे व सातारा प्रांतातील गावे इनाम दिल्याच्या सनदांच्या नकला उपलब्ध आहेत. त्यावरून 'महादजी' बाजी हे महाराष्ट्रात श्री शिवछत्रपतींचे कारकीर्दीत व नंतरही स्वराज्यसंरक्षणाचे कार्यात व त्यांचे सान्निध्यात तरुण वयापासून गुंतलेले असल्याचे दिसून येते. ते राजमंडलावर सभासद होते.

महादाजी बाजी (महादेव बाजी) यांचे निधनानंतर त्यांचे पुत्र यशवंतराव महादेव हे स्वराज्यसंरक्षणाचे कार्यात होते व त्यांचे एकनिष्ठ सेवेप्रीत्यर्थ इ. स. १७१०, इ. स. १७१९, इ. स. १७२५ मध्ये मौजे करंदी व मौजे खरशी तर्फ कुडाळ, प्रांत वाघगड येथील जमिनी इनामे मोकासा व मौजे उरवठे तालुका मुठेखोरे हा गाव पेशजीपासून इनाम असलेले हे स्वामीची सेवा एकनिष्ठेने करतात म्हणून पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने इनाम चालविण्याविशी आज्ञापत्रे उपलब्ध आहेत.

श्री शाहू छत्रपती मोगलांचे छावणीतून आल्यानंतर यशवंतराव पोतनिसांच्या कारस्थानास अनुसरून बाजीराव पेशवे यांनी रायगड किल्ल्यावर भेद करवून रायगड किल्ला हस्तगत केला. श्री शाहू छत्रपतीने रायगड किल्ला त्याखालील प्रदेश लिंगाणामहाडचा कोट, महाड, पांचाड, वाडी इ. महत्त्वाचा प्रदेश-हुजूरचा प्रदेश म्हणून आपणाकडे ठेवला व त्याचे मामलतीचे सर्व कारभार यशवंतराव महादेव यांजकडे सोपविला व त्यांनी स्वारीची पोतनीशीही संभाळली. सन १७३३ पासून ते त्यांचे मृत्यूपर्यंत (सन १७५४) ते रायगड किल्ल्यावरील अधिकारी होते व ते छत्रपतींचे खासनवीस होते; म्हणजे शाहू महाराजांचे अठरा कारखाने व खाजगी कारभार या गोष्टी त्याजकडेस होत्या. त्यास ४० हजारांचा सरंजाम शाहूने दिला. यशवंतराव महादेव ही मोठीच तोलाची आसामी होती.

यशवंतराव महादेव पोतनवीस ह्यांचे पश्चात त्यांचे पुत्र विठ्ठल यशवंतराव हे रायगड किल्ला व त्याचे परिसरातील व त्याखालील प्रदेशावर खासनवीस व पोतनवीस म्हणून मामलतीचे काम श्रीशाहू महाराज यांचे वतीने सन १७५४ ते १७७३ पर्यंत पाहात होते. रायगड किल्ला पेशव्यांनी पोतनिसाशी लढाई करून जिंकून घेतल्यानंतर विठ्ठल यशवंतराव हे शाहूनगर (सातारा) येथे छत्रपतीचे खासनिशी व पोतनीशी पाहात होते. ईस्ट इंडिया कंपनीतर्फे राजा शाहु छत्रपती प्रतापसिंह महाराज यांचे वतीने ता. २७ नोव्हेंबर सन १८१९ रोजी व वेळोवेळी जे करार झाले ते छत्रपतीतर्फे विठ्ठलराव यशवंतराव व भगवंतराव बाजीराव पोतनीस ह्यांचेच मार्फत झालेले असल्याचे इतिहासात प्रसिद्ध आहे.

इ. स. १७७३ मध्यें माधवराव पेशवे ह्यांचेतर्फे आप्पाजी हरी याजबरोबर विठ्ठल यशवंतराव यांचे रायगड किल्ला पेशवे ह्यांच्या ताब्यात देण्याबाबत युद्ध झाले व रायगड किल्ला ता. १८ मार्च १९७३ रोजी आप्पाजी हरीने जिंकून घेतला व तेथे कोटावर पेशव्यांचे निशाण चढविले. पेशव्यांनी छत्रपतींचा भगवा झेंडाच तेथे फडकत ठेवण्याऐवजी आपलेच निशाण लावले. छत्रपतीवरील आपली निष्कलंक निष्ठा व छत्रपतींचा–स्वराज्याचा बाजूस पडलेला भगवा ध्वज रक्षण करण्याची जबाबदारी व कर्तव्य म्हणून विठ्ठल यशवंतराव पोतनीस यांनी छत्रपतींचे मानचिन्ह म्हणून रायगडवरून तो भगवा झेंडा–डंका–नौबतसह, रायनाक महार व तुळशी शेडगा ह्या माहुताकरवी आपले उरवडे गावी ताबडतोब पोचविण्याची व्यवस्था केली. नंतर विठ्ठलराव पोतनीस हे उरवडे गावी आले व तेथे आमचे पोतनिसांच्या कड्यासमोर दगडी चौथरा बांधून छत्रपतीची मानाची दौलत–भगवा झेंडा–ध्वज–आदरपूर्वक उभारला. आमचे उरवडे येथील पोतनिसांच्या वाड्यासमोर अद्याप मानाने भगवा झेंडा फडकत ठेवण्याची पूर्वजांची परंपरा–देवदेवता उत्सव आन्हिकाप्रमाणे चालू ठेवलेली आहे.

विठ्ठलराव यशवंतरावचे नंतर त्यांचे पुत्र यशवंतराव विठ्ठल पोतनीस हे छत्रपती व त्यांचे अज्ञान मुलाचे तर्फे अक्कलकोट संस्थानचा सर्व कारभार पाहात होते व त्यांची ती कामगिरी ब्रिटीश सरकार व सातारचे राजेसाहेब यांना समाधानकारक व प्रशंसनीय वाटली असे कागदपत्र-नकला वगैरे उपलब्ध आहेत.

यशवंतराव विठ्ठल म्हणजे माझे पणजे व माझे आजोबा बाजीराव यशवंतराव व माझे वडील हेही सातारचे शेवटले राजेसाहेब व राणीसाहेब यांचे सान्निध्यात व सेवेत त्यांचे निधनापर्यंत होते.

श्रीशिवछत्रपतींच्या स्वातंत्र्य–सूर्योदयापासून ते त्याचे अस्तापर्यंत आमचे पूर्वजांनी स्वराज्यसेवा जिद्दीने केलेली आहे. ह्या दृष्टीने ह्या त्रिशत-सांवत्सरिक राज्यारोहण शुभप्रसंगी ही माहिती त्रोटक स्वरूपात पुढे ठेवली आहे.

पहिले इंग्रज-मराठे युद्ध : एक पत्र

ग. ल. भिडे

॥ श्री ॥

चेनापटणचे वकिलाचे पत्र

माधवदास यांस त्याची नक्कल.

वडिलांचे सेवेसी बालकाने चरणावर मस्तक ठेवून सा. नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत आषाढ शु ॥ सप्तमी मुकाम चिनापटण जाणोन वडिलाचे आशिर्वादे करून आनंदरुप असो. विशेष इंग्रजांचे वरमामली पूर्वीपासून आपल्यास वाकीफज आहे. एकास नाहक लटका आरोप ठेवून दुसरीयाचे चित्तात संशय आणोन परस्परे विक्षेप पडोन आपले कार्य साधावे ही यांची तऱ्हा आहे. येथे अवाई उठविली आहे की सरकारचे सरदार गाडराचे पारपत्यास गेले होते ते इंग्रजांचे भेदात मिळून त्यास फौजसुद्धा सुरतेकडे जावयास मार्ग दिला. गाडराने आपला वकील सरदाराकडे पाठविला होता त्यास सरदारानी त्याचे सांगितल्याप्रमाणे आंगिकार करून युद्धप्रसंग राहता करून आपण आपलाले स्थानास गेले त्या समागमे सरकारचे लोक आणीक होते त्यास ही गोष्ट मान्य नसता उगेच त्या समागमे गेले. काये करतील उपाय नाही. सरदाराचे अंतःकर्ण इंग्रजाकडे आहे म्हणोन येथील यवन व इंग्रेज बहुत आनंदात आहेत. तो विस्तार पत्री काय लिहावा. नबाब निजाम अलिखाँन हे वर्तमान ऐकून इंग्रजाचे वकिलाशी सख्याचा विचार बोलतात म्हणोन वदंता उठवीली आहे. हे वर्तमान हैदर नाईक याजकडे जाताच त्यावरून हैदर नाईक बहुत खिन्न होऊन म्हणाला जे पहा आम्ही काय तजवीज केली आहे की इंग्रजांचे नाव जम्बुद्वीपात नाहीसे करावे; याजकरता शिरे पगडीबंद एकत्र जाले. आम्ही चिनापटणवाले यास जरब द्यावी व नबाब निजाम अलीखाँन यानी मछलीबंदराकडे जरब द्यावी व नागपूरवाले यांनी बंगाल्यात स्वारी करावी. पंतप्रधान यांनी सूरत व ममईवाले यांचे परिपत्य करावे. आम्हास चहुकडील बंदोबस्त करावयास इतके दिवस लागले. पंतप्रधान यांनी व नबाब निजाम अलीखाँन वगैरे यांनी लेहून दिला असता शिंदे यांनी पत्र लेहून द्यावयास अवमान केला तेव्हाच आम्हास वसवास प्राप्त झाला होता. इतकीयात पुणीयाहून पत्र आले जे शिंदे याचे पत्र मागाहून पाठवून देतो. त्याजवरून आम्ही श्रीरंगपट्टण सोडून आलो. तिकडे नागपूरवाल्यानी लाखो रुपये खर्च करवोन फौजसुद्धा बंगाल्याकडे गेले. नबाब निजाम अलिखाँ सिद्धच आमची वाट पाहतात.

इतकीयात सरदारानी हा डौल केला. तिकडे पुणियावरी आफत येवून ते स्थळ गेले तर कोणीही रहात नाही. म्हणोन आम्ही आपले ठिकाणी समजोन ऱ्हाता. इंग्रेजाकडील वकील द्रव्यसहित आम्हांकडे आले त्याचा नीट गौरव न करता पुरते बिघडोन युद्ध करावयाची एक गोष्ट कायेम धरली त्यास विद्यमानी पुणेवाले यानी आम्हा त्रिवर्गास दगा देवून याप्रमाणे केले बरे पुणेकर व इंग्रेज मिळून आम्हास बुडवीतील हे खरे; परंतु आम्हास बुडविल्यानंतर पुणेवाले यास याचे श्नेहाचा (स्नेहाचा) अणुभव येईल. हे वर्तमान हैदर नाईक यांनी आपले वकील चिनापटणी व्यणाजीपंत आहेत यास लिहिले. त्यास व्यणाजीपंत आम्हासी बोलले जे इंग्रजाकडे वर्तमान आले जे गाडराने शिष्टाईस सरदाराकडे पाठविताच त्यानी कबूल करून पुणीयास लिहिले जे गाडराने शफतपूर्वक सख्याचा विचार सांगोन पाठविला त्याजवरून आम्ही युद्धप्रसंग राहता केला त्यासी सख्याचा विचार करीतो म्हणोन लिहिले. त्यावरून पुणीयाहून सरकारची पत्रे गेली की तुम्ही सरकारचे खैरखा सरदार आहा विहित तेच कराल. तुमचे करणे आम्हास पसंद म्हणोन उत्तर लेहून पाठविले. पुणेवाले यानी आपले कार्य साधून हैदर नाईकास देशांतरास पाठवावयाचे तजवींजीत आहेत. त्यानी असे केल्यास आपली तजवीज करणे प्राप्त आम्हासी इंग्रेजांनी जाबसाल लावीले. तेव्हा आम्ही पंतप्रधानाचे व नवाब निजाम अलीखाँन यांचे जाबसाल मधी घालोन मग आम्ही आपले बोलो ते तुम्हास ठावकेच आहे. बरे तिकडे श्नेह होते वेलैस पगडीवाले याचे आड घालोन एकंदराचे गुंते उरकोन घेतले असते तर उत्तम असते ऐसे म्हणाले. याचे उत्तर आम्ही असे केले की तुम्ही बोलता ते तथ्य नाही. इंग्रेजांची रीतच की येकाच वाईट येकासी बोलून परस्परे संशये आणावे. तुम्हासी येकांती बोलतात की तुम्ही व आम्ही एकत्र होवोन श्रीमंताशी बिघाड करू व आम्हासी पैंगाम करीतात की तुम्ही व आम्ही येकत्र होऊन हैदर नाईकाचे पारपत्य करू. हा अनुभव तुम्हांस आहेच. अैसे असोन तुम्ही यांच्या गोष्टींना इतबार धरिता हे अपूर्व असे. शिंदे व होळकर सरकारचे इतबारी मातबर सरदार त्यांजपासून येसे कैसे घडेल. सांप्रत तुमचे येकण्यात येईल की इंग्रेजाचे पारपत्य यथास्थित जाले हे गोष्टीची खातरदस्त असू द्यावी. आपले करारावर कायम राहून शत्रूचे पारपत्य सत्वर होणे याप्रमाणे तुम्ही आपले यजमानास ल्याहावे या अन्वये आम्ही त्यासी बहुता प्रकारे बोललो. ईकडील वर्तमान तर हैदर नाईकाकडील फौजा यांच्या प्रांतात येऊन धामधुम करून प्रांत लुटतात व जालीतात व यकदोन ठाणीही घेतली. यामुळे चिनापटणात बहुत गडबड जाली आहे ती लिहिता पुरवत नाही. यथे जनरलात व कुम्सलवाल्यात चीतसुद नाही. कुम्सलवाले समग्र येकत्र होऊन जनरलास कैद करून दुसरी कुरसीचे सरदारास अधिकार द्यावा या मनसुब्यात आहेत. नबाब महमद अलीखान ही या तजवीजीत आहेत. पहिलेही अैसेच

कुम्सलवाल्यांनी जनरलास कैद करून ठिकाणी लाविले होते. सांप्रत थोडक्याच दिवसात घडेल ते लिहिले. इंग्रेज या घरकृत्यातच लागले असत. परचक्र आले आहे. त्याची तजवीज करावी ते काही नाही. नबाब महमद अलीखान आपला प्रांत हैदर नाईक खराब करीत असता इंग्रेज बचावाची तजवीज करीत नाहीत म्हणोन बहुत अजुर्दा आहेत. याचे समाधानास्तव इंग्रेज बोलतात की फौज जमा करतो येते म्हणतात परंतु आपले बचावाचे धावतीत लागले आहेत.

दादासाहेब याजकडील वकील जहाजावर बसोन आला, त्याने असमखानाची भेट घेऊन दोन मशरु नजर केले. ते समई आम्हीही कारवारी होतो. खानानी वर्तमान पुसले की दादासाहेब यास खर्चास काय देतात. त्यानी उत्तर केले की कुपणीवाले–दरमहा रुपये तीस हजार देतात. यानी पुसले की स्वार किती आहेत तीन साडेतीन हजार आहेत. बाहेर अफवा की पंधरा आहेत. म्हणून बोला. खान म्हणाले की ही गोष्ट खरी. भारी स्वार असते तर घेराघेरीत रसदेवीला का करते त्यास दादासाहेब याजकडील वकील म्हणाला की ईश्वरदयेने चार महिने जाऊ द्या. किती स्वार पाहिजे तितके मिळतील. ईतकीयात सरदारही अनुकुल कितीक होतील गाडराचा इरादा आहे की धरली गोष्ट शेवटास न्यावी. दादासाहेब यास पुणीयास स्थापावे याची व त्याची प्रथम भेट झाली त्याजवरी जो मजकुर नबाबाची व इंग्रेजाची भेट होऊन होईल तो लिहिणे.

चंदावरचे राजे यास इंग्रेजाचे बादशानी विलायतीहून पत्रे व वस्त्रे व जवाहीर वगैरे पाठविली. ती पत्रे घेऊन येथील दुसरा कपितान व चंदासरचे वकीलाचा पूत्र यैसे उभयता मिळून घेऊन चंदावरास गेले पत्री लिहिले आहे जे तुम्ही कुंपणीचे कामात दुरुस्त राहून राज्य सुखरूप भोगित असावे म्हणोन लिहिले. या गोष्टीने नबाब महंमद अलीखां आपले जागा आजुर्दा आहेत.

विलायतीस इंग्रेजांनी वलंदेजाची जहाजे फरासीसाकडे दारुगोली घेऊन सौदागिरीची जात होती ती धरली त्यास झाडा द्या म्हणतात. ते म्हणतात जे आम्हास हुकूम नाही. आम्ही जहाजे माघारी घेतो. त्यास इंग्रेज लोक म्हणतात जे तुमचा माल आम्ही विकत घेतो ते देऊ म्हणतात येसे वर्तमान येकतो. एक जहाज इंग्रजी विलायतीहून चीनापट्टणास आले. त्यात तीनशे सोलदार उतरलेत असेल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

卐 卐

उपर्युक्त पत्र रा. ब. द. ब. पारसनीस यांच्या सातारा येथील खाजगी वस्तुसंग्रहालयातील असून अप्रसिद्ध आहे. पत्राचा लेखक अज्ञात आहे. तथापि 'पटवर्धनाकडील कागदपत्रे' या नावाने असलेल्या रुमालात हे पत्र मिळालेले असल्यामुळे

बहुदा ते पुणे येथील पटवर्धनांच्या वकिलाने नकलून पाठविलेले असावे किंवा आलेल्या पत्राची ही नक्कल करून ठेवण्यात आलेली असावी असा अंदाज आहे. पत्रलेखकाने कोठेही कालाचा पूर्णपणे निर्देश केलेला नाही. तथापि आषाढ शु. ॥ ७ ही पत्राची तिथी दिलेली आहे. हे पत्र पहिले इंग्रज–मराठा युद्ध किंवा १७७९ ते १७८२ ह्या काळात इंग्रजाविरुद्ध एतद्देशीय सत्ताधिशांनी केलेल्या एकजुटीवर नवीन प्रकाश टाकण्यास फारसे उपयुक्त नसले, तरी इंग्रजांच्या भारतातील राजकारणाची एतद्देशीय सत्ताधीशांना असलेली जाणीव, युद्धकाळात पसरलेल्या किंवा पसरविल्या गेलेल्या बातम्यांचे निरनिराळ्या सत्ताधीशांवर होणारे परिणाम व इंग्रजाविरुद्ध करण्यात आलेल्या या एकजुटीचे अस्तित्व टिकविण्यासाठी परराज्यातील वकिलांनी केलेले प्रयत्न, इत्यादीसंबंधाने माहिती देण्यास उपयुक्त आहे.

पत्राच्या अंतर्गत पुराव्यावरून पाहता सुरवातीला गॉडर्ड ब्ऱ्हाणपूरहून सुरत यथे आल्याची (२६ मे १७५९) माहिती दिलेली असली तरी, हे पत्र १७७९ मधील नाही. कारण पत्रातील इतर सर्व उल्लेख १७८० मधील आहेत. आषाढ शु॥ ७ ही तिथी मोडक जंत्रीबरोबर ताडून पाहता ८ जुलै १७८० ही या पत्राची तारीख असावी.

पत्राची सत्यता व तिथीची निश्चितता ठरविण्याच्या दृष्टीने पत्रातील काही घटनांचा परामर्ष घेणे आवश्यक आहे. वडगावचा तह हा इंग्रजांना नामुष्कीचा तह वाटत होता; त्यामुळे हा तह अमान्य करण्यासाठी उपयुक्त अशा संधीची इंग्रज वाटच पहात होते. गॉडर्ड सुरतेला आल्यानंतर २८–९–५७७९ ला हेस्टिंग्जने पेशव्यांना "आपल्याशी कायम स्नेह जोडण्याची आमची इच्छा आहे. गॉडर्ड याजकडे पूर्ण अधिकार देऊन तह ठरविण्याचे काम सोपविलेले आहे. हे गृहस्थ ज्या अटी सुचवितील त्यापासून उभयतासही फायदाच होईल" असे कळविलेले आहे. जून ते ऑक्टोबरपर्यंतच्या काळात गॉडर्ड, नाना व महादजी यांच्यांत तहाच्या वाटाघाटी चाललेल्या होत्या. तथापि याच सुमारास वडगावच्या तहानुसार इंग्रजांकडून पेशव्यांच्या ताब्यात आलेले रघुनाथराव महेश्वरासमोर नर्मदातीरावरून हरिबाबाजीला पराभूत करून सुरतेला गॉडर्डकडे पळून गेल्याने व गॉडर्डने त्यांना आश्रय दिल्याने तहाच्या वाटाघाटीस निराळेच वळण लागले. या वेळी सुरत येथे गॉडर्डशी वाटाघाटी करण्यासाठी पाठविलेल्या लक्ष्मण गोविंद चिटणीस नावाच्या आपल्या वकीलास नानाने, दादा व साष्टी हवाली केल्याशिवाय आमच्याशी सलूख करण्याची गोष्ट बिलकूल बोलू नका, असे इंग्रजास कळविण्यास सांगितले. (ए. टि. ६–४३ व इ. न. वि. वि. खंड ५ पृ. ३२९) मराठा व इंग्रज यांच्यातील तहाच्या वाटाघाटी फिसकटत जाऊन त्यातून इंग्रजाविरुद्ध भारतातील सत्ताधिशांनी एकच उठाव करण्याच्या योजनची सुरवात झाली.

निजामाचा बंधु बसालतजंग याने हैदरच्या आक्रमणाविरुद्ध मद्रासचा गव्हर्नर रंबोल्ड यांच्याकडून संरक्षणार्थ फौज मागविली व त्याबद्दल गुंटूरचा प्रदेश इंग्रजांच्या खर्चास लावून दिला. गुंटूरचा प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात असणे म्हणजे निजामाने स्वतःच शत्रू अंगावर ओढून घेण्यासारखे होते. त्यामुळे निजामाने इंग्रजाविरुद्ध एतद्देशीय सत्ताधिशांनी एकदम युद्ध करण्याची योजना मांडिली.

भारतातील फ्रेंचांच्या हालचालीवर बंधन घालण्यासाठी पश्चिम किनाऱ्यावरील माहे बंदर इंग्रजांनी १९-३-७९ च्या सुमारास ताब्यात घेतले. हे बंदर हैदरच्या ताब्यात असून तेथूनच त्याला फ्रेंचांची मदत मिळत असे. मदत बंद पडल्यामुळे हैदराने इंग्रजाविरुद्ध शस्त्र उगारले. नाना व महादजी इंग्रजाबरोबर युद्ध करावे लागणार हे जाणूनच होते. अशा परिस्थितीत नानाने हैदरबरोबरील संघर्षाची कारणे बाजूला ठेवून इंग्रजांचा भारतात सर्वत्र पराभव करण्याची एकजुटीच्या राजकारणाची योजना मांडली. परस्परांचे वकील एकमेकांकडे जाऊन फेब्रुवारी ते जून १७७९ या काळात निरनिराळ्या प्रकारे चर्चा होऊन तह पक्का करण्यात आला.

या तहानुसार "हैदरने चिनापट्टणवाले (इंग्रज) यांस जरब द्यावी, नबाब निजाम अलीखान याने मच्छलीबंदराकडे जरब द्यावी, नागपूरवाले यांनी बंगाल्यात स्वारी करावी व पंतप्रधान यांनी सूरत व ममईवाले यांचे पारिपत्य करावे" असे ठरविण्यात आले असा उल्लेख या पत्रातहीं आहे. त्याचप्रमाणे दिवाकरपंत भोसल्यांकडे जाताच ऑक्टोबर १७८० मध्ये भोसले स्वारीसाठी निघाले. हैदर तर १३ जून १७८० लाच श्रीरंगपट्टण सोडून इंग्रजांविरुद्ध स्वारीसाठी निघालेला होता. नोव्हेंबर १७७९ मध्ये गॉडर्ड सुरतेहून मुंबईला गेला व कॉन्सिलशी चर्चा करून त्याने पुढील कार्यक्रम ठरविला. त्याप्रमाणे मुंबईची फौज सुरतेच्या मदतीस आली. १७८० च्या प्रारंभी युद्धाची तयारी करून गॉडर्डने डभईवर चाल केली व ते ठाणे दोन दिवसात ताब्यात घेतले. फत्तेसिगराव गायकवाड यास अनुकूल करून घेऊन गॉडर्डने त्याच्याबरोबर गुजरातच्या वाटणीचा तह ठरविला. अहमदाबादवर चाल करून, गॉडर्डने गुजरातची ही राजधानी ताब्यात घेतल्यामुळे या प्रदेशाचे संरक्षण करण्यासाठी व इंग्रजांशी युद्ध करण्यासाठी महादजी शिंदे व तुकोजी होळकर २५ हजार सैन्य बरोबर घेऊन निघाले. मे १७८० पर्यंत मराठे व इंग्रज यांच्यात चकमकी चाललेल्या होत्या. महादजी शिंदे यांच्या गनिमी काव्याच्या लढाईमुळे या युद्धापासून इंग्रजांना फारसा फायदा होऊ शकला नाही. जूनमध्ये पावसाळ्यामुळे युद्ध बंद पडले.

हैदर जून १७८२ मध्ये सत्तर हजार जय्यत फौज व १०० तोफा घेऊन श्रीरंगपट्टणहून निघाला तो थेट अर्काटवर चालून आला. अर्काटच्या उत्तरेकडील पोलूर अरणी, कळसीपाक, मेल्याडी, धोबीगड इ. किल्ले त्याने ताब्यात घेतले व

मद्रासपासून दहा मैलांवर येऊन तो थडकला. हैदरच्या या पराक्रमामुळे चिनापट्टण येथे गडबड उडाल्याची माहिती या पत्रात आहे. मद्रासचा प्रसिद्धीस आलेला हेक्टर मलो या वेळी अयशस्वी ठरला. कर्नल बेलीच्या हाताखाली गुंटूर प्रांत घेण्यासाठी गेलेल्या सैन्याला या वेळी मद्रासला त्वरित परत बोलविण्यात आले. सामान्यतः जून १७८० पर्यंत हैदर व मराठे यांनी इंग्रजांविरुद्ध हालचालींना सुरुवात केली होती. तर निजाम व भोसले त्या तयारीत होते असे दिसते.

उपर्युक्त परिस्थिती असतानाच उत्तरेकडील हालचालींची बातमी दक्षिणेत हैदरकडे किती विपरीत प्रकारे जात होती किंवा विपरीत करून पाठविण्याचा युद्धात प्रयत्न केला जात असावा असे या पत्रावरून दिसते. हा तह घडत असतानाच या सत्ताधीशांची मने एकमेकाबद्दल साशंक होती. हैदरने महादजी-कडून करार पुरा पाडल्याबद्दल स्वदस्तुरीचे हमीपत्र लिहून मागितले होते. महादजीने ते देण्यास विलंब लावला म्हणून हैदरखानाने निरनिराळ्या शंकाकुशंका काढलेल्या होत्या. महादजीने करारपत्र लिहून देताना हैदरच्या धरसोडीच्या धोरणाबद्दल आपले मत दिले आहे (खा ४–१०).

त्यामुळेच हे चौकडीचे राजकारण म्हणजे सत्ताधीशांची बांधण्यात आलेली मोट होती (खरे २५१० खंड १०-२३५, २३६ का. सं. प. था. ४२३, २४१). नाना व महादजीच्या कौशल्यामुळे ती तयार करण्यात आलेली होती. त्यामुळे गुजरातमधून मराठे तह करून स्वगृही परत गेले ही बातमी समजताच हैदर चलबिचल झाला. "आम्हाकडे द्रव्यासहीत इंग्रजांचे वकील आलेले असताना आम्ही त्यांना परत लावून इंग्रजीचा नाश करण्याचा निश्चय पक्का ठेवला. असे असताना पेशव्यांनी इंग्रजांशी स्वतंत्र तह करून आम्हास बुडविण्याचे धोरण आखले आहे. तथापि आम्हास बुडविल्यानंतर इंग्रजांच्या स्नेहाचा पेशव्यांना अनुभव येईल" असे विचार हैदरने वकीलाजवळ व्यक्त केले आहेत.

प्रत्यक्षात मराठे व इंग्रज यांच्यात कोणताही तह झालेला नव्हता. उलट पावसाळ्यामुळे हालचाली बंद पडल्या होत्या. तथापि ही एकजूट फोडण्यासाठी कशा बातम्या पसरविल्या जात होत्या व त्यामुळे परस्परांच्या मनात कशा प्रकारे साशंकता निर्माण होत होती हे या पत्रावरून स्पष्टपणे दिसते.

भारतातील चार प्रमुख सत्ताधीशांची एकजूट हे इंग्रजांच्या दृष्टीने सर्वात मोठे संकट होते. भारतात इंग्रजांची सत्ता राहते किंवा नाही अशी साशंकता या वेळी निर्माण झालेली होती. हैदरखानाच्या स्वारीमुळे तर मद्रासचा जनरल व कॉन्सिल यांच्यात वितुष्ट निर्माण झाल्याची माहिती या पत्रात आलेली आहे. त्यामुळे इंग्रज भारतातील ज्या सत्ताधीशांबरोबर मैत्रीचे संबंध आहेत ते जास्तीत जास्त दृढ करण्याचे प्रयत्न करीत होते. उदा. या पत्रात तंजावरचे तुळाजी राजे

यांना आपण व्यवस्थित राज्य उपभोगित असावे या अर्थाचे पत्र आल्याची माहिती दिलेली आहे. याशिवाय या एकजुटीतील सत्ताधिशांना फोडण्यासाठी निरनिराळे प्रयत्न इंग्रज करीत होते. अयोग्य बातम्या पसरवून परस्परांच्या मनात गैरसमज निर्माण करणे व त्याचा फायदा उठविणे हे त्यांचे धोरण असल्याची माहिती या पत्रात आहे. अर्थात या त्यांच्या प्रयत्नांना शेवटी यशही आलेली दिसते. तथापि त्यांच्या या धोरणाची सत्ताधीशांना जाणीव होती असे पत्रातील वकीलाच्या उद्‌गारावरून दिसून येते.

मराठे गुजरातेतून परत आले याचा विपरीत अर्थ केला जाईल याची नानाला कल्पना असलेली दिसते. महादजी शिंदे यास १३-७-१७८० ला पाठविलेल्या पत्रात नाना लिहितात, "सर्वत्र जाहिराणा जाला की सरदार मसलत सोडून घरास गेले. पाटीलबाबा इंग्रजाशी गाठ घालून पारिपत्य करीपर्यंत बाहेर सर्वास विलगपणाची बोलणी बोलावयास कारणे जाली, यास्तव इंग्रजांच्या आवर मातबर सरदार मसलत योजून हैदरखान व भोसले यास दुहेरी पत्रे पाटीलबावानी पाठवावी की, इंग्रज जरबेत आल्यामुळे सुरतेस छावणीस निघोन गेले. पुढे भारी फौजेस त्या प्रांती रहावयास अडचण यास्तव आम्ही इकडे छावणीस आलो. सर्व तयारी जारी आहे, बरसात होताच इंग्रजांचे पारपत्यास जाणे होईल. छावणीस राहिलो हेही इंग्रजांचे तोंडावरच आहे व पल्लाही नजीक आहे. जलदीने जाऊन पोहचू. करार ठरल्याप्रमाणे ज्याने त्याने आपआपले तर्फेने इंग्रजांचे पारिपत्य करावे. येणेप्रमाणे पत्रे जरूर पाठवावी म्हणजे खातरजमा पटेल आणि मसलत सोडणार नाहीत. पत्र न गेल्यास त्यास वाटेल की, सिंदेहोळकरांनी मसलत सोडिली. आजपावेतो खटपट करता करता हैदरखान चालून गेले व भोसलेही बंगाल्यानजिक गेले. निजामाने आपले चिरंजीव बाहेर काढले आहेत. असा मनसबा तोंडास असता उज्जयनीचे छावणीचे वर्तमान कळल्यावर सर्वास संदेह पडेल यास्तव पत्रे पाठवावी. म्हणजे दसरा होताच मनसुबा रंगात येईल" (का. सं. प. या. ३२१, ३२५)

तथापि अशा प्रकारची पत्रे जाण्याअगोदरच इंग्रजाकडून कशा प्रकारे बातम्या पसरविल्या गेल्या, पेशवे-इंग्रज यांच्यात तह झाला असे समजताच हैदरखानाच्या निश्चयात कशी चलबिचल झाली याचे वर्णन पत्रात आले. असे असले तरी नाना फडणवीसाच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले वकील या वेळी परदरबारात किती उत्कृष्ट कार्य बजावीत हेही या पत्रातून दिसते. हैदरच्या दरबारात असलेल्या कृष्णाजी नारायण नावाच्या वकीलाने हैदरखानाची पूर्णपणे समजूत घालून त्याच्या मनातील गैरसमज दूर केलेले दिसतात व पुढील काळात हैदरखान मराठ्यां-बरोबरच इंग्रजाविरुद्ध युद्ध करीत असताना दिसून येतो.

' मराठी ' राजा कोणास म्हणावे ?

म. श्री. माटे

काही वर्षांपूर्वी सम्राट हर्ष, पुलुकेशी, छत्रपति शिवाजीमहाराज यांच्या संदर्भात लिहिताना सुप्रसिद्ध इतिहासकार रमेशचंद्र यांनी एक विधान केले आहे. 'स्वाभिमानी मराठ्यांनी (महाराष्ट्रीयांनी) पुलुकेशीच्या नेतृत्वाखाली उत्तरेकडून आक्रमण करणाऱ्या हर्षवर्धनाला परतविले आणि त्यानंतर जवळजवळ सहस्र वर्षांनंतर त्यांच्यापैकीच एका नेत्याने पुन्हा तोच पराक्रम केला '[1] असा त्यांच्या विधानाचा मतितार्थ, बदामी-ऐहोळे या कर्नाटकाच्या भागात भरभराटीला आलेल्या चालुक्यवंशीय पुलुकेशीला मराठी ठरवून दत्त मोकळे झाले आहेत. नुकतेच ' दि सेऊणज ' हे प्रा. श्रीनिवास रित्ती[2] यांचे यादवांच्या इतिहासासंबंधी पुस्तक वाचनात आले. त्यांच्या सर्व प्रतिपादनाचे सूत्र असे आहे की देवगिरीचे यादव हे वस्तुतः कन्नड असून कर्नाटकाचेच होत, अशासारखी इतर अनेक उदाहरणे गोळा करता येतील. तथापि या सर्वांत उल्लेखनीय कोणते असेल तर ते ' महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर्स. ' महाराष्ट्र हे स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वात आल्यानंतर थोड्याच काळात ही गॅझेटिअर्स तयार करण्यात आली. यांपैकी पहिले दोन खंड महाराष्ट्राच्या इतिहासाविषयी असून त्यातला पहिला प्राचीन कालखंडाविषयी आहे.[3] आदिमानवापासून प्रारंभ करून इ. स. १३०० पर्यंत हे सर्व निवेदन यात आणलेले आहे. आदिमानव, ताम्रपाषाणयुग, सातवाहन कुल, वाकाटक घराणे, बदामीचे चालुक्य, मालखेडचे राष्ट्रकूट, कोल्हापूरचे शिलाहार, शेवटी देवगिरीचे यादव या सर्वांची हकीकत यात आहे. विशेष म्हणजे वर उल्लेखिलेल्या सर्व घराण्यांचा ' कुल–विषयक ' (dynastic) इतिहास अत्यंत तपशिलाने समाविष्ट करण्यात आलेला आहे. वस्तुतः चालुक्यांचे आणि बऱ्याच अंशी राष्ट्रकूटांचे घराणे ही कर्नाटकाची राजकुले; मग त्यांचा कुलविषयक इतिहास महाराष्ट्राच्या इतिहासाचा भाग कसा होईल असा प्रश्न उपस्थित होतो. दत्त, रित्ती किंवा गॅझेटिअर्सचे संयोजक हे सर्वजण एकच प्रमाद करीत आहेत. त्याची कारणे वेगवेगळी असू शकतील. दत्त यांनी घटनांचे over simplification केले असेल, ह्यूएनत्संग यांचे पुलुकेशी हा महाराष्ट्राचा राजा होता हे विधान शब्दशः ग्राह्य मानले असेल. रित्ती यांनी सध्या जोरात असलेल्या भाषिक संघर्षाला नकळत प्रतिसाद दिला असेल, तर गॅझेटिअर्सच्या संयोजकांनी ' बॉम्बे गॅझेटिअर्स ' आणि ' महाराष्ट्र गॅझेटिअर्स ' यातील मूलभूत भेद

ध्यानात घेतला नसेल. सर्वांचा परिणाम अंती एकच होतो व तो म्हणजे विकृत इतिहास. हे टाळण्यासाठी काही कल्पना पुन्हा एकदा सुस्पष्ट करणें आवश्यक झाले आहे.

हे करण्यापूर्वी गॅझेटिअर्सच्या बाबतीत विकृतीची प्रक्रिया कशी झाली हें सांगावयास पाहिजे. १८८६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या मुंबई इलाख्याच्या गॅझेटिअर्स-मध्ये वर निर्देशिलेल्या राजघराण्यांचा इतिहास देण्यात आलेला होता. [४]भांडारकर यांनी लिहिलेल्या 'अर्ली हिस्टरी ऑफ दि डेक्कन' या ग्रंथाचा आराखडा तोच होता. वा. कृ. भावे [५] यांनी 'मुसलमानपूर्व महाराष्ट्र' या आपल्या ग्रंथात या सर्व राजकुलांचा इतिहास दिला आहे. यझदानी[६] यांच्या दख्खनच्या द्विखंडात्मक इतिहासाचा वर्ण्यविषय हाच आहे. मुंबई इलाख्याच्या गॅझेटिअर्समधे हा सर्व भाग यावा हे स्वाभाविकच होते; कारण त्या इलाख्यात महाराष्ट्राच्या जोडीला कर्नाटकाचा अन्तर्भाव होता. भांडारकर आणि यझदानी हेही आणखी एका विस्तृत प्रदेशाचा–दख्खनचा इतिहास रचित होते. त्यांचा आवाका मोठा होता. आजच्या संपूर्ण महाराष्ट्राच्या जोडीला कर्नाटक आणि क्वचित आंध्रप्रदेशाचा वायव्य भाग या सगळ्यांची बांधलेली ती मोट होती. 'दख्खन' हा शब्द मुसलमानी बखर-कारांनी प्रथम रूढ केला आणि त्यांनी तो तापी–नर्मदा यांच्या दक्षिणेकडचा, तुंग-भद्रेच्या उत्तरेकडचा आणि बहुशः पूर्वघाट वगळलेल्या प्रदेशासाठी वापरला. परंतु तो प्रामुख्याने व्यवच्छेदक होता–समावेशक नव्हे. उत्तरेकडील सुलतानांचा अंमल माळव्यापर्यंत पोहचत असे; त्याची दक्षिण सीमा म्हणजे नर्मदा नदी. तिच्या पलीकडचा, दक्षिणेचा जो प्रदेश तो दख्खन. या दख्खनमधे अमुक एक विशिष्ट भाग असलेच पाहिजेत असा त्यांचा आग्रह नव्हता आणि त्यामुळे अगदी अलिकडच्या इतिहासकारांनासुद्धा दख्खन म्हणजे काय याची व्याख्या करणे शक्य झालेले नाही. अशा एका काल्पनिक भूखंडाच्या इतिहासात भांडारकर किंवा यझदानी यांनी महाराष्ट्र–कर्नाटक यांना एकत्र गुंफून दिले तरी त्यांना फारसा दोष देता येत नाही. पण ज्यांनी महाराष्ट्राचा इतिहास लिहावयास घेतला आहे त्यांनी आपल्या कल्पना यापेक्षा अधिक सुस्पष्ट ठेवणे अगत्याचे आहे. एक सोईचा आराखडा हाताशी आहे त्यावर विसंबून ऐतिहासिक घटनांच्या कार्यकारणाविषयी त्यांनी बेसावध रहावे हे आश्चर्याचे वाटते. महाराष्ट्राचेच प्रत्यक्ष उदाहरण घेऊन या गैरसमजाचे निराकरण करता येईल. दत्त, रित्ती यांचा वैचारिक गोंधळ नाहीसा करता येईल–निदान समजावून घेता येईल !

एका प्रश्नाचे उत्तर शोधावयास हवे. 'मराठी राजा कोणास म्हणावे ?' कोणत्या राजघराण्याला 'महाराष्ट्रीय' समजावे ? या प्रश्नाला साधारणपणे तीन

उत्तरे सुचतात. जो जो राजा महाराष्ट्रात जन्मला, किंवा जो जो राजवंश मराठी प्रदेशात झाला – ज्याची मातृभाषा मराठी आहे, तो तो 'मराठी राजा.' मग त्याचे राज्य कोठे का असेना. शिंदे–होळकर हे या प्रकारात येतील, बडोद्याचे गायकवाड येतात, त्यांच्याहि पूर्वी राष्ट्रकूट येतात. दुसरे उत्तर असे की ज्या ज्या राजपुरुषाने, राजघराण्याने, महाराष्ट्रावर राज्य केले तो तो मराठी राजा. त्याचे घराणे, त्याची राजधानी, त्याचे मुख्य राज्य कोठे का असेना, महाराष्ट्राच्या मोठ्या भागावर जर त्याची सत्ता असेल तर तो 'मराठी.' चालुक्यांच्या जोडीला यात मुगल बादशहा इतकेच काय पण इंग्लंडचे राजघराणेहि बसविता येईल ! तिसरे उत्तर असे की ज्या राजाचे राज्य महाराष्ट्र भूमीत उत्पन्न झाले, त्या आधारावरच वृद्धिगत झाले तो मराठी राजा. त्याचे मूळ घराणे कोठूनहि आले असले, त्याची मातृभाषा कोणतीहि असली तरी चालेल. सातवाहन राजे आंध्रातून आले असे काही संशोधक समजतात, तसेच यादव हेहि कर्नाटकातून आले असे एक मत आहे; पण या दोन्ही वंशांचे राज्य महाराष्ट्रात उत्पन्न झाले, वाढले. येथे अर्थातच 'महाराष्ट्र' म्हणजे कोणता प्रदेश असा प्रश्न विचारता येईल; त्याचेच सविस्तर उत्तर या निबंधातून द्यावयाचे असल्याने आत्ता फक्त वरील तीन पर्यायांची ग्राह्याग्राह्यता पहावयाची आहे. पहिला सहज बाजूस सारता यतो. त्या घराण्यांचा किंवा राजांच्या राजकीय कर्तबगारीचा महाराष्ट्र भूमीशी साक्षात संबंध नाही ते केवळ मराठी आईबापांच्या पोटी जन्मले यासाठी मराठी–महाराष्ट्राचे राजे होऊ शकत नाहीत. दुसरा पर्याय वर सांगितल्याप्रमाणे बरीच मान्यता पावलेला व काहीसा गुंतागुंतीचा आहे, किंबहुना त्याला मान्यता देऊन आजपर्यंतच्या बऱ्याच इतिहासकारांनी तो तसा केला आहे. जी घराणी दुसरीकडे उत्पन्न झाली, ज्यांची राजधानी, राजसत्तेचे केंद्रस्थान दुसरीकडे होते, पण जे महाराष्ट्रावर राज्य करीत होते ते मराठी राजे या पदवीस पात्र नाहीत. त्यांच्या साम्राज्यात इतर अनेक प्रांताबरोबर महाराष्ट्राचाहि समावेश झालेला होता इतकेच. चालुक्य, बऱ्याच अंशी राष्ट्रकूट, कल्याणी चालुक्य, मुगल सम्राट हे सर्व महाराष्ट्रावर राज्य करणारे राजे होते हे निर्विवाद; पण ते मराठी, महाराष्ट्राने उत्पन्न केलेले राजे नव्हते; त्यांच्या राज्यांचा, साम्राज्यांचा मूलाधार इतरत्र होता. एकाच वेळी दोन आधार–क्षेत्रांच्या (nuclear areas) साहाय्याने बलाढ्य झालेल्या राष्ट्रकूटांमुळे या पर्यायाचा निकाल करणे गुंतागुंतीचे झाले आहे, परंतु इतर राजघराण्यांचा बाबतीत गल्लत करावयास थोडीही जागा नाही. तिसरा पर्याय सातवाहन, वाकाटक, यादव या घराण्यांच्या रूपाने उभा असलेला. यांची सत्ता जोपासली महाराष्ट्र भूमीने. म्हणजे कोणत्या भूमीने ? आज जेथे जेथे मराठी भाषिक आहेत त्या मुलखाने की आज 'महाराष्ट्र राज्य' नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशाने ? या प्रश्नाचे उत्तर फक्त आर्थिक-भूगोलाचा

आधार घेऊनच देता येईल. महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाचा पाया कोणता याची कल्पना हवी. ज्या प्रदेशाचा त्यात समावेश नसेल तर महाराष्ट्र हे ' महा 'च काय पण ' राष्ट्र ' हि होऊ शकणार नाही असे भाग कोणते याची कल्पना हवी. मराठी इतिहासकारात कै. प्रा. शेजवलकर यांनी या अंगाची जाणीव दाखविलेली होती. इतरांच्या लिखाणात ती क्वचितच दिसते. महाराष्ट्राच्या भूगोलाचे नेहमीच्या परिपाठातील ढोबळ भाग म्हणजे कोकणपट्टी, सह्याद्री, देश, विदर्भ हे होत. सह्याद्रीने छत्रपतींच्या राज्यस्थापनेस आणि पुढे राज्यरक्षणास मोलाचे सहाय्य केले असले तरी तो राज्याचे पोषण करण्यास असमर्थच होता. कोकणपट्टीचा बराच भाग महाराजांच्या ताब्यात असला तरी तिचाहि उपयोग यादृष्टीने शून्यच होता. त्यामुळे जे जे नवे करावयाचे त्या प्रत्येकासाठी शत्रूच्या संपन्न प्रदेशातून संपत्ती हिरावून आणणे त्यांना भाग पडले–मग तो उत्तरेचा गुजरात असो वा दक्षिणेचा कर्नाटक असो. हिंदवी स्वराज्याचा डोलारा ज्यावर उभा राहू शकेल असा भक्कम आर्थिक आधार ' स्वराज्य–काळा 'त मराठी सत्तेला लाभला नाही. ' साम्राज्य–काळा 'त लाभला; पण तो निजाम आणि नागपूरकर भोसले यांच्यात विभागून, त्याच्या सामर्थ्याचा पुरेसा उपयोग करताच येऊ नये अशा अवस्थेत. हा आधार म्हणजे जलप्रवाहांनी समृद्ध केलेले प्रदेश. औद्योगिक क्रान्तीच्या पूर्वी संपत्तीच्या निर्मितीचे प्रमुख साधन शेतकी हे होते. बरीच शेती पावसाखाली असली तरी वर्षभर वहात रहाणाऱ्या जलप्रवाहांची, नद्यांची उपयुक्तता काकणभर सरसच होती. सर्वात उत्तरेला असा प्रदेश म्हणजे तापी–नर्मदा यांचा. या नद्यांचा थोडासा उपयोग होऊ लागतो तेव्हा त्या खानदेश–माळवा यांच्यात पाठशिवणीचा खळ करू लागतात व जेव्हा त्या खरोखरीच्या फलदायी ठरावयाच्या त्या वेळी गुजरातेतच जातात; त्यामुळे स्वतंत्र राजसत्ता पोसण्याची ताकत एकटचा खानदेशात कधीच नव्हती–खानदेश व माळवा मिळून राज्य होई. मुसलमानपूर्व काळातील ' परमार ' वंशीयांचे किंवा मुसलमानी काळातील फरूकींचे राज्य या प्रकारचे. अन्य शब्दात, ही राज्ये म्हजजे तापी–नर्मदा यांची अपत्ये. थोडे पूर्वेकडे सरकले कीं वर्धा–वैनगंगा–पैनगंगा यांचा मुलूख, विदर्भ. वाकाटक हे या भागातले सर्वात प्रसिद्ध घराणे असले तरी एकमेव नव्हे–अठराव्या शतकात भोसले कुलाच्या एका शाखेने येथे तितक्याच वैभवशाली राज्याची स्थापना केली होती. याच्या दक्षिणेचा भाग सध्याच्या चर्चेच्या, पर्यायाने महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वात महत्त्वाचा; गोदा-प्रवरा यांच्या तीराचा. याच्यातच भीमा नदीचा, निदान तिच्या वरच्या काठाचा समावेश होतो. गोदावरीचा आरंभीचा भाग ' गोवर्धन. ' सध्याचा नाशिक विभाग. पण खरा गाभा आहे तो देवगिरी-पैठण परिसराचा. सध्या ' मराठवाडा ' नावाने ओळखला जाणारा. बहुधा याच भागाला पूर्वी ' अश्मक-मूलक ' या संज्ञेने ओळखत. गोदातीराचा हा भाग सुपीक, समृद्ध.

सातवाहन राजांच्या शक्तीचा हा मूल आधार. कल्याणी चालुक्यांचे वर्चस्व झुगारून स्वतंत्र राज्य स्थापणाऱ्या यादव कुलाला आश्रय लाभला तो याच भूमीचा. दिल्लीपतींचे जोखड झुगारून देणाऱ्या बहमनी सत्तेचा पाया हाच होता. याहि सुलतानांना हतबल करणाऱ्या निजामशाहीची राजधानी अहमदनगर असली तरी विस्तार प्रामुख्याने याच भागावर होता. याच्याही दक्षिणेला सरकले म्हणजे कृष्णा व तुंगभद्रा आणि त्यांच्या घटप्रभा, मलप्रभा यासारख्या उपनद्या यांनी सुजल आणि सुफल केलेला प्रदेश. बदामीच्या चालुक्यांची राजसत्ता येथेच जन्मली, वाढली. पुढे राष्ट्रकूट आणि कल्याणी चालुक्य यांच्या राज्यांचा प्रमुख आधार हाच. पर्यायाने कर्नाटक संस्कृतीची जन्मदात्री भूमी ही, कृष्णा-तुंगभद्रा दुवेदीची.

या सगळ्याचा मतितार्थ असा की इंग्रजीत ज्यांना ' nuclear areas म्हणजे 'पायाभूत प्रदेश' म्हणतात असे चार परिसर दख्खनमध्ये स्वतंत्रपणे ओळखता येतात. पैकी तापी–नर्मदा हा माळवा–खानदेश या राज्यांचे जन्मस्थान. गुजरात व दख्खन यांच्या कचाटचात असल्याने या प्रदेशाचे स्थान फारसे पृथक होऊ शकले नाही. सांस्कृतिक दृष्टचाही हा सर्वस्वी स्वतंत्र भाग होऊ शकला नाही. कृष्णा–घटप्रभा–मलप्रभा–तुंगभद्रा या प्रदेशाने कर्नाटकाच्या राजसत्तेला आणि संस्कृतीला जन्म दिला, तिचे पोषण केले. येथूनच खास कर्नाटकाची वैशिष्टचे असणारी संस्कृती पूर्वेकडे आंध्र प्रदेशात आणि उत्तरेकडे दक्षिण-महाराष्ट्र, मराठवाडचाचा भाग यावर आपला ठसा उमटवून गेली, म्हणजे या दोन्ही प्रदेशांना अमराठी सत्तांचे आधार म्हणावयास हवे. वर्धा–वैनगंगा–पैनगंगा हा एक आणि गोदा–प्रवरा–भीमा हा दुसरा असे दोन प्रदेश खास मराठी संस्कृतीचे, मराठी राजसत्तेचे आधार होत. या दृष्टीने, ' महाराष्ट्री असावे ' असे सांगणाऱ्या चक्रधरस्वामीचे सर्व भ्रमण गोदातीरावरच रहावे ही गोष्ट किती सूचक आहे ! ह्याच काळात, म्हणजे यादवांच्या काळात, मराठी संस्कृतीचा विशेष अभ्युदय झाला, मराठी साहित्य व भाषा, तसेच कला यांचे पृथकत्व व निराळेपण स्पष्ट झाले आणि हे सगळे घडले गोदा–प्रवरा तीरीच–मराठवाडचाच्या आसमंतात.

वर सांगितलेल्या एका विचाराचा पुनरुच्चार आवश्यक आहे. मध्ययुगाच्या अस्तापर्यंत सर्व अर्थव्यवस्था मूलतः शेतकीवर आणि शेतकी मुख्यतः नद्यांवर अवलंबून होती. एकाएका जलप्रवाहाच्या आधारानेच एकएक समाज, संस्कृती व त्यांना आवश्यक ती राज्यसत्ता उत्पन्न झाली, वाढली. ताम्रपाषणयुगापर्यंत मागे गेले तरी हे दिसते की गोदा, प्रवरा व भीमा यांच्या परिसरातील संस्कृती एकजिनसी व इतरांपेक्षा पृथक् आहे. सातवाहनांचे साम्राज्य आणि यादवांचा

विस्तार गोदातीराच्या भक्कम पायावर झाला ही गोष्ट काही योगायोगाची, अपघाती नव्हे. ती एक प्रकारच्या ऐतिहासिक अपरिहार्यतेने घडली. ही अपरिहार्यता आर्थिक-भूगोलामुळे उत्पन्न झालेली आहे. भूगोलाचे अर्थव्यवस्थेशी असणारे नाते हा कार्यकारणभाव त्यामागे आहे. या कार्यकारणातून, या अपरिहार्यतेतून जे राजे, जी राजसत्ता, जी राजघराणी उत्पन्न झाली त्यांना 'मराठी', 'महाराष्ट्री' हे नामाभिधान लाभावे.

संदर्भ

1. Dutt, R. C., A History of Civilization in India, Vol. 2.
2. Ritt, Srinivas, The Seunas, 1974.
3. Maharashtra State Gazetteers ' History–Part I ' 1967.
4. Bhandarkar R. G., Early History of the Dakhan, 1892.
५. भावे वा. कृ., मुसलमानपूर्व महाराष्ट्र, दोन खंड, १९४६.
6. Yazdani G., Early History of the Deccan, 2 Vols., 1960
7. Sherwani H. K. and Joshi P. M. Medieval History of the Deccan, Vol. 1, PP. 3–4; 1973.

या विषयावर राजवाडे यांच्यापासून जवळपास प्रत्येक इतिहास–लेखकाने काही ना काही मत व्यक्त केलेले आहे. हा विषय अपरिचित नाही. परंतु आर्थिक–भूगोलाचा इतिहासाशी असणारा कार्यकारणसंबंध पुन्हा एकदा स्पष्टपणे उलगडून दाखविणे अगत्याचे वाटले नाही. यासाठी हा निबंध.

श्रीमंत रघुनाथराव पेशवे यांनी केलेली वनयात्रा

बा. ना. मुंडी

छत्रपती श्रीशिवरायांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवल्यापासून ते पेशव्यांनी रूमशामपर्यंत धडक मारण्याची महत्त्वाकांक्षा व्यक्त करीपर्यंतच्या त्यांच्या कटके-पासून अटकेपर्यंतच्या उत्तरेकडील स्वाऱ्यांच्या हेतुसंबंधी विद्वानांनी आपापले मतानुसार विविध विचार आजवर प्रगट केले आहेत. पानिपतासारख्या अत्यंत महत्वाच्या संग्रामासाठी उत्तरेस जाताना, अतिविश्वासाच्या भरात का होईना, सैन्याबरोबर 'कबिला' नेऊन त्याला 'तीर्थयात्रा' घडविण्याची योजना पेशवे काळातील मनोवृत्तीवर प्रकाश टाकते. पाटीलबाबांकडून काशीच्या लोकांच्या अपेक्षा सर्व विदितच आहेत. नाना फडणविसांच्या संकटकालातील धार्मिक, देवभोळ्या वृत्तीचा परिचय त्यांच्या स्वात्मोद्धारावरून स्पष्टपणे होतो. अशीच अनेक उदाहरणें देता येतील. त्यावरून धार्मिक प्रवृत्ति हा मराठ्यांचा एक महत्त्वाचा मौलिक स्वभाव मानावयास प्रत्यवाय नसावा. अशा स्थितीत काबूल–कंदाहार–अटकेपर्यंत मराठ्यांच्या तट्टांची धडक नेऊन, कटकेपासून नेलेले मराठी समशेरीचे पाणी अटकेच्या लोकांना पाजण्याचे कार्य करणाऱ्या, एवढेच नव्हे तर उत्साहात व ऐन उमेदीत रूमशामपर्यंत जाण्याची आकांक्षा बोलून लिहून कळविणाऱ्या 'राघो भरारी' सारख्या खंद्या वीरांच्या मूळ मराठी धार्मिक प्रवृत्तीचा येथे परिचय करून देणे थोडे गमतीचेच होणार आहे. रणांगणावर तेजाने तळपणारा हा मराठा वीर देवाच्या द्वारी कसा लीन, हीनदीन होऊन विनम्रभावाने समर्पण करतो हे वाचनीय लक्षणीय ठरेल; नाही तरी मानवी मनाची अशीच विविधता आणि विचित्रता असते.

रघुनाथराव यांनी आपल्या उत्तरेकडील वास्तव्यात मथुरा, वृंदावन, हृषीकेश आदि तीर्थस्थानांची जी यात्रा केली तिचे वर्णन अपूर्ण का होईना, पण उपलब्ध आहे. मोडीत लिहिलेल्या दोन पूर्ण बंदांचा भाग उपलब्ध आहे.

यात्रावर्णन मथुरेच्या यात्रेनंतरचे आहे. मथुरेस केंद्रस्थान करून इतर यात्रा सोयीसवडीनुसार केल्या आहेत. मथुरा यात्रेचे बंद उपलब्ध नाहीत. मथुरेच्या आसमंत प्रदेशातील वृंदावन, बरसाना, नंदवन, कालियाडोह, गोकुळ, राधा कुंड, कृष्णकुंड आणि अशीच अनेक प्रेक्षणीय स्थळे त्यांनी या यात्रेत पाहिलीत. निरनिराळी 'वने' (कुंजवन, मधुवन आदि) पहात पहात कालिया डोह व

त्यानंतर हरिद्वार, हृषिकेश, लक्ष्मण झूला येथे गेल्याचे वर्णन या दोन बंदात आहे. पुढील बंदात कुठल्या यात्रा होत्या; बदरी केदार; गंगोत्री–जम्नोत्री आदींच्या यात्रा केल्या काय हे सांगणे कठीण आहे. त्या दृष्टीने हे 'यात्रा–वर्णन' अपूर्णच राहिले आहे.

या प्रवासवर्णनाचा लेखकही ज्ञात नाही. मात्र एकंदर वर्णनशैली मोठी आकर्षक, सारगर्भित तर आहेच; पण वर्णनेही सूक्ष्म, मार्मिक तशीच बहारीची सौंदर्यदृष्टीने टिपून केलेली आहेत. लेखक कोणी तरी प्रौढ व वयस्क तसाच रघुनाथरावापेक्षा वडिलकीचा मान असणारा असावा असे वाटते. कारण त्याने रघुनाथरावाचा एकेरी उल्लेख केला आहे. वर्णनातील सूक्ष्मता, निरीक्षण, पुराणांची, तशीच त्या त्या स्थळासंबंधीची ज्ञात ऐकीव माहिती एकत्र करून सांगण्याची प्रवृत्ति, सौंदर्यदृष्टी इत्यादि लक्षणीय आहे. या यात्रावर्णनाचे इतर बंद उपलब्ध असते तर यात्रेप्रमाणेच लेखकाच्या कौशल्याचाही विशेष परिचय झाला असता. लेखनातील मनीराम गुमास्ता, पारखजी होळकरांचा सरदार, अमीरखान पठाण इत्यादि उल्लेखावरून लेखनकालासंबंधी अनुमानाची थोडी कल्पना करता येते.

विशेषतः या यात्रावर्णनाचे महत्त्व म्हणजे मराठीतील प्रवासवर्णनात्मक स्वरूपाचे लेखन या दृष्टीने आहे. पूर्वी शुद्ध 'प्रवास' या हेतूने केलेली वर्णने कमीच. एरवी आग्र्याहून शिवाजीची सुटका व त्यानंतर झालेला प्रवास, किंवा असेच अनुषंगाने आलेले 'प्रवासवर्णन'च उपलब्ध म्हणता येईल. महानुभाव वाङ्मयातील चक्रधर व त्यांच्या पंथीयांनी केलेले प्रवास; नामदेव–ज्ञानेश्वरांनी केलेली तीर्थयात्रा व त्यांचे पद्यात्मक वर्णन; असली काही थोडी फार गद्यपद्यात्मक प्रवासवर्णने सोडली तर रघुनाथराव पेशवे यांनी केलेल्या वनयात्रांचे हे 'प्रवास-वर्णन' मराठी साहित्यात विशेष लक्षणीय म्हणता येईल. रामदासांनी भ्रमण केले पण 'प्रवासाचे' साहित्यिक वर्णन उपलब्ध नाही.

सारांश, मराठीतील पेशवेकालीन "प्रवासवर्णन" या सदरात मोडणाऱ्या साहित्यात रघुनाथराव पेशवे यांच्या या "प्रवासवर्णना" चे स्थान लक्षणीय व महत्त्वाचे मानावे लागेल. लेखकाची भाषा अशुद्ध–काही व्यवहारानुसार, तर काही मोडीत लेखन असल्याने, शुद्धाशुद्ध, अनुस्वार, ऱ्हस्वदीर्घ, वाक्यरचना याचा विशेष निर्बंध पाळला गेलेला नाही. त्या काळातील भाषेच्या अभ्यासास उपयुक्त ठरणारा भाग म्हणता येईल.

पुढे मूळचा भाग दिला आहे. त्यावरून प्रत्यक्ष ओळख होईलच; मुळानुसारच दिला आहे. थोडे शुद्ध केलेले आहे, (मुळचे रूप.)

श्री

श्रीगणेशाय नमः रघुनाथराव पेशवे यांची तीर्थयात्रा नंतर रघुनाथराव मथुरेहून वनयात्रा कर्ण्यास निघाले ते प्रथम **मधुवनची** यात्रा करीत क्रमाने वनयात्रा करीत **बरसाना** म्हणून यक मार्गातच गाव आहे तेथे गेले. या ठिकाणी राधिकेचा जन्म जाला. तिचे मातापितर याच ठिकाणी राहिले होते. हा प्रदेश वृंदावनातीलच आहे. तेथे राधिकेच्या मातापीत्रांच्या चंदनाच्या [१] काष्टाच्या मूर्ती आहे. या गांवी फाल्गुन शु॥ स[२] (२) हरीचा मोठा उत्सव होतो. या उत्सवास स्त्रिया व पुरुष ही एकत्र होऊन क्रीडा करितात. ह्या क्रीडेत बीभत्स शब्दांचा प्रयोग नसून केवळ राधाकृष्णाचे गुण गाऊन अबीर गुलाल उधळतात. त्या स्थळावरून दीड कोसावर नंदवन[३] म्हणून आहे. (३) नंदा व यसो(दे)चे राहण्याचे स्थान आहे. या गावचे समीप लहान टेकडीवर एक देऊळ आहे. तेथे नंद व यशोदा कृष्ण बलराम या दोघांच्या मूर्ती चंदनाचे लाकडाच्या आहे. असमंतात भागी कदंब वृक्ष असून अरण्याची फार शोभा दिसते. या नंद गावी फाल्गुन शु॥ नवमीस होरी समंधी उत्सव होतो. ते सर्व उत्सव रघुनाथराव याने पाहून[१] तेथे जवळ यमुनातीरी **धीर समीर** म्हणुन एक राधाकृष्णाचे क्रीडेचे स्थान आहे. ती स्थाने क्रमाने पाहून वनयात्रा करीत रघुनाथराव परत वृंदावनास गेले. तेथे कदंबाचे वृक्षावरून यमुना डोहातात[२] कालिया सरपास शासन करण्याकरिता उडी टाकिली. त्या स्थळाचे सनीध रघुनाथराव पूरवज[३] सीवाजी वीठ्ठल यांनी कुंजात राधा–माधवजीचे उत्तम मंदिर राहीले[४] आहे व त्या समीपच एक जागा राहण्याजोगी जागा बांधली आहे. तेथे रघुनाथराव याने मुक्काम........ वृंदावनाची यात्रा केली. वृंदावनात ठाकुरद्वार व कुल संवस्थाने मिळून संख्या सुमारे हजार असेल असा अदमास आहे. या स्थळी बैरागी लोकांची वस्ती फार आहे. वृंदावनात रासक्रीडेचे स्थान व **सेवाकुंज** वगैरे स्थाने पाहण्यासारखी आहे. कलकत्यात लालबाबू म्हणून एक मोठा सावकार तो वीरक्त होऊन वृंदावनात येऊन राहीला. त्याने पुष्कळ खर्च करून तेथे एक मंदिर बांधले. त्या स्थळी **वेगळा वेगळा**[६] करीत कृष्णाने ज्या लीला केल्या त्या तेथे होतात. या कामी त्या सावकारांनी बहुत पैसा सावकारीत ठेऊन त्याचे व्याजाचे उत्पन्नात हा प्रकार चालतो. कृष्णाने गोपीचे वस्त्र यमुनेतीरी हारण केली. कदंब वृक्षावर ठेवली ते स्थान तेथेच आहे. त्याप्रमाणे केशी दैत्याचा वध केला ते स्थान ......[८] यज्ञ पत्न्याजवळ अन्न मागितले ते स्थान, गोपीने कृष्णाबरोबर क्रीडा केली स्थान, असी अनेक स्थाने येथेच असून ती सर्व हाली ते उपलब्ध आहे. फाल्गुन मासी फाग म्हणजे फाल्गुनसंबंधी उत्सव या प्रदेशी बहुत होतो. त्यात फाल्गुन शु॥ ११ चे दिवसी वृंदावनात मोठा उत्सव असतो. प्रत्येक ठाकुरद्वारात करतात. ते उत्छवाचे दिवस रघुनाथराव यास त्या अनायासे प्राप्त जाले. येकंदर **बेलेची बेलेस**[२] आहे

त्यात कृष्णलीलेच्या जागा प्रसिद्ध आहे. अलीकडे पारखजीचा गुमास्ता मनीराम सेठ याचा पुत्र प्रदेशी द्रवीड लखमीचंद याने रामानुज धर्म स्वीकारला. सबब दक्षीण देशांत श्रीरंगपटणाचे स्थान आहे त्या नमुन्याप्रमाणे वृंदावनात बहुत पैसा खर्च करून एक नवीन मंदीर बांधले आहे. येथे श्रीरंगाची स्थापना करून रामानुज मतातील बहुत वीद्यवान लोक आणुन ठेवीले आहे. द्रवीड देशातील रीतीप्रमाणे तेथे उत्सव होतो. ती जागा म्ह (ण) ण्या सारखी उत्तम आहे. गोवर्धन पर्वताची प्रदक्षणा कचे दाहा कोसाची आहे. या प्रदक्षणेत एक कुसुम सरोवर म्हणून तलाव लाग लागतो ती जागा फार रमणीय. तेथे सुरजमल नामक[3] **नामक** जाट राजानी छत्री आहे. या छत्रीचे काम अपूर्व आहे. त्या प्रमाणे चंद्र सरोवर म्हणुन दुसरा तलाव आहे. याचे समीप दाट झाडीत राधा कुंड व कृष्ण कुंड अशी दोन कुंडे आहेत आणी या कुंडातील पाणी त्या कुंडांत जात आहे. या स्थळी स्नानदानाचे माहात्म पुराणांतरी फार वर्णीले आहे. याप्रमाणे मानसी गंगा म्हणून एक स्थान आहे ते फार अप्रतीम आहे येथे दीपावलीस म्हणजे दीवाळीचे समई यात्रा मोठी भरते. या प्रकारे चालीस (?) **स्थानाची** यात्रा पध्रा दीवसांत करून रघुनाथराव हे परत मथुरेस आले. नंतर **गोकुळास** गेले. तेथील मुख्य तीर्थ प्रल्हाद घाट यमुनात आहे. या स्थळी कृष्णाने मृत्तिका भक्षण केली हे यसोदेस कळताच त्याच्या जवळ धाऊन विचारले काय खाल्ले. तेव्हा कृष्णाने आपले तोंड उघडले तो त्यात यसोदेस सर्व ब्रम्हांड दृष्टीस पडले म्हणून त्यास ब्रम्हांड तीर्थ असे असे नांव प्राप्त झाले. तेथेच समीप फार बारीक रेती आहे. तीत कृष्ण लोळीत होते. तीस रमण रेती असे म्हणतात ती रेती व ब्रम्हांड घाटाची मृत्तीका ही यात्रेकरी आपले बरोबर आणीत असतात. गोकुळात कृष्णचंद्र या नावाचे स्थान असून त्यास बल्लभ कुलातील सेवा करीतात. रघुनाथराव हे गोकुळची यात्रा करून परत मथुरेस आले नंतर मथुरेहून सात कोसावर **बलदेवजीचे** स्थान आहे, तेथे दरशनास गेले. या स्थानी मोठे भव्य मंदीर असून आंत बलदेवजीची मूरत आहे. त्याच्याच जवळ त्याची पत्नी रेवती हीची ही मूर्ति आहे. या बलदेवजीची स्थापना श्रीकृष्ण नीजधामावर गेल्यावर जाली आहे, या देवालयास नेमणूक सालीना रू. पाच हजाराची आहे. यायोगे पुजा वगैरे व्यवस्था चांगली चालते. यात्रेकरू बहुत करून कोणी खडीसाखरेचे नैवेद्य दाखवितात. या प्रांतातील पुष्कळ राजे व राजवाडे याजकडून नैवेद्याबद्दल नेमणुक आहे. बलदेवास होळकराचा सरदार मीरखान पठाण याणे काही नवस केला होता तो पूर्ण झाल्यावरून त्याने काही नेमणुक करून दीली आहे असे आम्हास माहिती तेथील पुजारी सागतात. या स्थळाची यात्रा करून रघुनाथराव हे मथुरेस (आले). श्री हरिद्वारपासोन ऋषीकेश म्हणून यक स्थान आहे त्या जागी......[1] नामक यक तीर्थ आहे. या तीर्थी रोम्य ऋसींनी वीष्णु प्रीत्यर्थ तप केले तेव्हा वीष्णुने

आम्रवृक्षावर रूप धारण करून रौम्य ऋसीस दरशन दिले. या कारणावरून असे नांव पडले. त्या कालचा यक जुना आम्रवृक्ष[२] त्या तीर्थासमीप आहे. या आम्रवृक्षास क्वचीत फल येते ते फार दुरमीळ आहे. ते भाग्यवानासीवाय दुसऱ्यास प्राप्त होत नाही असे म्हणतात. तेथील भागीरथीचा प्रवाह मोठ्या वेगाने वाहतो व तेथील उदक अती स्वच्छ आहे. तेथुन पुढे अनतरावर लक्ष्मणाचे स्थान आहे तेथे एक लक्ष्मणाची सुंदर मुर्ती असोन त्यास तपोवन म्हणतात. त्या स्थळी वैरागी लोक फार राहतात. त्या रीसीकेश स्थानाचा देखावा पाहून हे अतींव विचित्र व सुंदर स्थान, तपोभुमी खचित आहे असा मनाचा नीश्चय होतो. या स्थळी गंगेचे पात्र फार खोल असून प्रवाह मोठ्या जोराने वाहतो. त्यामुळे पलीकडे जाता येत नाही. याकरता येथे झुला बांधला आहे. या झुल्यास लछमन झुला असे म्हणतात. हा झुला सातसे हात लांब व एकच हात रुंद आहे. वर दोऱ्या बांधील्या आहे. त्या दोऱ्या फार बारीक असोन त्याजला कधीही धक्का[१] होत नाही. त्यास याजला लक्ष्मणाचा प्रसाद जाला आहे असे म्हणतात. याजकरीता त्याजला[२] माहिती सांगुन सदरहू वीस्वस्त ब्राह्मण राहत असतो तो सरस्वथीचा पुत्र असे लोक म्हणतात. परंतु त्याजला स्थितीवर लोकानी काहडु त्या.........[३] प्रकार जाला, प्रकार जाला म्हणजे ते फार दीवस अभ्यासाकरीता राहत होते याजकरीता त्याजला काही तरी माहिती पाहिजे म्हणेंन यक ग्रहस्तास पूर्वी विचारले की आदल्यास काई सांगावे याजकरीता आदल्यास, कर्ज, तरुण ही नाही हे पाहुन ती फार दु:ख करू लागली याच करीता.

(यापुढचा बंद नाही. इतकाच भाग उपलब्ध आहे. शेवटला भाग घाईत लिहिलेला म्हणून सहज वाच्य नाही.)

संदर्भ

१. क आहे. २. ह च्या जागी हो असावे. ३. वाच्या जागी ता दिला असून पूर्ण शब्द नंदनवनासारखा लिहिला आहे.

(१) एकेरी संबोधन. (२) डोहात एवढेच हवे किंवा डोह त्यात असे चालेल ? (३) रघुनाथरावांचे पूर्वज सीवाजी वीठ्ठल हे कोण ? पूर्वज म्हणजे पूर्वी आलेले असे मानून हे विंचुकरांचे नाव तर नाही ? (;) रा च्या जागी बां असावे (५) फाटका भाग 'करून' असावे (६) अस्पष्ट (७) ते हवे.(८) अवाच्या

(१) अधिक आहे. (२) अस्पष्ट. (३) अधिक शब्द. (४) ची हवे. (५) अस्पष्ट.

(१) अस्पष्ट—कुबज्यानक असे आहे. (२) कुबज्याचे असे काही वाटते.

(१) धोका (२) कोणाला ? (३) अस्पष्ट. (४) कौण ?

गीतापंचरत्न-एक सचित्र हस्तलिखित

उषा रानडे

मध्ययुगातील वैष्णवपंथीयांनी आपल्या पंथाचा प्रमुख आधार म्हणून श्रीमद्भागवताला मान्यता दिलेली असली तरी त्याखेरीज अनेक कथा, पुराणे आणि स्तोत्रे या पंथाला मान्य होती. अशा ग्रंथामध्ये पंचरत्नी गीता हा संग्रह महत्त्व पावला होता. या संग्रहात प्रमुख स्थान अर्थातच भगवद्गीतेला आहे. गीतेच्या जोडीला भीष्मस्तवराज, विष्णुसहस्रनाम, अनुस्मृति आणि गजेन्द्रमोक्ष ही चार स्तोत्रे एकत्र आणलेली आहेत. हा संग्रह कोणी तयार केला किंवा कोणत्या काळात तयार केला याची माहिती मिळत नाहीं. मात्र संग्रहकर्त्याची योजकता कौतुकास्पद आहे. उपनिषदांचे दोहन करून श्रीकृष्णांनी भारतीय तत्त्वज्ञानाचे सारच ज्यात सांगितले आहे, ती गीता वैष्णवांचे तात्त्विक अधिष्ठान. उरलेली चार स्तोत्रे विष्णूच्या नामस्मरणाची किंवा नामस्मरणाचा महिमा सांगणारीं. नामस्मरण हा वैष्णव साधनेतील मुख्य भाग आहे. तत्त्वज्ञान आणि साधनामार्ग याची सुरेख गुंफण 'पंचरत्नीत' केली आहे.

हा संग्रह तयार करण्यामागे एकच सूत्र असले तरी ही सर्व स्तोत्रे मुळात कोणच्या ग्रंथात होती यासंबंधी हस्तलिखितात एकमत नाही. भगवद्गीता भीष्मपर्वातून व भीष्मस्तव हे शांतिपर्वातून घेतलेले आहे. विष्णुसहस्रनाम दोन ग्रंथात सापडते. महाभारताच्या अनुशासनपर्वात विष्णुसहस्रनाम आहे तसे ते पद्मपुराणातही आहे (पंचरत्नीचे हस्तलिखित तयार करणारांनी दोन्हींचीही उसनवारी केलेली आहे) अनुस्मृति आणि गजेन्द्रमोक्ष यांच्या मूळ पत्त्याबाबतही एकमत नाही. शांतिपर्व, शांतिपर्वातील उत्तमानुशासन, महाभारतातील विष्णुधर्मोत्तर असे त्यांचे पत्ते दिले आहेत. गजेन्द्रमोक्ष ही कथा भागवतात आहे; पण महाभारतात नाही. अनुस्मृति महाभारताच्या दिलेल्या पत्त्यावर सापडत नाही. तिचा उगम अन्यत्र शोधावयास हवा. क्वचित् काही ठिकाणी वामनसूक्त, मनीषापंचक, विष्णूपञ्चक अशा स्तोत्रांचा समावेश करण्यात आला असला तरी परंपरेने पाच रत्ने म्हणजे कोणती या शंकेला फारसा वाव ठेवलेला नाही.

गीतासहस्रनामानि स्तवराजोह्यनुस्मृतिः
गजेन्द्रमोक्षणं चैव पञ्चरत्नानि भारते ।।

या श्लोकाने प्रस्तुत हस्तलिखितात पंचरत्नाचे स्वरूप स्पष्ट केले आहे

पंचरत्नीची छापील आवृत्ति सर्वत्र मिळते. निरनिराळ्या हस्तलिखित संग्रहातूनही या पोथीच्या कितीतरी प्रती पहावयास मिळतात. यापैकी भा. इ. सं. मंडळाच्या संग्रही असणाऱ्या काही पोथ्यांत लेखनकाल दिलेला आहे. या पोथ्या इ. सनाच्या १७ व्या शतकातील किंवा १८ व्याच्या पूर्वार्धातील आहेत. पुण्याच्या डेक्कन कॉलेजच्या संग्रहातील पोथ्यांवरही हाच कालनिर्देश आढळतो. यातील बऱ्याच पोथ्या सचित्र आहेत. १८ व्या शतकातील एक सचित्र पोथी डेक्कन कॉलेजच्या पारसनीस संग्रहालयात ठेवलेली आहे. या पोथीचा व त्यात रंगविलेल्या चित्रांचा परिचय करून देणे हा या लेखाचा मुख्य उद्देश आहे.

महाराष्ट्रात ठिकठिकाणी जे हस्तलिखित संग्रह आहेत त्यात या पोथीची एखादी तरी प्रत आढळतेच व बहुधा ती सचित्रही असते. किंबहुना अशा संग्रहालयातील सचित्र पोथ्या पाहिल्या तर त्यातील बहुतेक सर्व गीता पञ्चरत्नीच्याच आहेत. अशा लोकप्रिय ग्रंथाची व चित्रशैलीची प्रातिनिधिक म्हणून या पोथीला महत्त्व आहे.

पारसनीस संग्रहातील ही पोथी सचित्र आहे म्हणून तिच्याकडे बारकाईने पाहणे अगत्याचे आहे. सदर पोथीत एकंदर २२ चित्रे आहेत. सर्वसाधारणपणे गीतेच्या सुरवातीला एक व प्रत्येक अध्यायाच्या सुरवातीला एक अशी गीता संपेपर्यंत १८ चित्रे आहेत. नंतर विष्णुसहस्रनाम, भीष्मस्तव, अनुस्मृति व गजेंद्रमोक्ष अशी एकंदर २२ चित्रांची विभागणी आहे. यापैकी पहिल्या चित्रात कृष्ण व अर्जुन रथात बसले आहेत. रथाच्या मागच्या भागात अर्जुन असून कृष्ण सारथ्य करीत आहे. रथाला दोन पांढरे घोडे जोडले आहेत. ज्या पानावर हे चित्र आहे त्या पानाचा आकार १५॥ सें. मी. × ९ सें. मी. असून चित्राचा आकार १२॥ सें. मी. × ७ सें. मी. असा आहे. सर्व चित्रांच्या भोवती निळ्या व सोनेरी रंगाचे किनार असून त्यात इंग्रजी V आकाराचे पट्टे आखून त्यावर फुलांची वेलबुट्टी काढली आहे. अर्थात् चित्राची मर्यादा या वेलबुट्टीनेच निश्चित केली आहे.

सर्व बावीस चित्रांपैकी पहिल्या चित्राचा वर उल्लेख केलाच आहे. यानंतरची दहा चित्रे ही विष्णुच्या दशावताराची आहेत. गीतेच्या अकराव्या अध्यायाच्या सुरवातीला विश्वरूपदर्शनाचे चित्र आहे. उरलेल्यांपैकी ५ कृष्णाच्या बालपणीची चित्रे आहेत. यशोदा ताक घुसळत असताना कृष्ण लोण्याचा गोळा खात आहे, कृष्णाने गोवर्धन उचलला आहे, गोपीवस्त्रहरणाचा देखावा आहे, कदंबवृक्षाखाली कृष्ण बासरी वाजवत आहे, तसेच कालियामर्दन (आकृती ३) इत्यादि. विष्णुसहस्रनामाच्या सुरवातीला शेषशायी विष्णुचे चित्र आहे. भीष्मस्तवाच्या

सुरुवातीला भीष्म शरपंजरी पडले आहेत असा देखावा आहे. अनुस्मृतीच्या सुरुवातीला धृतराष्ट्राचे चित्र आहे. शेवटी गजेंद्रमोक्षाचे चित्र आहे.

या बावीस चित्रांपैकी प्रत्येकाचा स्वतंत्र रीत्या विचार करणे किंवा त्याची चिकित्सा करणे यापेक्षा साकल्याने विचार केला तर खालील गोष्टी प्रामुख्याने आढळतात.

एकंदर चित्रांपैकी ५ चित्रे ही या पोथीतील मजकुराशी संबंधित अशी आहेत. बाकीची चित्रे ही काय योजनेने घातली आहेत हे सांगता येत नाही. पण कदाचित् दशावतार ही एक चित्रमालिका असल्याने आणि पोथीतील विषयाला तीं थोडीफार जवळची असल्याने घातली असतील. जी चित्रे मजकुराशी संबंधित आहेत ती अशी. (१) रथात बसलेले कृष्ण व अर्जुन (२) विश्वरूपदर्शन (३) शेषशायी विष्णु (४) शरपंजरी पडलेले भीष्म (५) गजेन्द्रमोक्ष.

पहिल्या चित्राचे निरीक्षण करताना ते अगदी गीतेच्या मजकुराप्रमाणे काढलेले आढळते. गीतेच्या पहिल्या अध्यायाच्या चौदाव्या श्लोकात वर्णन आहे–

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यन्दने स्थितौ ।
माधवः पाण्डवश्चैव दिव्यौ शङ्खौ प्रदध्मतुः ॥ १.१४ ॥

फक्त कृष्ण व अर्जुन खंख वाजवत आहेत हा भाग चित्रात नाही. पण रथाला पांढरे अश्व जोडलेले आहेत. तसेच विश्वरूपदर्शनाचे वर्णन गीतेच्या अकराव्या अध्यायात आहे त्याप्रमाणे चित्र काढले आहे.

परंतु ही ४, ५ चित्रे वगळली तर बाकी सर्व चित्रांचा विषय गीता किंवा महाभारत यांच्याशी फारसे जुळणारे नसून पुराणांना जुळणारे आहेत. दशावतार किंवा कृष्णाच्या बाललीला यांची रसाळ वर्णनें मत्स्यपुराण, ब्रह्मपुराण, पद्मपुराण इत्यादि पुराणांतून विशेषतः भागवतातून आली आहेत.

चित्रकाराला चित्र काढताना वर्ण्य विषय साधारण समजल्याबरोबर चित्र काढण्याची घाई केलेली दिसते. ज्यासंबंधी चित्र काढायचे त्याचा संपूर्ण तपशील, त्यातील बारकावे यांच्या बाबतीत माहितीपेक्षा निष्काळजीपणा अधिक दिसतो. उदाहरण घ्यायचे झाले तर भीष्म शरपंजरी पडले आहेत हे दाखवताना त्याने 'शरपंजर' याचा नुसता विचार केला असता तर बाणांची शय्या दाखवणे अशक्य नव्हते. पण त्याला ही कल्पनाही आलेली दिसत नाही. तसेच नृसिंह अवताराच्या चित्रात विष्णुने मानवी शरीर धारण केलेले असून त्यावर सिंहाचे तोंड आहे. येथे चित्रकाराने वाघाचे तोंड काढले आहे. त्याला सिंहाचा आकार काढता येत नव्हता असे नाही. पण वर्ण्यविषयाचा विचारच केला नाही किंवा निष्काळजीपणा असेल. तसेच हिरण्यकशिपु हा दैत्य असताना बाकी ठिकाणी दैत्यांचे दात पुढे, दोन शिंगे

असलेले असे चित्र काढले आहे. येथे मात्र हिरण्यकशिपू दैत्यासारखा न काढता ऋषी वगैरेप्रमाणे काढला आहे. अशा निष्काळजीपणाने चित्रे परिणामकारक होत नाहीत.

पूर्वीं म्हटलेच आहे की प्रत्येक चित्राची मर्यादा वेलबुट्टीने आखून घेतली आहे. या वेलबुट्टीत प्रामुख्याने निळा व सोनेरी रंग वापरला असून त्यावर फुले आहेत. तसेच जेथे अध्यायाची सुरवात होते तेथे किंवा कोणत्याही स्तोत्राच्या सुरवातीला संपूर्ण पानावर अशी सोनेरी वेलबुट्टी असून आत लाल काळ्या व सोनेरी रंगाची अक्षरे आहेत. ही वेलबुट्टी म्हणजे मुसलमानी हस्तलिखित पद्धतीचे खास वैशिष्टय म्हणावे लागेल. जेथे चित्रात एखादी कमान महाल असे असेल तेथे ही वेलबुट्टी तोडून चित्र काढले आहे. आखीव मर्यादेबाहेर जाण्याचा हा प्रकार समकालीन चित्रात सहसा आढळत नाही. संपूर्ण चित्राची चौकट या ठाशीव वेलबुट्टीने डोळ्यात भरते व चित्राला उठाव देते.

चित्रे काढण्याकरितां बव्हंशी रंगाचे पट्टे ओढून कृत्रिम पार्श्वभूमि निर्माण केली आहे. केशरी व हिरवा रंग शक्यतो पार्श्वभूमीसाठी वापरला आहे. काही ठिकाणी पार्श्वभूमि विचारपूर्वक बदलणे शक्य होते. उदा:-कृष्ण अर्जुन रथात बसलेले असताना मागे रणांगणाचे दृश्य दाखवता आले असते. पण केवळ रंगाचे पट्टे ओढून पार्श्वभूमि केली आहे. नृसिह अवतारात मात्र महालाचा देखावा आहे. पांढऱ्या खांबावर कमानी उभारल्या असून लाल महिरपी व तोरणे आहेत. केशरी रंगाचे बुट्ट्यांचे छत आहे. परंतु एकंदर पार्श्वभूमीच्या बाबतीत कल्पकतेचा अभाव दिसतो.

बहुतेक चित्रांत पार्श्वभूमीसाठी केशरी रंग वापरला आहे. जेथे केशरी रंग वापरला असेल तेथे मानवी किंवा देवांच्या आकृती पांढऱ्या रंगाने काढल्या आहेत. जेथे पार्श्वभूमिसाठी हिरवा रंग असेल तेथे केशरी रंग पोशाखासाठी वापरला आहे. पण केशरी रंगावरील पांढऱ्या आकृतीमुळे चित्रे अतिशय उठावदार दिसत आहेत. वास्तविक ज्या काळातील (१८ व्या शतकातील) ही चित्रे आहेत त्या काळी पाण्यासाठी निळा किंवा हिरवा रंग वापरून त्यावर जलचर प्राण्यांच्या आकृती काढत असत. पण चित्रकाराने हा संकेत येथे मोडून सर्वत्र पाण्यासाठी रुपेरी रंग (Silver paint) वापरला आहे. पाण्याच्या लाटा दर्शविण्यासाठी मधे मधे पांढऱ्या समांतर रेषा काढल्या आहेत. कमळासाठी गुलाबी रंग वापरून कडा लाल रंगाच्या आहेत. सर्वत्र स्त्रियांच्या पोशाखासाठी रंगीत पट्ट्यांचा परकर व डोक्यावर ओढणी काढली असून त्यासाठी भडक रंग वापरले आहेत. त्यातही रंगसंगति साधण्याचा प्रयत्न केला आहे. उदा:-पहिल्या रथाच्या चित्रात हिरव्या

पार्श्वभूमिवर पांढऱ्या रंगाचे घोडे आहेत. अर्जुन व दोन योद्धे यांच्या अंगरख्याचा रंग केशरी आहे तोच रथाच्या छत्रीला वापरला आहे. म्हणजे भडक रंगाच्या वापरातही असा समतोल दिसतो.

या सर्व भडक रंगाचा उपयोग चित्रांतील विसंगति झाकून टाकण्याकडे होतो. चित्रांत अनेक प्रकारच्या विसंगति आहेत. गजेंद्रमोक्षाच्या चित्रांत नक्राला पोपटी रंग दिला आहे. या रंगाने संपूर्ण चित्राचे सौंदर्य नष्ट झाले आहे. कदंब वृक्षाच्या पानांचे ठराविक आकार पाने एकमेकांना चिकटली आहेत असे दाखवतात. खोडाचा रंग भडक रंगाच्या पार्श्वभूमिवर उठून दिसावा म्हणून पांढरा दिला तरी त्यातील मूळची वास्तवता ही थोडीफार ध्यानात घेतलीच पाहिजे. वराह अवतारातील पृथ्वीचा गुलाबी रंगच दुसऱ्या चित्रात गोवर्धन पर्वताला वापरला आहे.

चित्रांमध्ये ज्या मानवी किंवा देवदेवतांच्या आकृती काढल्या आहेत त्यांत काही संकेत ठरवलेले दिसतात. उदा:–ज्याच्या संबंधी चित्रे आहेत त्या व्यक्तीची आकृती मोठी व इतर दुय्यम व्यक्तींच्या आकृती छोटया अशी रचना आढळते. उदा:—वसुदेव कृष्णाला डोक्यावरून गोकुळात नेत आहे येथे वसुदेवाची आकृती मोठी आहे. बाकीं देवकी, पहारेकरी, यशोदा यांच्या अगदी छोटया आकृती आहेत. परशुरामाच्या अवतारात सहस्रार्जुन व परशुराम यांच्या आकृती मोठया व आई-वडिलांच्या आकृती छोटया आहेत.

एक महत्त्वाची गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की आकृतींची मांडणी करताना संपूर्ण चित्राच्या चौकटीत सर्व आवश्यक त्या आकृती दाटी न करता बसवल्या आहेत. त्यांच्या चित्रातील स्थानानुसार त्या लहानमोठ्या काढल्या आहेत. आकृतींची रचना करताना त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध ध्यानात घेऊन आकृतीत योग्य ते अंतर ठेवले आहे. एकंदर चित्राची मांडणी योग्य प्रकारे केली आहे. वसुदेव कृष्णाला नेत असताना त्याच्या पाठीमागे ३ छोटया चौकटीत दोन पहारेकरीं व देवकी यांचे चित्र असून तोंडाच्या बाजूला बिछान्यावर बसलेल्या यशोदेचे व मुलीचे चित्र आहे. एकंदर चित्ररचनेचे तंत्र चांगल्या प्रकारे हाताळले आहे.

देवदेवतांच्या आकृतीच्या बाबतीत, जेथे विष्णूचा अवतार असेल तेथे पुराणांत सांगितल्याप्रमाणे कृष्ण व विष्णु यांना निळा रंग, त्यांचा पितांबर, ३ किंवा ४ टोकांचा सोनेरी मुकुट या गोष्टी अगदी कटाक्षाने पाळल्या आहेत. इतकेच काय पण चतुर्भुज कृष्ण किंवा विष्णु यांच्या हातांतील पद्म, चक्र, शंख, गदा हा अनुक्रमही शक्यतो असाच ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. एकंदर सर्व चित्रात आवश्यक तेवढयाच आकृती वापरल्या आहेत. परंतु स्त्रिया मग लक्ष्मी, यशोदा, सीता कोणी

असो, सर्वांचे चेहरे व पोशाख एकाच प्रकारचे आहेत. स्त्रियांना परकर ओढणी असा एकाच प्रकारचा राजस्थानी पोषाख दिला आहे. ताक घुसळणाऱ्या यशोदेचे जे चित्र काढले आहे त्या चित्रांत यशोदेने संपूर्ण बाह्यांचा मुसलमानी पद्धतीचा अंगरखा घातला आहे. सर्व स्त्रीपुरुषांचे पोशाख, त्यांची पालथी मांडी घालून बसण्याची पद्धत यावरून चित्रकारावर मुसलमानी पद्धतीची छाप पडलेली दिसते. अर्जुन-कृष्ण या सर्वांचे चेहरे एकाच प्रकारचे आहेत.

सर्व चित्रांचा विचार केला असतां प्रमाणबद्धतेचा अभाव ही प्रामुख्याने जाणवणारी गोष्ट आहे. तसेच भावदर्शनांत चित्रकार अत्यंत अयशस्वी झाला आहे. पहिल्या चित्रात कृष्ण इतका अशक्त व दुबळा दाखवला आहे की केवळ निळा रंग व पितांबर यामुळेच त्याला कृष्ण म्हणावे लागते. वामन अवतारांत वामनाच्या छोटया आकृतीवर दाढी असलेला वृद्धाचा चेहेरा काढला आहे. पहिल्या चित्रात अर्जुनाच्या चेहेऱ्यावर भीति, मनाचा कमकुवतपणा कुठेही दिसत नाही. गोपीवस्त्र हरणाऱ्या देखाव्यांत गोपीच्या चेहेऱ्यावर स्त्रीसुलभ लज्जा इ. भाव दिसत नाहीत; लोणी पळवणाऱ्या कृष्णाचा खटयाळपणा आढळत नाही. भावदर्शन हा चित्राचा आत्माच नष्ट झाल्याने चित्रात जिवंतपणा वाटत नाही. नाही म्हणायला रामपञ्चायतनात रामाची मूर्ति अत्यंत प्रसन्न आहे. (आकृती ४) तसेच पांढऱ्या रंगाने काढलेल्या अश्व, गजेंद्र यांच्या आकृती रेखीव आहेत.

चित्रांच्या रेखा अतिशय सफाईदार आहेत. पण त्या भावदर्शनानुकुल नाहीत. वर म्हटलेच आहे की रामपंचायतन, सहस्रार्जुन इ. चित्रे रेखीव असली तरी स्त्रीपुरुषांच्या चेहेऱ्याचे प्रमाण सारखे वाटते. सीता, यशोदा या दोन्ही स्त्रियाच असल्या तरी भावदर्शनाच्या अभावाने त्यात फरक जाणवत नाही. मानवी आकृतीपेक्षा घोडे, गजेंद्र, शेष इत्यादि प्राण्यांच्या आकृतीत सफाई अधिक जाणवते. रेषांच्यात तुटकपणा नसतानाही वर्ण्यविषयासंबंधी अपुरी माहिती, निष्काळजीपणा यामुळे कित्येक चित्रांचे सौंदर्य कमी झाले आहे. उदाः–यशोदा ताक घुसळते आहे त्या चित्रांत डेऱ्याची आकृती फुलदाणीसारखी आहे. समुद्रमंथनात मंदर पर्वताचा रवी म्हणून उपयोग करताना जी आकृती आहे तीच यशोदेच्या हातात आहे. कूर्म अवतारांत कूर्माचा आकार बदकासारखा असून नको इतका हिरवा रंग दिला आहे. अशा निष्काळजीपणाने खूपशी चित्रे समजून घ्यावी लागतात.

प्रस्तुतच्या पोथीतील चित्रात चित्रकारावर मोगल संस्कृतीची पडलेली छाप जागोजागी प्रतीत होते. एका चित्रांत सिंहासनावर कृष्ण बसला असून पुढे ५ पांडव आहेत. पांडवांचे पोशाख, पगडया त्यावरील पिसे सर्व मोगल पद्धतीचे आहे;

तसेच त्यांची बसण्याची (पालथी मांडी घालून) पद्धत, पांडव व कृष्ण यांच्यातील अंतर हे सर्व पाहतां मोगल बादशहाचा दरबारच डोळ्यापुढे उभा राहतो. स्त्रियांचे पोशाखावरून हीच गोष्ट सिद्ध होते.

या पोथीप्रमाणेच आणीकही एक दोन सचित्र पोथ्या पाहण्यात आल्या. त्यांतील मजकूर, चित्रें व लिपी यावरून त्याही पोथ्या या पोथीला समकालीन असाव्यात असे वाटते.

सदर पोथीच्या प्रत्येक पानावर पिवळ्या रंगाच्या चौकटीत अक्षरे बसविली आहेत. पोथीत असलेल्या एकंदर अक्षरांवरून (ष्ठा=ष्ठा. ऐी=णि, त्र्प्र=अ. झ=धृ) व आकड्यांवरून ही पोथी अठराव्या शतकातील असावी असे वाटते.

वरील सर्व गोष्टींचा विचार केवळ एका सचित्र पोथीचा परिचय करून देण्यापुरताच मर्यादित आहे.

[पारसनीस संग्रहातील पंचरत्नी गीतेच्या या पोथीचा अभ्यास करून तो प्रसिद्ध करण्याची परवानगी दिल्याबद्दल, त्या संग्रहाचे प्रमुख डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी यांची लेखिका आभारी आहे.]

आकृती ३



कालियामर्दन

रानडे : गीतापंचरत्न-सचित्र हस्तलिखित

आकृती ४



श्रीरामपंचायतन

रानडे : गीतापंचरत्न-सचित्र हस्तलिखित

मानाजी शिंदे फाकडे

प्र. ल. सासवडकर

शिंद्यांचा वंश

अठराव्या शतकात मराठी राज्यातील पुढे आलेल्या अनेक वंशाबद्दल एका शाहीराने 'धन्य वंश एकेक कल्पवृक्ष पिकले' असे लिहिले आहे. जे अनेक कर्तबगार व पराक्रमी वंश पुढे आले त्यांत कण्हेरखेडच्या शिंद्यांचा वंश हाही एक कर्तबगार पुरुषरत्नें निर्माण करणारा कल्पवृक्ष होता. राणोजी, जयाप्पा, दत्ताजी; जनकोजी, मानाजी, महादजी व दौलतराव अशी श्रेष्ठ मालिका त्यांच्यात निर्माण झाली. मानाजी हा राणोजीच्या वंशातील साबाजीचा नातू होता असे म्हणतात.[१] याच्या जन्मकालाचा पत्ता लागत नाही.[२]

रघुनाथ पेशव्याचे ऋण

साबाजी, दत्ताजी, जनकोजी वगैरे उत्तरेत मृत्यू पावल्यानंतर सरदारी कोणास द्यावयाची असा प्रश्न निर्माण झाला. रघुनाथराव पेशव्याने १७६४ त मानाजीला सरदारी देण्याचे ठरविले.[३] या प्रसंगापासून मानाजी हा रघुनाथरावाचा निस्सीम सेवक बनला. मानाजी नेहमी घोडे बाळगून शिलेदारीत असे. जयाप्पाची पत्नी सखूबाई ही घरातील वयस्क स्त्री होती. वेळप्रसंगी पेशवे देखील तिचा सल्ला घेत असत. तिचे आणि महादजीचे पटत नव्हते म्हणून तिनेच महादजीऐवजी मानाजीस सरदारी देण्यासाठी रघुनाथराव पेशव्याला सल्ला दिला. त्यानुसार मानाजीला सरदारकी देण्यात आली व महादजीला सरदारकी-वरून दूर करण्यात आले. त्यामुळे महादजीला राग येऊन तो उज्जैनकडे निघून गेला. रघुनाथराव पेशव्याने देवजी बयाजी या सरदाराला महादजीला अडविण्यासाठी लिहिले. पण तो निसटला.[४] मानाजीला सरदारकी देऊन दत्ताजीच्या वेळचा वसूल घ्यावा असे सांगण्यात आले. सरदारकी देण्यासाठी रघुनाथराव पेशव्याने प्रयत्न केल्याने मानाजीच्या मनांत रघुनाथरावाबद्दल नितांत आदर व निष्ठा होती. ६ ऑगस्ट १७६५ मधील रघुनाथरावाला लिहिलेल्या एका पत्रात तो लिहितो– "आम्हापासून सेवा घडणे त्यास दोन मास झाले. भाषणात मनस्वीपण करावे तरी ईश्वरपरिणाम लावील. धन्याचे पुण्य उपयोगी पडेल तेच खरे. आम्ही आपले चित्तात दृढनिश्चय येकच केला आहे. खावंदांचे चरणापाशी येकनिष्ठता आहे. फौज़ेची तरदूद पांचसात हजारापर्यंत जहाली आहे.

पागा महालो महाल चाकरीस पाठविले आहेत. बारगीर नाहीत. महालकरी जमीनदार राऊतानिशी शहरांत[५] आहेत." पुरंदरच्या तहानंतर हा रघुनाथरावाचा पक्ष सोडून बारभाई पक्षाकडे आला. महानदीच्या काठी रघुनाथराव पेशव्याचा पराभव झाला. त्या वेळी मानाजी जखमी झाला होता. पुरंदरच्या तहामुळे तो पेशव्याच्या बाजूस झाला. बारभाईशी लढण्यामुळे रघुनाथरावाच्या पक्षास अखेरपर्यंत चिकटून राहणाऱ्या थोड्या लोकांपैकी तो एक होता. रघुनाथरावाचा पक्ष सोडून ज्या वेळी तो बारभाईकडे आला त्या वेळी त्याने हरिपंत फडक्यांना पुढीलप्रमाणे लिहिले– " इंग्रजांच्या विचारे तह ठरला. श्रीमंत दादासो० मुंबईस जाणार फौज झाडून देशी यावी येविषी आपणास कळले. त्यांस आपला कोणी भला माणूस येथे आपले पत्र घेऊन आलियास आम्ही फौजेनिशी येऊन आपले हाती चाकरीचा योग घडलिया सेवा करुं, न घडलिया घरास जाऊ. आम्हाकडे वरकडांसाठी आत बाहेर गोष्ट नाही. ज्या कमानेस तीर येथे लागेल दुसरे आम्हांपासून घडणार नाही. ज्यापाशी राहू त्याचा शेवट याच रीतीने लावू. पुरवेल त्याने आम्हांस पदरी बाळगावे. हे न घडल्यास ईश्वर सत्ता. या पत्राचे अक्षरशः मनन करून मर्जीस गोष्ट आलिया मान्य करावी. लिहीलेप्रमाणे पत्र आलियास देशी येण्याची सोय घडवू; नाही तर ईश्वरेच्छा प्रमाण "[३] हे पत्र एप्रिल १७७६ मधील आहे.

सवाई माधवराव पेशव्याची भेट

बारभाई पक्षाला आल्यावर तो जेव्हा छोटया सवाई माधवराव पेशव्याला भेटण्यास आला त्या वेळचे वर्णन हरिवंशाच्या बखरीत फारच उत्तम दिलेले आहे. नाना वगैरे कारभाऱ्यांची घाबरगुंडी उडाली होती असे या वर्णनावरून दिसते. सवाई माधवराव पेशवा दोन वर्षांचा होता. मानाजीसारखा उद्दाम गृहस्थ पेशव्यांच्या भेटीस आल्यावर काय करील आणि काय नाही याची चिंता कारभाऱ्यांना पडली होती. रघुनाथरावाने इंग्रजांशी सख्य करून त्यांच्यामार्फत पुणे दरबारकडून ज्या अवास्तव मागण्या मागितल्या होत्या, त्यात मानाजी शिंदे याला दहा लक्षाची जहागीर द्यावी अशी एक मागणी होती. यावरून रघुनाथराव पेशव्याचा तो किती एकनिष्ठ व विश्वासू सेवक होता हे दिसते. रघुनाथरावाच्या सैन्याची वाताहात झाल्याने वरकरणी हरिपंत फडक्यांच्या चातुर्याने व शौर्यप्रभावाने तो बारभाईच्या बाजूस येऊन मिळाला होता. तोंडाने आपल्या स्वामिनिष्ठेच्या तो खूप बाता मारी त्याला कोणी फितुरी अथवा प्रतिपक्षाच्या बाजूचा असे म्हटलेले आवडत नसे. नाना फडणीस व हरिपंत फडके यांना त्याचे अंतरंग पूर्णपणे माहीत असल्याने त्याच्या बोलण्याला न भुलता त्यांनी त्याला बाल श्रीमंतास भेटवून व सरदारीची वस्त्रे

देऊन जमल्यास हे सावज हस्तगत करण्याचा एक मुत्सद्देगिरीचा डाव रचला होता. तरीहि मानाजीबद्दल त्यांना विश्वास वाटत नसल्यामुळे त्याची व श्रीमंतांची भेट सुरक्षितपणे कशी पार पडेल याची त्यांना काळजी वाटत होती. पुरंदरावर मानाजी श्रीमंताच्या भेटीस येणार होता तेव्हा नानांनी दाजीसाहेब पटवर्धनास सांगितले की "मानाजी फाकडे यांजबरोबर बोलायचा आमचा काही लाग नाही, त्याचबरोबर आपणच बोलावे."७ दाजी बोलले की "तुमचा पंचहत्यारी कसला जरी आला तरी मी त्याचबरोबर बोलतो. सारे माझे ओळखीचे आहेत." भेटीच्या वेळी दाजींनी श्रीमंतास कडेवर घेऊन कचेरीत आणून मसनदीवर बसवले. शेजारी तलवार घेऊन दाजी स्वतः बसले. नाना फडणीस, सखाराम बापू आदि सर्व बरोबर होते. मानाजी पंचवीस तीस माणसांसह दरबारात आला. नीट कचेरीत येऊन मसनदीजवळ आला. दाजीनी श्रीमंतास सांगितले की "रावसो० मानाजी बाबांस ताजिम द्यावी." लगेच मानाजीने श्रीमंतांचे मसनदीवर मुजरा करून समोर मध्येच बसला आणि कचेरीत चहूंकडे पाहून दाजींना "दाजी रामराम" असे म्हणाला. दाजींनी पण "मानाजी बाबा रामराम" असे म्हटले. बाकी त्याने कोणासहि राम राम केला नाही आणि एकदम बोलण्यास सुरुवात केली. "पुरुषोत्तमराव, मी कसा आहे ते, मी आपल्या तोंडाने वर्णन करावेसे नाही. परंतु मला ही बामणे (नाना फडणीसास उद्देशून) फितुरी म्हणतात. त्यास आम्हास कुठेहि चाकरी करावयाची. दादासाहेबांचे काय आणि हे पाय काय त्यास आता पुरे. आम्ही काही जन्मापासूनचे शिपाई नाही. दादांनी आम्हाला वर आणले." नंतर हा समारंभ थोडक्यात आटोपला.

मानाजी हैदराकडे

सवाई माधवराव खरा की खोटा परीक्षा करून आपल्याला कळविण्यासाठी दादासाहेबाने मानाजीस मुद्दाम नानाकडे पाठविले होते. म्हणून त्याने स्वतः पेशव्यास पाहून खात्री करून घेतली व नंतर पेशव्यास दंडवत केला व दादास पेशवा खरा असल्याबद्दल कळविले. त्याच्या शब्दानुसार दादाने सवाई माधवरावाचे पेशवेपद मान्य केले. मानाजी पेशव्याकडे फार दिवस राहीला नाही. १७७८ च्या जानेवारीत हरिपंत फडके हैदरावर चालून गेला असता हैदराच्या बाजूने लढणाऱ्या बाजीवंत बर्वे या दादाच्या सरदाराने त्याला फितुर केले. हैदराने ५ हत्ती व २० हजार फौज त्याच्या तैनातीस दिली. या वेळी मानाजीची पत्नी तात्यांनी कैद केली. पाटीलबावा यावेळी कोल्हापुरास होते. त्यांनी मार्च १७७८ च्या एका पत्रात मानाजीबद्दल लिहिले की "मानाजीसुद्धा झाडून फौज तिकडे (शत्रूला) मिळाली. कोणाकोणाचे घरी चौक्या बसवाल ?" ९

मानाजीची बंडाळी

मानाजी यानंतर जिकडे तिकडे दंगली व लूटालूट करूं लागला.[१०] हैदरकडे तो फार दिवस राहिलेला दिसत नाही. दंगल-लुटीच्या गडबडीत त्याने कोल्हापूर ते सुरतपर्यंत धुमाकूळ घातला. [११] मध्यंतरी अशीरगडावर तो गेला होता. जेव्हा त्याने जयरामस्वामीचे वडगांव लुटले तेव्हा परशुरामभाऊने त्याच्यावर सैन्य पाठवून त्याचा बंदोबस्त केला. सन १८७१ ते पंढरपुराजवळ गोपाळपुरास प्रतिनिधिच्या फौजेने त्याचा पराभव केला.[१२] मानाजी जेव्हा आवरेना तेव्हा पेशव्याने अखेर त्याच्या बंदोबस्तासाठी सखूबाईस लिहिले. सखूबाईने पेशव्याला कळविले की त्याने नवीन लोक नोकरीस ठेवलेले नाहीत. पण इकडे मात्र मानाजीला जरबेने आणि युक्तीने समजावून त्याचे लोक कमी करविले.[१३] अखेर मानाजी तिच्याही कह्यात राहीना, तेव्हा तिने स्वतच: नाना फडणिसास लिहून त्याचा बंदोबस्त करण्यास सांगितले. कारण जवळजवळ २। वर्षे ती मानाजीने करून ठेवलेल्या देण्याच्या विवंचनेत होती,[१४] एकदा तर महादजीकडील एक कंठी त्याने वानवले सावकाराकडे पैशासाठी गहाण टाकली. पण महादजीने ती सोडवली.[१५]

मानाजीचे उत्तर आयुष्य

महादजीशी सुरवातीस जरी त्याची स्पर्धा होती तरी पुढे ते वैमनस्य राहिले नाही. १७८९–९० त महादजी पुण्यात असताना रंगपंचमीच्या समारंभात मानाजी सामील झाला होता. [१६] महादजीनंतर त्याने दौलतरावास सहाय्य केले. घासीराम प्रकरण चव्हाट्यावर आणण्यास मानाजीच कारणीभूत झाला. त्याने कोंडलेल्या ब्राह्मणांपैकी वाचलेल्या एकास पेशव्यापुढे नेऊन हजर केले. [१७] १७९५ त त्याने बाजीरावास पेशवाई मिळावी म्हणून खूप खटपट केली. कारण तो रघुनाथरावाशी एकनिष्ठ होता. या वेळी नाना फडणीस अगतिक झाला होता. त्यालासुद्धा मानाजीचीं आर्जवे करावी लागली. या वेळी मानाजीवर नानाने हेर ठेवले होते ते रोजच्या रोज मानाजीची हालचाल नानांना कळवित असत. [१८] अशा त्यांच्या अहवालाच्या ४०–५० चिठ्या उपलब्ध आहेत. महाड प्रकरणात बाबा फडके व मानाजी शिंदे यांनी बाजीरावास फौजा ठेवण्यास मदत केली. परशुरामभाऊंनी बाजीरावास फौजेस रजा देण्यास सांगितले. तेव्हा मानाजीने साल्प्याच्या घरात गुप्तपणे निळकंठराव पागे व मालोजी घोरपडे यांची माणसे जमविली. या वेळच्या एका पत्रात मानाजी लिहितो– "आम्ही ते फक्त सिपाई.......... श्रीमंतांचे (रघुनाथराव) पदरी राहून चाकरी करून काल घालविला. येकनिष्ठता धरोन समागमे आहोत. कलीचा धर्म तशी

बुद्धी तुम्हां लोकास निर्माण झाली. निदान ईश्वरास, त्याचे ठिकाणी आहे आम्ही केवळ डोंगरचे रहिवासी." [१९]

योग्यता

मानाजी सन १८०० च्या एप्रिलात वारला. पहिल्या बाजीरावापासून दुसऱ्या बाजीरावापर्यंत सर्वांच्या कारकीर्दी पहाणारा हा एकच वीर दिसतो किंवा डभईच्या लढाईतील याचा उल्लेख बरोबर नसावा. तो रघुनाथरावाबरोबर अनेक युद्धांत हजर होता. तो नावाजलेला तलवारबहाद्दर होता. 'फाकडे' हा अत्यंत शूरपणाबद्दल लोकांनी दिलेला किताब त्याच्या कोन्हेरराम कोल्हटकर व कॅ. स्टुअर्ट यांचेबरोबर मिळाला होता. पण केव्हा ते कळत नाही.[२०] तो महादजी-पेक्षाहि शूर दिसतो. १७९१ त मेजर प्राईसाने त्यांचे वर्णन लिहून ठेवलेले आहे. "त्याच्याकडे कोणाचेहि चित्त वेधण्यासारखे होते. त्याच्या अप्रतिम धाडसाचा अनुभव इंग्रज फौजेस (पहिल्या मराठा युद्धात) आलेलाच आहे. त्याचे ते ओबड-धोबड व अवाढव्य शरीर व अस्सल मराठी ठेवण डोळ्यात भरणारी होती. कमरेच्या वर सर्व शरीर उघडे; फक्त खांद्यावरून सोडलेला एक दुपट्टा होता. छाती, तोंड व हात याजवर पिवळ्या व शुभ्र गंधाचे भले मोठे पट्टे ओढलेले होते. ढालीवर टेकलेले शरीर व त्याची राकट मुद्रा पाहून थरकाप उडावा मग अंतर्याम त्याचे कसेहि असो. तळेगावावर ज्या आम्ही इंग्रजांनी त्याला आमच्या पाठी दाखवल्या त्यांचाच आता पेशव्यांचे दरबारात चाललेला एवढा सत्कार त्यास दुःसह्य वाटत असावा." [२०]

त्याच्या पत्रांवरून तो सुश्रूत व धर्मग्रंथ चांगले माहीत असलेला दिसतो. नाना फडणीस व हरिपंत फडके यांना एक महिन्यानंतर लिहिलेल्या पुढील पत्रा-वरून मानाजीचा स्वभाव व स्पष्टवक्तेपणा दिसतो. या दुसऱ्या पत्रात मानाजी लिहितो. "साऱ्या लष्कराच्या मनात मी न यावे ऐसे आहे---मी येतो आज्ञेची वाट तिळभर पाहत ,नाही. हेत चातक न्याये प्रमान पायासी आहे. दुसरा अर्थ नाहीं. स्वामीची दया असलिया वानेरापासून लंका घेतली यैसे समर्थ जाणतच आहेत. परंतु येक वेल जातीस मिलवून काय असल ते स्वामी म्होरं दाखवीन श्रीरामचंद्रासमान आपण आहेत. पाये दृष्टीस पडतील ते दिवशी वानेराचा श्रमपरिहार होऊन स्वामीसेवा घडल आणि मुक्तात्मा होईल यांत अंतर पडणार नाही." [२१] या पत्रावरून मानाजीला रामायण-भारताची चांगली माहिती असावी असे दिसते. तो लिहिणारा देखील फर्डा दिसतो. फितुरी या शब्दाला १८ व्या शतकातल्या मराठी राज्यात काहीच अर्थ उरला नव्हता. निजाम, हैदर, पेशवे, भोसले कुणाचीहि चाकरी करणे सरदारांना सारखेच वाटे. मानाजी, रघुनाथराव,

दुसरा बाजीराव व दौलतराव यांच्याशी शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिला. घाटगे-शाहीचा निकाल लावण्यास तोच कारणीभूत झाला. इतिहास निःपक्षपाती असू शकत नाही. नारायणरावाच्या खुनाने बदनाम झालेल्या रघुनाथरावाच्या पक्षात काही उत्तमोत्तम माणसे असूनही त्यांना इतिहासाने उपेक्षिले आहे. सखाराम हरिप्रमाणेच मानाजी हाहि त्यापैकी एक आहे.

संदर्भ

(१) सरदेसाई, ऐतिहासिक वंशावली पृ. १५७
(२) सुंठणकर, राघो भरारी चरित्र १९५४ पृ. २१७
(३) लोकहितवादी, ऐतिहासिक गोष्टी भाग ९ १९०८ क्र. ७७ पृ. ४७–४८
(४) सरदेसाई, पेशवे दप्तर खंड २९ पत्र ४८–६५
(५) सरदेसाई, काळे इ. पत्रे यादी वगैरे क्र. २०४
(६) खरे, ऐतिहासिक लेखसंग्रह क्र. १८३१.
(७) हरिवंश बखर परिच्छेद ११२.
(८) सातारा ऐतिहासिक संशोधन मंडळ ऐतिहासिक ग्रंथमाला खं पत्र ४१
(९) " " " " पत्र ६९
(१०) सरदेसाई काळे इ., पत्रे, यादी वगैरे क्र. २६८
(११) सातारा ऐति. संशोधन मंडळ, ऐति. ग्रंथमाला खं. २ पत्र १८५
(१२) सरदेसाई, काळे इ., पत्रे यादी वगैरे क्र. २९२
(१३) सातारा ऐतिहासिक संशोधन ग्रंथमाला खं. १ पत्र ८२
(१४) सातारा ऐ. सं. मं. ऐ. ग्रंथमाला खं. १ पत्र ८५
(१५) --,,-- --,,-- --,,--
(१६) नातु, महादजी चरित्र पृ. २६४
(१७) लोकहितवादी, ऐ. गोष्टी भाग १ क्र. ७७ पृ. ४७–४८
(१८) सातारा ऐ. सं. मं. खंड २ पत्र ४१६
(१९) डे. कॉ. ऐ. सं. रुमाल ८२ फा ४ पत्र ४५
(२०) पारसनीस इ. संग्रह, ऐतिहासिक गोष्टी
(२०) सुंठणकर, राघोभरारी चरित्र १९४५ पृ.
(२१) सातारा ऐ. ति.-संशोधन मंदिर ऐ. लेखमाला खंड १ पत्र ६

साधन

अप्रकाशित

डेक्कन कॉलेज ऐतिहासिक संग्रहालय रुमाल ८२

प्रकाशितः–

१ सरदेसाई, पेशवे दप्तर खं. २९.
२. सरदेसाई, काळे वाकसकर, ऐ. पत्र यादी वगैरे १९३७
३. सरदेसाई, कुलकर्णी, काळे, ऐ. पत्रव्यवहार १९३३
४. सातारा ऐति. संशोधन मंडळ ऐ. ग्रंथमाला खंड १ व २
५. सरदेसाई, ऐति.—वंशावळी १९५७
६. सुंठणकर, राघो भरारी यांचे चरित्र १९४६
७. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, मध्ययुगीन चरित्र कोश
८. वाड, पेशवे रोजनिशी
९. वासुदेवशास्त्री खरे, ऐतिहासिक लेखसंग्रह
१०. नातू, महादजी चरित्र
११. पारसनीस, इतिहाससंग्रह ऐति. गोष्टी
१२. लोकहितवादी, ऐतिहासिक गोष्टी भाग १,१९०८

नवे ऐतिहासिक साहित्य : परिचय

(१) पगडी, सेतुमाधवराव
छत्रपती शिवाजी (इंग्रजी)
कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे; १९७४
पृ. ३६४ मूल्य २१—००

शिवाजीमहाराजांच्या चरित्राचे व कर्तबगारीचे सविस्तर व साधार विवेचन श्री. पगडी यांच्या या ग्रंथात पहावयास मिळते. पहिल्या प्रकरणात (पृ. १-५४) छत्रपतींच्या कामगिरीच्या विविध अंगांचा विचार केलेला असून तोच ग्रंथातील मुख्य विवेचक भाग किंवा गाभा. पुढच्या तीनशे दहा पानांमध्ये कालक्रमाने बालपणापासून मृत्यूपर्यंत विविध प्रसंगांचे वर्णन आहे. प्रत्येक ठिकाणी विवाद्य मुद्दे कोणते हे नोंदविण्यात आले असून निरनिराळ्या भाषांतील समकालीन साधनांच्या आधारे लेखकाने आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. शिवाजीचा संघर्ष मुख्यत्वे विजापूरच्या आदिलशाहीशी होता आणि काहीसा योगायोगाने त्याचे व मुगलांचे बिनसले व त्यामुळे त्याला आपल्या राजकारणाचा आवाका वाढवून अखिल भारतीय स्वरूप द्यावे लागले; अन्यथा हा संघर्ष केवळ दख्खनपुरताच मर्यादित राहिला असता हे श्री. पगडी यांच्या प्रतिपादनाचे मुख्य सूत्र आहे. त्याचा लढा धार्मिक किंवा सांप्रदायिक नसून राजकीय होता हे मुख्य गृहीत कृत्य आहे. पुस्तकाची भाषा व मांडणी सुगम आहेत.

(२) ढवळीकर, म. के.,
अजंठा–ए कल्चरल स्टडी (इंग्रजी)
पुणे विद्यापीठ, पुणे; १९७३
पृ. १५७ चित्रसंख्या १२ मूल्य ७५–००

डॉ. ढवळीकर यांचा पीएच्. डी. चा प्रबंध मोठे आकर्षक रूप घेऊन आता बाहेर पडत आहे. अजंठ्याला असणाऱ्या भित्तीचित्रामधून तत्कालीन जीवनासंबंधी जी माहिती मिळते ती एकत्र करणे हा प्रमुख हेतू. या चित्रावरून समजणाऱ्या बौद्ध पुराणातील कथा, बौद्ध प्रतिमा, अजंठ्याच्या कलासंभाराच्या कालनिश्चितीत त्यांचा उपयोग या सर्वांचा खूपच उहापोह विद्वानांनी केला होता. परंतु ही चित्रे म्हणजे तत्कालीन जीवनाचे प्रतिबिंबच आहे हे समजून त्याचे दर्शन घडविण्याचा यत्न कोणीहि केला नव्हता. नाही म्हणावयास कॉडरिंग्टन यांनी या अभ्यासाची दिशा दाखविणारा एक लेख बऱ्याच वर्षांपूर्वी प्रसिद्ध केला होता.

भारूथ व अमरावती येथील शिल्पाचा असा अभ्यास याआधी झाला होता. पण अजंटा भित्तीचित्रे या दृष्टीने डॉ. ढवळीकर यांनीच प्रथम अभ्यासिली आहेत. त्यातील वास्तू, वस्त्रे, अलंकार, भांडीकुंडी या सर्वांची तपशीलवार नोंद करून शिल्पात किंवा उत्खननात सापडणाऱ्या तत्सदृश वस्तू, रोमन-ग्रीक कलेत व संसारात सापडलेल्या वस्तू, वाङ्मयीन वर्णने या सर्वांचा साकल्याने तुलनात्मक अभ्यास त्यांनी सादर केला आहे. वर्ण्यविषय material culture असा आहे. त्याला संसार असा मराठी शब्द वापरला तर, रोजच्या संसारासाठी वापरात असणाऱ्या वस्तूंवर रोमन, पाश्चात्य पद्धती व कला यांची बरीच छाप दिसते असा अभिप्राय त्यांच्या लेखनातून व्यक्त होतो. विवेचन अत्यंत साधार व उपयुक्त झाले आहे.

(३) देशमुख, डॉ. शारदा.
शिवकालीन व पेशवाईतील स्त्री–जीवन
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे; १९७३
पृ. २७५, मूल्य रु. २०–००

मराठेशाहीतील स्त्रीजीवनावरील आपला ग्रंथ डॉ. देशमुख यांनी बखरी, पत्रव्यवहार, लोकसाहित्य, पोवाडे, अशासारख्या भक्कम पायावर उभा केला आहे. शिवकालाविषयी प्रत्यक्ष माहिती फार थोडी आहे. जिजामातेसारख्या काही तेज–स्विनींचे दर्शन घडत असले तरी सर्वसामान्य स्त्रीजीवनाविषयी फारसे काही सांगता येत नाही. पेशवाईतील खूपच कागदपत्र उपलब्ध आहेत. त्यावरून अगदी लहानपणापासून स्त्रीच्या जीवनावर कोणकोणते संस्कार घडत, तिला व्यक्ती-विकासाची कितपत संधी मिळे, समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा काय दृष्टीकोन होता याविषयी सोदाहरण माहिती लेखिकेने दिलेली आहे. वैवाहिक जीवन, विधवांचे जिणे आणि मुख्यतः स्त्रियांच्या जीवनाचा आर्थिक आधार किंवा त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य यावरील विवेचन काहीसे उद्वेगजनकच वाटते. स्त्रीकडे पाहण्याचा भारतीय समाजाचा व धर्मशास्त्राचा दृष्टीकोन पहिल्या काही पानांत स्पष्ट केलेला आहे. मराठेशाहीतील वरच्या वर्गातील स्त्रियांच्या जीवनाचे एका स्त्रीने केलेले अत्यंत सहानुभूतीपूर्ण पण वस्तुनिष्ठ विवेचन असे ग्रंथाचे एकंदर वर्णन करता येईल.

(४) देव शां. भा.
मार्कंडी टेंपल्स (इंग्रजी)
नागपूर विद्यापीठ, नागपूर; १९७४
प. ५८ चित्रे ५७ मूल्य रु. ६०–००

विदर्भाच्या मध्ययुगीन वास्तुशिल्पाचा परिचय करून देणारे फारच थोडे ग्रंथ आज उपलब्ध आहेत. मंदिर शिल्पातील एका अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण अशा

आविष्काराचा प्रा. देव यांनी या ग्रंथात परामर्ष घेतला आहे. चांदा जिल्ह्यातील मार्कंडी या गावी असणाऱ्या ' मार्कंडेय ' मंदिराचे सविस्तर वर्णन यात पहावयास मिळते. या ठिकाणची इतर मंदिरे महाराष्ट्रात त्या वेळी प्रचलित असणाऱ्या घाटाची असली तरी मार्कंडेय मंदिर फार निराळे आहे. त्याचा संबंध आहे चंदेल वंशीयांनी जोपासलेल्या खजुराहोच्या मंदिर शैलीशी. मंदिराच्या वास्तूचा आणि त्यावरील मूर्तीकामाचा घाट थेट चंदेल शैलीचा आहे. देवदेवता, यक्षगंधर्व अशी अनेक शिल्पे असली तरी खजुराहोच्या मूर्तीकामात जे सगळ्यात प्रसिद्ध असे कामशिल्प त्याचा या मंदिरावरील अभाव जाणवण्याइतका स्पष्ट आहे. मंदिरशैली, मूर्तीकाम व धर्मपंथ यांचा खजुराहोला जरी दृढ संबंध असला तरी मार्कंडीला तसा वाटत नाही. अनुकरण असले तर फक्त कलाशैलीचे असावे. प्रा. देव यांनी अत्यंत तपशीलवार नोंद व वर्णन केलेले आहे.

(५) देगलूरकर गो. ब.

मिडिव्हल टेंपल्स ऑफ सातगाव
नागपूर विद्यापीठ, नागपूर; १९७४
पृ. १८, चित्रे १६, मूल्य रु. २५–००

बुलढाणा जिल्ह्यातील सातगाव येथील भूमिज शैलीच्या यादवकालीन मंदिराचा हा लहानसा परिचय आहे. गावात चार मंदिरे आहेत. त्यातले विष्णूचे मंदिर सगळ्यात मोठे आणि सर्वांगपरिपूर्ण. याच्या शिखराचा सर्वात वरचा भाग पडून गेला असला तरी वास्तूच्या अंगोपांगांची कल्पना येईल इतकी इमारत आज उभी आहे. मंदिराच्या बाह्यांगावर मूर्तीकाम नाहीच; पण दाराची चौकट, खांब व त्यावरचे हस्त यावरहि कोरीवकाम नाही. छत मात्र सुशोभित आहे. डॉ. देगलूरकरांनी छताच्या कोरीव कामावरूनच मंदिराचा काळ बाराव्या शतकाचा असे प्रतिपादन केले आहे.

(६) मिराशी. वा. नि.

शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख
विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर; १९७४
पृ. ५५०, प्रतिमापत्रे ३१; मूल्य रु. ३५–००

कोल्हापूर, ठाणे व खारेपाटण येथील शिलाहारवंशीय राजांच्या ताम्रपटांच्या व शिलासनांच्या आधारे त्या काळचा राजकीय व सामाजिक इतिहास या ग्रंथात वर्णिलेला आहे. पहिल्या भागात, जीवनाच्या सर्व शाखांचे, राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, विस्तृत व साधार विवेचन आहे. दुसऱ्या भागात अभिलेखांचे मूळ पाठ ठशांसह छापले असून त्यांचे वाचन दिलेले आहे. वरील

विवेचनास उपकारक ठरणारी अन्य साधने म्हणजे तत्कालीन नाणी, मूर्ती इत्यादी. त्यांचीहि वर्णने, छायाचित्रे ग्रंथात समाविष्ट करण्यात आलेली आहेत. आतापर्यंत म. म. मिराशी यांनी वाकाटक आणि कलचुरि या दोन्ही घराण्यांचा असाच इतिहास प्रसिद्ध केलेला आहे. त्याचं उच्च परंपरेत प्रस्तुत ग्रंथहि बसतो.

(७) देगलूरकर गो. ब.
टेंपल आर्किटेक्चर अँड स्कल्प्चर ऑफ महाराष्ट्र
नागपूर विद्यापीठ प्रकाशन,
पृष्ठे : १८३, चित्रसंख्या : ८१
नागपूर : १९७४ मूल्य : १२०

यादवकालातील मंदिरशिल्पाची वास्तुवैशिष्टचे आणि मूर्तिकला यांचा परामर्ष घेणारा हा ग्रंथ नागपूर विद्यापीठाने नुकताच प्रसिद्ध केला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील मध्ययुगीन वास्तुकलेवर कझिन्स यांनी यापूर्वीच एक सविस्तर व तपशीलवार ग्रंथ प्रसिद्ध केलेला असल्याने डॉ. देगलूरकर यांनी विदर्भ आणि मराठवाडा या भागांकडे जास्त लक्ष पुरविले आहे. या दोन्ही भागातील अनेक मंदिरे प्राय: अज्ञातच होती. त्यांचा सांगोपांग अभ्यास करून अंबरनाथला उत्पन्न झालेल्या शिल्पपरंपरेतील त्यांचे स्थान कोणते याचा विचार देगलूरकर यांनी केला आहे. भरपूर तपशील आणि साक्षेपी विवेचन यामुळे हा ग्रंथ सर्वच अभ्यासकांस मननीय ठरावा.

(८) सांकलिया ह. धी.
प्रिहिस्टरी अ‍ॅन्ड प्रोटोहिस्टरी ऑफ इंडिया अ‍ॅन्ड पाकिस्तान
आवृत्ती दुसरी : डेक्कन कॉलेज, पुणे १९७४
पृष्ठसंख्या : आकृती : मूल्य : १२०-००

भारतीय उपखंडाच्या (सध्याची भारत, पाकिस्तान व बांगला देश ही राष्ट्रे) इतिहासपूर्वकालीन समाज व संस्कृती यांचे विवेचन करणारा हा ग्रंथ आहे. ग्रंथाची ही दुसरी आवृत्ती. पहिल्या व दुसऱ्या आवृत्तींच्या मधे असणाऱ्या दहा वर्षात इतके नवीन ज्ञान हाती आले आहे की लेखकाने आपल्या मूळ ग्रंथात अनेक महत्त्वाचे बदल केले आहेत. त्यामुळे आवृत्ती म्हणण्यापेक्षा एक स्वतंत्र ग्रंथ म्हणावे इतके मोल ग्रंथाला प्राप्त झालेले आहे. सरळ व सोप्या भाषेत अश्मयुगापासून ते ताम्रपाषाणयुगापर्यंत—म्हणजेच इतिहासकालाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपेपर्यंत—मानवी जीवनाविषयीं मिळालेली सर्व माहिती येथे एकत्र गुंफलेली आहे. प्रत्येक सांस्कृतिक स्तबकाच्या कार्यकारणाविषयी आपली मते लेखकाने नोंदविलेली असल्याने ग्रंथ अत्यंत उद्‌बोधक झाला आहे.

(९) गोविंद अगरवाल

चुरू मंडल का शोधपूर्ण इतिहास

लोक संस्कृति शोध संस्थान श्री–चुरू, राजस्थान

१९७४ मूल्य रु. ५० पृष्ठे ५१७

राजस्थानच्या ईशान्य भागातील 'चुरू मंडल' या भागाचा हा इतिहास आहे. प्रारंभीच्या प्रकरणात भौगोलिक स्थिती, हवामान, पाऊसपीके यांचा परिचय करून देण्यात आलेला आहे. पुढे प्रागैतिहासिक कालापासून तो तहत आजपर्यंतच्या घडामोडींचा तपशीलवार वृत्तांत येथे वाचावयास मिळतो. सरस्वती–धृषद्वती या नद्यांच्या तीरी कालिबंगासारखी नगरे हडाप्पा समाजाने उभी केली. त्यानंतर रामायण–महाभारत यांच्या काळात या भूमीचा कोठे उल्लेख येतो का याचा मागोवा घेण्यात आला आहे. पुढे मौर्य कालापासूनचा अखंड इतिहास उपलब्ध आहे. मध्ययुगीन राजवंश व राजे यांची काहीशी तपशीलवार हकीकत आलेली असली तरी एवढा प्रदीर्घ कालखंड वर्णावयाचा असल्याने निरनिराळ्या घटनांचा त्रोटक असाच परामर्ष लेखकाला घेता आला आहे. तथापि साहित्य, कला, व्यापार, लोकजीवन, लोककला या सर्वच अंगांचा आढावा यात समाविष्ट असल्याने ग्रंथ अत्यंत वाचनीय आणि उपयुक्त झालेला आहे.

(१०) **विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक १९७४**

संपादकः–म. रा. जोशी.

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर १९७५

पृष्ठे २३८, मूल्य रु. ८—००

भारतीय इतिहास, संस्कृती आणि प्राच्यविद्या या विषयांवरील अभ्यासपूर्ण शोधनिबंध विदर्भ संशोधन मंडळाच्या वार्षिकात दरसाल प्रसिद्ध होत असतात. प्रस्तुत वार्षिक आतापर्यंतच्या लौकिकाला साजेसेच आहे. वेद–उपनिषदे यातील तत्त्वज्ञान, कर्मकांड आणि कर्मकाण्डाचा अन्वयार्थ यासंबंधी डॉ. भंडारी, डांगे, पांढरीपांडे यांचे लेख, साहित्य-इतिहास व साहित्यातील संकेत यावरील डॉ. शास्त्री, प्रा. व. दा. कुलकर्णी, प्रा. सौ. सिंधू डांगे यांचे निबंध, भाषा व भाषाशास्त्र याविषयी श्री. देविसिंग चौहान, श्री. श्री. मा. कुलकर्णी यांचे लेख, तसेच लेखविद्या, नाणकशास्त्र, मूर्तिशास्त्र यासंबंधी डॉ. कोलते, डॉ. जामखेडकर, श्री. रोडे यांचे निबंध समाविष्ट केलेले आहेत. यातील सर्वच निबंध लक्षणीय असले तरी महामहोपाध्याय वि. वि. मिराशी यांचा रामटेकच्या कालिदास स्मारकात काढलेल्या चित्रासंबंधीचा लेख विशेष उल्लेखनीय समजला पाहिजे. कालिदासाच्या काव्यातील आणि नाटकातील विषयांना अनुसरून किंवा निदान अनुलक्षून चित्रे

काढावयाची तर ती मुळातील वर्णनांशी, किमानपक्षी त्यात गृहीत असणाऱ्या काही सौंदर्यतत्त्वांशी मिळतीजुळती असावीत हा त्यांचा आग्रह मान्यच करावयास हवा. श्री. परब यांचा रसास्वाद वाचनीय असला तरी डॉ. मिराशी यांनी उपस्थित केलेला मुद्दा अधिक महत्त्वाचा समजावयास हवा. हे वार्षिक भारतीय संस्कृतीच्या सर्वच अभ्यासकांस उपयुक्त ठरेल.

(११) नटराजन् बी. (Natarajan. B.)
दि सिटी ऑफ दि कॉस्मिक डान्स (The City of the Cosmic Dance)
ओरिएण्ट लाँगमन्स, नवी दिल्ली, १९७४
पृष्ठे १६४ चित्रे २८, मूल्य : ४५–००

चिदंबरम् आणि तेथील नटराज मंदिराविषयी सर्वांगीण माहिती या छोटयाशा इंग्रजी ग्रंथात लेखकाने गुंफलेली आहे. या क्षेत्राविषयींच्या आख्यायिका प्रथम देण्यात आलेल्या आहेत. निरनिराळ्या राजवंशांनी या क्षेत्रातील मंदिरें कसकशी उभारली, कोणी कोणी त्यांच्या वृद्धीचा यत्न केला याविषयीच्या ऐतिहासिक निवेदनासाठी चार प्रकरणे दिली आहत. हा इतिहास विजयनगरकाळापर्यंत आणलेला आहे. मंदिरातील सभागृहे, मंडप आणि गोपुरे अशा सर्व वास्तूविशेषांचे वर्णने यापुढे आलेलें आहे. येथून पुढचा काही भाग ग्रंथातील विशेष महत्त्वाचा मानता येईल. आठव्या प्रकरणामध्ये 'नटराज' या कल्पनेचे विवरण केलेले आहे. त्याची तात्त्विक बैठक येथे विशद करण्यात आलेली आहे. नवव्या प्रकरणात अरूद्रदर्शनम् नावाने याच विषयाचा आणखी थोडा विचार केलेला आहे. पुढील प्रकरणात शैव आचार्य, संत यांची चरित्रे आणि शिकवण तसेच मंदिरातील उत्सव यांचे वर्णन आहे. लेखकाचा आणि चिदंबरम् मंदिराचा फार निकटचा संबंध असल्याने हरतऱ्हेची माहिती त्याला एकत्र करता आलेली आहे. शिलालेखासारख्या इतर साधनांचाहि त्याने चांगला उपयोग केलेला आहे. मंदिराचे वास्तुशिल्प व मूर्तीकाम यांचीं कल्पना येण्यास सोबत दिलेली छायाचित्रे उपयोगी ठरतील. दक्षिण भारताच्या संस्कृतीत जवळजवळ अद्वितीय स्थान असणाऱ्या चिदंबरम् क्षेत्रासंबंधीचा हा ग्रंथ अत्यंत माहितीपूर्ण अतएव अभ्यासकास उपयुक्त आहे.

(१२) Itikar Alamkhan,
The Political Biography of a Mughal Noble :
Munium Khan Khan-i-Khanan (1497–1575)
Orient Longmans Ltd, New Delhi 1973; price Rs. 40.

मुघल बादशहा हुमायून आणि अकबर यांच्या काळात, एक सर्वसाधारण मनुष्य स्वतःच्या कर्तबगारीवर किती पुढे जाऊ शकत होता, इतकेच नव्हे तर तो

प्रत्यक्ष बादशहाचा प्रमुख सल्लागार व वेळी पालकहि बनू शकत होता याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुनीम बेग अथवा मुनीमखान यांचे चरित्र.

मुनीमखानाच्या पूर्वायुष्याबद्दल फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. त्याचा पिता मरीमबेग हा बाबरच्या फर्गाना परगण्यातील. मुनीमबेग हा हुमायूनबरोबर लाहोर, टठ्ठा येथे होता (१५४०–४१). हुमायून व कामदान यांच्या झगडयात मुनीमबेगचा राजकीय उत्कर्ष झाला. (१५४५–५१) लेखकाच्या (चरित्रकाराच्या) मतानुसार हुमायनचे हे भांडण म्हणजे मुघल मनसबदारी पद्धतीतील मोठा आणि-बाणीचा प्रसंग होता (पृ. ९). १९५३ मध्ये हुमायूनने त्यास अकबराचा मुतालिक म्हणून नेमले आणि नंतर त्यास अफगणिस्तानचा प्रदेश सांभाळण्यास सांगितले. १५५४–६० पर्यंत तो काबूलचा सुभेदार होता. अकबराचा मुख्य सल्लागार बहरामखान आणि मुनीमखान यांच्यात थोडे वितुष्ट होते; परंतु अकबराने बहरामखानास काढून टाकल्यावर मुनीमखानाने अकबराची भेट घेतली, त्या वेळी त्यास खान-ई-खानान ही पदवी देवून वकीलाच्या हुद्यावर त्याची नेमणूक करण्यात आली. (१५६०–६४). एवढे असूनदेखील अकबराचा त्याच्यावर संपूर्ण विश्वास कधीच नव्हता असे दिसते (पृ. ६९). अकबराने त्याला लाहोर येथे जागीर देण्याचे नाकारल्याने उत्तर आयुष्यात त्याची फार मोठी निराशा झाली. प्रस्तुत ग्रंथात ग्रंथलेखकाने मुघलांची मनसबदारी पद्धती, त्याची सुधारणा आणि मुघल सरदारांच्या एकंदर वर्तणुकीमुळे राज्यावर जे परिणाम झाले त्याचे विस्ताराने विवेचन केले आहे. मुनीमखानाने अकबराला त्याने आपल्या सरंजामदारांच्या विरुद्ध केलेल्या लढयात सर्व प्रकारे सहाय्य व मार्गदर्शन केले. शिवाय जौनपूरला सुभेदार असताना त्याने केलेल्या रस्ते बांधणी, पूल उभारणे अशासारख्या विधायक कामामुळे मुघलांना बिहार व बंगाल हे सहजपणे आपल्या ताब्यात ठेवले. बिहारमधील बंडखोर अफगाणांशी त्याने अकबराचा घडवून आणलेला समझोता ही त्याची एक महत्त्वाची कामगिरी समजतात. मुघली सरंजामदारांच्या बदलत्या निष्ठा, स्वार्थी झगडे व त्याचे साम्राज्यावर होणारे परिणाम यांचे उत्कृष्ट दर्शन लेखकाने घडविले आहे.

(१३) प्रा. मधुकर श्रीपाद माटे,
प्राचीन भारतीय कला;
डबल क्राऊन १८५ पृष्ठे,

महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिति मंडळासाठी कॉंटिनेन्टल प्रकाशन; १९७४; पुणे ३० विद्यापीठ अनुदान आयोगाने भारतातील प्रत्येक राज्यात त्याच्या भाषेत व विद्यापीठातील उच्च शिक्षणात उपयोगी पडणारे ग्रंथ निर्माण करण्यासाठी कांही अनुदान दिले आहे. त्या अनुदानातून मराठी भाषेत ग्रंथ निर्माण करण्याचे कार्य चालू आहे. त्यापैकी प्रतुस्त ग्रंथ हा एक आहे. या ग्रंथात

विषयाच्या अनुरोधाने ९ प्रकरणे पाडिली आहेत. त्यांत प्रागैतिहासिक काल, बौद्ध जैन काल, हिंदू जैन काल, गिरिशिल्प, मूर्तिशिल्प, चित्रकला इत्यादि प्रकरणे आहेत. या सर्व प्रकरणांत भारतात आढळणारी व मुसलमान-पूर्वकाली बनलेली व आढळलेली गुहा व मंदिरे आणि त्यांत आढळणारी शिल्पे, धातुमूर्ति व भित्तिचित्रे याविषयी पारंगत परीक्षेला उपयोगी पडणारी माहिती एकत्रित केली आहे. हा विषयच असा आहे की तो समजावून द्यावयाचा तर किती तरी आराखडे, विधाने व चित्रे द्यावी लागतील; त्याप्रमाणे या पुस्तकात १०८ चित्रे व १७ विधाने व आराखडे दिले आहेत आणि विषय समजावून सांगितला आहे. या विषयाचे वर्णन करताना अनेक पारिभाषिक शब्द सुटसुटित असल्याने अनिर्वाह्यपणे वापरावे लागतात. त्या पारिभाषिक शब्दांची सूचीही या पुस्तकात जोडली आहे. सारांश, हे पुस्तक सर्वांगपरिपूर्ण करण्याचा शक्य तो प्रयत्न केला आहे.

———— ५६१

ENGLISH SUMMARIES

1) **S. Akkole, Marathi Jain Literature,** A brief account of the religious and semi–religious literature produced by the Jainas in the Marathi language.

2) **G. T. Kulkarni, Grant of Danda Rajapuri,** The place was granted to Balaji Bajirao by the Mughal emperor but the former's inability to secure possession of the place defeated the purpose of securing the grant.

3) **G. H. Khare, Why Shivaji Fought for Independence ?** Uprooting of the Foreign powers established in India was the basic motive of the political movement sponsored Shivaji culminated in the establishment of an independent Kingdom.

4) **S. Gokhale, Kshatrap coins from Ranjangaon,** An introduction to the more important coin types of the Kshatraps discovered at Ranjangaon (Dist. Poona) in 1974.

5) **Kamal Chavan, A painting of Parashurama,** Discussion of a mural of Parashurama depicting his constructive role through rehabilitation of the Apatanta area.

6) **Ganesh Thite, Gathabhigitam,** Discussion of the origin of the Buddhist rule that nothing should be accepted as a return for singing of songs – gathas.

7) **S. B. Deo, Bhokardan : a new art centre of the Satavahanas,** Brief description and discussion of the artistic objects (esp. ivories) discovered in the recent excavations at Bhokardan

8) **D. K. Deshpande, A communal riot at Ahmedabad : 1714,** An analysis of the causes of communal riots at Ahmedabad in 1714 as described in contemporary documents.

9) **P. N. Deshpande, The Seige of Panhalgad – 1701,** The seige, capture and loss of Panhalgad in 1701 as an illustration of the faulty military tactics of the Mughals in the Deccan.

10) **D. N. Pasalkar, Escape of Baji Pasalkar,** Explanation of the route by which Baji made good his escape from the Mughal captivity.

11) **B. R. Potnis, Potnis family in the cause of ' Swarajya '** Narration of the attainments of various persons of the family who served the Maratha empire.

12) **G. L. Bhide, A letter re : the First Anglo–Maratha War,** A letter written in 1780 detailing the affairs of the various aspects of the four – power alliance against the British.

13) **M. S. Mate, Who should be called a ' Marathi ' King ?** A re–interpretation of the economic geography vis–a–vis the political history of Maharashtra.

14) **B. N. Mundi, A pilgrimage by Ragbunathrao Peshwa,** Ān introduction to a small travelouge of the 18th Century.

15) **Usha Ranade, An illustrated manuscript of the Gita-pancharatna,** An introduction to an 18th Century MSS.

16) **P. L. Saswadkar, Manaji Shinde Phakde,** Career of a relatively unknown warrior of the mid–eighteenth century.

17) Book Reviews.

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिकासंबंधी केंद्र
शासनाच्या नियमानुसार द्यावयाची माहिती [१९५६ चे नियम ८ नमुना ४]

१. प्रकाशन स्थळ : भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०

२. प्रकाशनकाल : त्रैमासिक (सध्या वार्षिक)

३. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : चिं. ना. परचुरे, भारतीय,
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें ३०
मुद्रणस्थळ : ज्ञानविलास प्रेस, पुणें २

४. प्रकाशकाचे नाव, चिं. ना. परचुरे, भारतीय, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ,
राष्ट्रीयत्व व पत्ता : १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०

५. संपादकाचे नाव, म. श्री. माटे, भारतीय, कार्यकारी संपादक,
राष्ट्रीयत्व व पत्ता : भा. इ. सं. मं., १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०

६. मालक व पत्ता : भारत इतिहास संशोधक मंडळ, १३२१ सदाशिव पेठ,
पुणे ३०.

मी चिटणीस प्रकट करतो की, माझी माहिती व विश्वास याप्रमाणे वर दिलेला तपशील अचूक आहे.

१०-७-१९७५

चिं. ना. परचुरे
[चिटणीस]